महाराष्ट्र शासन

GOVERNMENT OF MAHARASHTRA

सामान्य प्रशासन विभाग

**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**

# अंशदायी भविष्यनिर्वाह निधी नियम (मुंबई)

# THE CONTRIBUTORY PROVIDENT FUND RULES (BOMBAY)

(दिनांक ३० एप्रिल, १९८५ पर्यंत सुधारलेले)

*(Corrected upto 30th April, 1985)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर यांच्याकडून भारतात मुद्रित
व संचालक, शासन मुद्रण व लेखनसामुग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई ४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित
२०१०.

[ किंमत ११.०० रुपये ]

# अंशदायी भविष्यनिर्वाह निधी नियम (मुंबई)

# THE CONTRIBUTORY PROVIDENT FUND RULES (BOMBAY)

# अंशदायी भविष्यनिर्वाह निधी नियम (मुंबई)

(दिनांक ३० एप्रिल, १९८५ पर्यंत सुधारलेले)

नागरी सेवा (वर्गीकरण, नियंत्रण आणि अपील) नियम, १९३० यातील नियम ४१, ४२ आणि ४४ अनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्या नियमातील नियम ५१ अन्वये घेतलेल्या गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल यांच्या पुर्वमंजुरीने मुंबई शासन, त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या प्रांतिक, विशेषज्ञ किंवा दुय्यम सेवांमधील विना-निवृत्तीवेतन कर्मचाऱ्यांसाठी प्रस्थापित केलेल्या नवीन अंशदायी भविष्यनिर्वाह निधीचे विनियमन करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहे. हे नियम विशेष भविष्यनिर्वाह निधी, सेक्रेटरीएट टंकलेखकांकरिता भविष्यनिर्वाह निधी आणि ससून रुग्णालय परिचारिका भविष्यनिर्वाह निधी यांच्यासंबंधात सध्या अस्तित्वात असलेले सर्व नियम आणि आदेश यांचे अधिक्रमण करतात :- नियम ४१, ४२ आणि ४४

**संक्षिप्त नाव आणि व्याख्या**

१. (१) या नियमांना, अंशदायी भविष्यनिर्वाह निधी नियम (महाराष्ट्र) असे म्हणावे.

(२) हे नियम, १ एप्रिल, १९३४ पासून अंमलात येतील.

२. (१) या नियमांत, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,-

(एक) शासन याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे;

(दोन) लेखा अधिकारी याचा अर्थ, महालेखाकार महाराष्ट्र असा आहे;

परंतु, निधीमधून वित्तव्यवस्था करण्यात आलेल्या विमापत्राचे अभिहस्तांकन किंवा पुनअभिहस्तांकन करण्याच्या प्रयोजनासाठी असलेल्या लेखाअधिकारी म्हणजे, महालेखाकार यांच्या कार्यालयातील भविष्य निर्वाह निधी शाखेचा प्रभारी शाखा अधिकारी असा आहे;

(तिन) वित्तलब्धी या संज्ञेचा अर्थ, महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे वेतन, रजावेतन किंवा निर्वाह अनुदान असा होतो, आणि यात खालील गोष्टींचा समावेश होतो.-

(क) राज्याचे सचिव याबाबतीत विहीत करतील अशा विनिमय दराने परावर्तित केलेले स्टर्लिंग समुद्रपार वेतन;

(ख) नियत मासिक वेतनाद्वारे पारिश्रमिक देण्यात येत नसलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाने दिलेले कोणतेही वेतन;

(ग) स्वीयेत्तर सेवेच्या संबंधात वेतनाच्या स्वरूपात मिळणारे कोणतेही पारिश्रमिक; आणि

(घ) वेतन, रजा वेतन किंवा निर्वाह अनुदान यांना समुचित असे महागाई वेतन, यांचा समावेश होतो.

(चार) **कुटुंब याचा अर्थ**,-

(क) पुरुष वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराची पत्नी किंवा एक किंवा अनेक पत्नी आणि त्याची मुले आणि वर्गणीदाराच्या मृत मुलाची विधवा किंवा मृत मुलाच्या विधवा आणि त्याची मुले;

परंतु, जर वर्गणीदार त्याची पत्नी न्यायिकरीत्या त्याच्यापासून विभक्त झाली आहे किंवा ती ज्या जातीची आहे, त्या जातीच्या रूढीगत विधीनुसार तिने निर्वाहाचा हक्क गमावलेला असेल असे सिध्द करून दाखविले तर, हे नियम ज्या बाबतीत लागू होतात त्याबाबतीत ती व्यक्ती, वर्गणीदाराच्या कुटुंबाची सदस्य मानली जाणार नाही; तथापि, जर वर्गणीदार नंतर स्पष्ट लेखी नोटीशीद्वारे अशी व्यक्ती कुटुंबातील सदस्य समजण्यात यावी असे लेखा अधिकाऱ्यास कळवील तर ती व्यक्ती वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्ती म्हणून समजण्यात येईल;

(ख) स्त्री वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराचा पती आणि तिची मुले आणि वर्गणीदाराच्या मृत मुलाची विधवा किंवा मृत मुलांच्या विधवा आणि मुले असा आहे;

परंतु, जर एखाद्या वर्गणीदाराने, लेखा अधिकाऱ्याला केलेल्या लेखी निवेदनाद्वारे तिच्या पतिला कुटुंबातून वगळण्यात यावे, अशी इच्छा व्यक्त केली असेल, आणि वर्गणीदाराने त्यानंतर त्याला तिच्या कुटुंबातून वगळण्यासंबंधीचे लेखी निवेदन रद्द केले नसेल तर, ते नियम ज्या बाबींच्या संबंधात लागू असतील त्या बाबींपुरते त्यास यापुढे कुटुंबाचा सदस्य असल्याचे समजण्यात येणार नाही.

टीप १ :- " मुले " याचा अर्थ औरस संतती असा आहे.

टीप २ :- वर्गणीदारास लागू असलेल्या व्यक्तीगत कायद्यानुसार जर मूल दत्तक घेणे कायदेशीररीत्या मान्य करण्यात आले असेल व त्यामुळे मुलाला नैसर्गिक मुलाचा दर्जा प्राप्त होतो याबाबत लेखा अधिकाऱ्याची किंवा लेखा अधिकाऱ्यांच्या मनात कोणताही संदेह निर्माण झाल्यास, मुंबई शासनाचे सॉलिसिटर यांची खात्री पटली तर, केवळ या प्रकरणी दत्तक घेतलेले मुल, मुल म्हणून समजण्यात येईल.

(पाच) 'रजा' याचा अर्थ, महाराष्ट्र नागरी सेवा नियम किंवा नागरी सेवा विनिमय यापैकी जे वर्गणीदाराला लागू होत असतील त्यानुसार, मान्य करण्यात आलेली कोणत्याही प्रकारची रजा असा आहे;

(सहा) 'निधी' याचा अर्थ, अंशदायी भविष्यनिर्वाह निधी (मुंबई) असा आहे; आणि

(सात) 'वर्ष' याचा अर्थ, वित्तीय वर्ष असा आहे.

(२) या नियमात उद्धृत करण्यात आलेल्या इतर कोणत्याही शब्दप्रयोगाचा अर्थ, भविष्य निधी अधिनियम, १९२५ (१९२५ चा १९) किंवा महाराष्ट्र नागरी सेवा नियम यामध्ये व्याख्या करतांना त्याला जो अर्थ दिलेला असेल, तोच अर्थ राहील.

**निधीची स्थापना व व्यवस्थापन**

३. हा निधी शासनाकडून प्रशासित करण्यात येईल आणि भारतात तो रुपयांमध्ये ठेवण्यात येईल.

४. (१) हे नियम.-

(एक) (क) ज्या शासकीय कर्मचाऱ्याला, हे नियम अंमलात येण्यापूर्वी शासनाने ठेवलेल्या विशेष किंवा अंशदायी भविष्यनिर्वाह निधीचा लाभ मिळविण्यासाठी अनुज्ञेय ठरवण्यात आले असेल, किंवा

(ख) ज्या शासकीय कर्मचाऱ्याला हे नियम अंमलात आल्यानंतर शासनाने निधीसाठी अनुज्ञेय ठरविले असेल अशा, शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही सेवेतील (मग ती प्रातिक असो, विशेषज्ञ असो किंवा दुय्यम असो) विना निवृत्तिवेतनी पदावरील शासनाच्या प्रत्येक कर्मचाऱ्याला हे नियम लागू होतील :

परंतु, हे नियम लागू करण्यासंबंधीची तरतूद करणाऱ्या करारपत्राव्यतिरिक्त, भविष्यनिर्वाह निधीच्या संबंधात जो कर्मचारी व शासन यामध्ये करारपत्र अस्तित्वात आहे अशा कोणत्याही कर्मचाऱ्यास हे नियम लागू होणार नाहीत; आणि करारपत्र अस्तित्वात असेल अशा प्रकरणी, अशा करारपत्राच्या अटींना अधीन राहून ते लागू होतील, आणि

(दोन) शासकीय मध्यवर्ती आसवनी, नाशिक रोड या आसवनीच्या ताब्यात असलेल्या शुल्कबध्द मद्य वखारी आणि धडगाव येथील आसवनी यांमधील अस्थायी कर्मचारीवर्गामधील (वाणिज्यिक शाखा) किंवा अक्राणी महालमधील देशी मद्य दुकानदाराच्या अस्थायी आस्थापनेवरील, शासनाचा प्रत्येक विना निवृत्तिवेतनी कर्मचाऱ्याला लागू होतील.

(२) हे नियम लागू असणारा शासनाचा प्रत्येक कर्मचारी निधीचा वर्गणीदार असेल.

(३) पोट-नियम (१) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही निधीमधील शासनाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याच्या जमाखाती असलेली शिल्लक, हे नियम अंमलात येतील त्या दिनांकापासून निधीमध्ये त्याच्या जमाखाती हस्तांतरित करण्यात येईल.

(४) भविष्यनिर्वाह निधीचे लाभ मिळण्यास अनुज्ञेय ठरवण्यात आलेला शासकीय कर्मचारी, जर पूर्वी इतर कोणत्याही अंशदायी किंवा बिगर अंशदायी भविष्यनिर्वाह निधीचा वर्गणीदार असेल, तर त्याच्या वर्गणीची रक्कम आणि इतर अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमधील शासकीय अंशदाने/किंवा यथास्थिती, बिगर अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमधील त्याच्या वर्गणीची रक्कम त्यावरील व्याजासह निधीमध्ये त्याच्या खाती जमा होईल.

(५) निधीचे लाभ मिळण्यास अनुज्ञेय ठरवण्यात आलेला शासकीय कर्मचारी इतर कोणत्याही शासनाच्या अंशदायी भविष्यनिर्वाह निधीचा किंवा बिगर अंशदायी भविष्यनिर्वाह निधीचा पूर्वी वर्गणीदार असेल तर अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमधील त्याच्या वर्गणीची रक्कम व शासनाचे अंशदान, किंवा यथास्थिती बिगर अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमधील त्याच्या वर्गणीची रक्कम, त्यावरील व्याजासह, त्या दुसऱ्या शासनाच्या संमतीने, त्या वर्गणीदाराच्या खाती जमा होईल.

**टीप एक.**—जो शासकीय कर्मचारी निवृत्त झाला आहे आणि सेवेत खंड होवून किंवा खंड न होता नंतर त्याची पुन्हा नियुक्ती झाली आहे किंवा ज्याची आधीची नियुक्ती कंत्राटावर होती अशा कर्मचाऱ्याला, पोट-नियम (४) व (५) च्या तरतुदी लागू होणार नाहीत.

**टीप दोन.**—तथापि, केंद्र शासनाच्या किंवा दुसऱ्या राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या दुसऱ्या विभागाखालील सेवांमधून राजीनामा देऊन सेवा समाप्त झाल्यानंतर या नियमांचा लाभ मिळणाऱ्या पदावर सेवेत खंड न होता तात्पुरती किंवा कायमची नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यास या नियमाच्या तरतुदी लागू होतील.

**टीप तीन.**—शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाकडून नियंत्रण केल्या जाणाऱ्या महामंडळाच्या सेवेतून सेवेत खंड न पडता संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदणीकृत असलेल्या स्वायत्त संघटनेमध्ये बदली झालेल्या व्यक्तीस पोट-नियम (५) मधील तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू असतील.

## नामनिर्देशन

५. (१) वर्गणीदार, निधीचा वर्गणीदार होईल त्यावेळी निधीमध्ये त्याच्या नावे जमा होईल अशी रक्कम त्याला देय होण्यापूर्वी किंवा ती झाली असूनही देण्यात आलेली नसेल अशा वेळी त्याचा मृत्यू झाल्यास, ही रक्कम मिळण्याचा हक्क एका किंवा अधिक व्यक्तींना प्रदान करणारे नामनिर्देशन लेखा अधिकाऱ्याकडे पाठवील.

परंतु, असे नामनिर्देशन करण्याच्या वेळी जर वर्गणीदाराचे कुटुंब असेल तर, स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तींच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे त्याने नामनिर्देशन करता कामा नये.

परंतु, आणखी असे की, निधीचा वर्गणीदार होण्यापूर्वी, वर्गणीदार ज्या इतर कोणत्याही भविष्यनिर्वाह निधीची वर्गणी भरीत असेल त्यासाठी करून दिलेले नामनिर्देशन, जर अशा दुसऱ्या निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेली रक्कम, या निधीमध्ये त्याच्या खाती जमा करण्यात आली असेल तर, जोपर्यंत तो या नियमानुसार नामनिर्देशन करीत नाही तोपर्यंत, पूर्वी त्याने केलेले नामनिर्देशन या नियमाखाली रीतसर केलेले नामनिर्देशन असल्याचे समजण्यात येईल.

(२) वर्गणीदाराने जर पोट-नियम (१) खाली एकापेक्षा अधिक व्यक्तींचे नामनिर्देशन केले असेल तर तो प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेली रक्कम किंवा हिस्सा नामनिर्देशनात अशाप्रकारे विनिर्दिष्ट करील की,

[१][(३) प्रत्येक नामनिर्देशन, पहिल्या अनुसूचित देण्यात आलेल्या नमुन्यामध्ये करण्यात येईल.]

[२][(४) वर्गणीदारास, कोणत्याही वेळी, लेखा अधिकाऱ्याला लेखी नोटीस पाठवून नामनिर्देशन रद्द करता येईल. वर्गणीदाराने या नियमाच्या तरतुदीनुसार केलेले नवीन नामनिर्देशन तो अशा नोटीसीसोबत अथवा स्वतंत्रपणे पाठवील.]

(५) वर्गणीदारास नामनिर्देशनात खालील बाबीसंबंधी तरतूद करता येईल.

(क) कोणत्याही विनिर्दिष्ट नामनिर्देशित व्यक्तीबाबत ती व्यक्ती वर्गणीदाराच्या आधी मृत्यू पावल्यास अशा वेळी नामनिर्देशित व्यक्तीला प्रदान करण्यात आलेला हक्क, नामनिर्देशनात विनिर्दिष्ट करण्यात आलेला दुसऱ्या व्यक्तीला किंवा व्यक्तीकडे देण्यात येईल परंतु, असे की वर्गणीदाराच्या कुटुंबात इतर सदस्य असतील तर तो सदस्य किंवा ते सदस्य हे अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती असतील. वर्गणीदार या खंडाखाली असा हक्क एकापेक्षा अधिक व्यक्तींना प्रदान करील अशा बाबतीत तो अशा प्रत्येक व्यक्तीला देय असलेली रक्कम किंवा हिस्सा अशाप्रकारे विनिर्दिष्ट करील की, नामनिर्देशित व्यक्तींना देय असलेल्या संपूर्ण रकमेचा समावेश त्यात होईल.

(ख) नामनिर्देशनात विनिर्दिष्ट केलेली आकस्मिक घटना घडून आली तर ते नामनिर्देश विधीअग्राह्य होईल, परंतु जर नामनिर्देशन करण्याच्या वेळी वर्गणीदाराचे स्वतःचे कुटुंब नसेल तर नंतर कुटुंब प्राप्त केल्यानंतर ते नामनिर्देशन विधीअग्राह्य ठरेल, अशी तरतूद तो नामनिर्देशनात करील.

परंतु, असे नामनिर्देशन करताना वर्गणीदाराच्या कुटुंबात फक्त एकच व्यक्ती असेल तर खंड (क) खाली पर्यायी व्यक्तीला प्रदान करण्यात आलेला हक्क, वर्गणीदाराच्या कुटुंबात नंतर एक किंवा अधिक सदस्य तेथील अशावेळी विधीअग्राह्य ठरेल, अशी तरतूद तो नामनिर्देशनात करील.

(६) ज्या नामनिर्देशित व्यक्तीच्या बाबतीत नामनिर्देशनपत्रात, पोट-नियम ५ च्या खंड (क) खाली कोणतीही विशेष तरतूद केलेली नसेल अशा व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्वरित किंवा पोट-नियम (५), खंड (ख) किंवा त्याचे परंतुक याखाली ज्यामुळे नामनिर्देशन विधीअग्राह्य ठरेल अशी एखादी घटना घडली तर वर्गणीदार लेखा अधिकाऱ्याला ते नामनिर्देशन रद्द करणारी लेखी नोटीस या नियमाच्या तरतुदीनुसार केलेल्या नवीन नामनिर्देशनासह पाठवील.

(७) वर्गणीदाराने केलेले प्रत्येक नामनिर्देशन आणि नामनिर्देशन रद्द करण्यासाठी त्याने दिलेली प्रत्येक नोटीस ही विधिग्राह्य असेल तितपत लेखा अधिकाऱ्याला ती ज्या दिनांकास मिळेल त्या दिनांकापासून अंमलात येईल.

**स्पष्टीकरण** – या नियमात संदर्भावरून दुसरा अर्थ अपेक्षित असेल ते खेरीज करून, " व्यक्ती " या शब्द प्रयोगात कंपनी किंवा संघ किंवा व्यक्तींची संख्या मग ती विधि संस्थापित असो किंवा नसो- यांचा समावेश होतो.

---

[१] शासकीय अधिसूचना, दि. २७-६-१९८४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[२] शासकीय अधिसूचना, दि. २७-६-१९८४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

## वर्गणीदाराचे खाते

६. प्रत्येक वर्गणीदाराच्या नावे,

एक खाते उघडण्यात येईल, त्यामध्ये खालील रकमा जमा करण्यात येतील :-

(एक) वर्गणीदाराची वर्गणी

(दोन) शासनाने, नियम १० अन्वये त्याच्या खात्यात केलेली अंशदाने,

(तीन) नियम ११ द्वारे तरतूद केल्याप्रमाणे वर्गणीवरील व्याज, आणि

(चार) नियम ११ द्वारे तरतूद केल्याप्रमाणे अंशदानावरील व्याज.

## वर्गणीच्या अटी आणि दर

७. (१) प्रत्येक वर्गणीदार, कामावर असताना किंवा विदेशी सेवेत असताना, दरमहा निधीची वर्गणी देईल मात्र निलंबित असताना तो अशी वर्गणी देणार नाही. परंतु निलंबनाच्या कालावधीनंतर वर्गणीदार पुनःस्थापित झाल्यावर त्या कालावधीसाठी अनुज्ञेय असलेल्या वर्गणीच्या थकबाकीच्या कमाल रकमेपेक्षा अधिक नाही अशी कोणतीही रक्कम एकरकमी किंवा हप्ता यापैकी कोणत्याही प्रकारे देण्याची त्याला परवानगी देण्यात येईल.

(२) वर्गणीदार रजेवर असेल आणि त्याला त्या काळात रजावेतन मिळणार नसेल किंवा जे रजावेतन मिळणार असेल ते अर्धवेतन किंवा अर्धसरासरी वेतना इतके किंवा त्याहून कमी असेल तर रजेच्या काळात वर्गणी देणे, ही त्याच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून राहील.

(३) पोट-नियम (२) मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या रजेच्या कालावधीमधील वर्गणी न भरण्याचा आपला निर्णय वर्गणीदाराने खालीलप्रमाणे कळवावा :-

(क) जर तो स्वतःचे वेतन देयक स्वतःच तयार करणारा अधिकारी असेल तर रजेवर गेल्यानंतर तयार केलेल्या पहिल्या वेतन देयकात वर्गणीची वजात न करून,

(ख) जर तो स्वतःचे वेतन देयक स्वतःच तयार करणारा अधिकारी नसेल तर रजेवर जाण्यापूर्वी त्याच्या कार्यालय प्रमुखाला तशी लेखी सूचना देऊन जर अशी सूचना रीतसर व योग्यवेळी देण्यात आली नाही तर त्याने वर्गणी भरण्याचा निर्णय घेतला आहे, असे समजण्यात येईल. या पोट-नियमाखाली वर्गणीदाराने कळविलेला विकल्प अंतिम असेल.

(४) नियम २४ अन्वये ज्या वर्गणीदाराने वर्गणीची व त्यावरील व्याजाची रक्कम काढून घेतली असेल, तो वर्गणीदार अशी रक्कम काढून घेतल्यानंतर पुन्हा कामावर रूजू झाल्याखेरीज व रूजू होईपर्यंत त्याने निधीमध्ये वर्गणी भरता कामा नये.

*[(५) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, वर्गणीदार ज्या महिन्यात नोकरी सोडील त्या महिन्याची वर्गणी, त्याने कार्यालय प्रमुखास उक्त महिन्यात प्रारंभापूर्वी उक्त महिन्याची वर्गणी देण्यासंबंधीचा त्याचा लेखी विकल्प कळविला नसेल तर भरता कामा नये.]

८. (१) वर्गणीची रक्कम, खालील शर्तींना अधीन राहून, वर्गणीदार स्वतःच निश्चित करील–

(क) ती पूर्ण रुपयात दर्शवलेली असेल,

(ख) अशा रीतीने दर्शवलेली कोणतीही रक्कम, त्याच्या वित्तलब्धीच्या ८% टक्क्यांहून कमी आणि एकूण वित्तलब्धीपेक्षा जास्त नसेल.

* शासकीय अधिसूचना, दि. १०-१२-१९८१ द्वारे हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

(२) पोट-नियम (१) च्या प्रयोजनार्थ, वर्गणीदाराची वित्तलब्धी पुढीलप्रमाणे असेल :-

(क) मागील वर्षाच्या ३१ मार्च रोजी शासकीय सेवेत असलेल्या वर्गणीदाराच्या बाबतीत, त्या दिनांकास तो ज्या वित्तलब्धीस हक्कदार होता, अशी वित्तलब्धी, परंतु,-

(एक) जर वर्गणीदार, उक्त दिनांकास रजेवर असेल आणि अशा रजेच्या कालावधीत त्याने वर्गणी न भरण्याचा निर्णय घेतला असेल किंवा उक्त दिनांकास तो निलंबनाधीन असेल तर, त्याची वित्तलब्धी ही, तो कामावर रुजू झाल्यानंतर पहिल्या दिवशी तो ज्या वित्तलब्धीस हक्कदार असेल, अशी वित्तलब्धी.

(दोन) जर वर्गणीदार, उक्त दिनांकास प्रतिनियुक्तीवर भारताच्या बाहेर गेला असेल किंवा उक्त दिनांकास तो रजेवर गेला असेल आणि त्याची रजा चालू असेल आणि त्याने या रजेच्या कालावधीत वर्गणी देण्याचा निर्णय घेतला असेल, तर तो भारतात सेवेत असता तर, जी वित्तलब्धी मिळण्यास तो हक्कदार ठरला असता ती वित्तलब्धी.

(तीन) जर वर्गणीदार, त्या दिनांकानंतरच्या दिवशी प्रथमच निधीचा वर्गणीदार झाला असेल तर, अशा नंतरच्या दिनांकास जी वित्तलब्धी मिळण्यास तो हक्कदार ठरला असेल, ती वित्तलब्धी.

(ख) जो वर्गणीदार, मागील वर्षाच्या ३१ मार्च रोजी शासकीय सेवेत नव्हता, अशा वर्गणीदाराच्या बाबतीत, त्याच्या सेवेच्या पहिल्या दिवशी किंवा जर तो त्या दिनांकानंतरच्या दिवशी प्रथमच निधीचा वर्गणीदार झाला असेल, तर अशा नंतरच्या दिनांकास जी वित्तलब्धी मिळण्यास तो हक्कदार ठरला असेल, ती वित्तलब्धी :

परंतु, जर वर्गणीदाराच्या वित्तलब्धी चढउतारी स्वरूपाच्या असतील तर, मुंबई शासन निदेश देईल अशा रीतीने त्याची परिगणना करण्यात येईल.

(३) वर्गणीदाराने प्रत्येक वर्षी त्याच्या मासिक वर्गणीची रक्कम निश्चित करण्यासंबंधी सूचना खालीलप्रमाणे द्यावी :-

(क) जर तो, निकटपूर्वीच्या वर्षाच्या ३१ मार्च रोजी कामावर असेल, तर तो त्या महिन्यात त्याच्या वेतन देयकातून यासाठी जी वजात करील, त्या वजातीद्वारे ;

(ख) जर तो मागील वर्षाच्या ३१ मार्च रोजी रजेवर असेल आणि या रजेच्या कालावधीत वर्गणी न देण्याचा त्याने निर्णय घेतला असेल किंवा त्या दिनांकास तो निलंबनाधीन असेल, तर कामावर रुजू झाल्यानंतरच्या त्याच्या पहिल्या वेतनदेयकात यासाठी जी वजात करील, त्या वजातीद्वारे ;

(ग) जर त्या वर्षी शासकीय सेवेत तो प्रथमच प्रवेश करीत असेल किंवा निधीचा प्रथमच वर्गणीदार होत असेल तर तो निधीचा ज्या महिन्यात वर्गणीदार होईल, त्या महिन्याच्या वेतन देयकात यासाठी जी वजात करील, त्या वजातीद्वारे ;

(घ) जर तो मागील वर्षाच्या ३१ मार्च रोजी रजेवर असेल आणि त्याची रजा चालू असेल आणि त्याने अशा रजेच्या कालावधीत वर्गणी देण्याचा निर्णय घेतला असेल तर, त्या महिन्याच्या वेतन देयकात त्याने यासाठी जी वजात केली असेल, त्या वजातीद्वारे ;

(ङ) जर मागील वर्षाच्या ३१ मार्च रोजी तो स्वीयेतर सेवेत असेल, तर चालू वर्षाच्या एप्रिल महिन्यात वर्गणी म्हणून कोषागारामध्ये त्याने जमा केलेल्या, रकमेद्वारे ;

(च) जर त्याची वित्तलब्धी पोट-नियम (२) च्या परंतुकामध्ये निर्देशलेल्या स्वरूपाची असेल, तर मुंबई शासन निदेश देईल त्या पद्धतीने.

*[(४) अशा प्रकारे निश्चित केलेली वर्गणीची रक्कम-

(क) वर्षामध्ये कोणत्याही वेळी एकदाच कमी करता येईल ; किंवा

(ख) वर्षामध्ये दोनदा वाढवता येईल ; किंवा

(ग) पूर्वी म्हटल्याप्रमाणे कमी करता येईल किंवा वाढवता येईल :

परंतु अशा प्रकारे वर्गणीची रक्कम कमी करण्यात येईल तेव्हा, ती, पोटनियम (१) मध्ये विहित केलेल्या किमान मर्यादेपेक्षा कमी असता कामा नये :

परंतु आणखी असे की, जर वर्गणीदार कोणत्याही कॅलेंडर महिन्याच्या काही भागात अवेतनिक किंवा अर्धवेतनी किंवा अर्ध सरासरी वेतन रजेवर असेल, आणि अशा रजेच्या कालावधीत, वर्गणी न भरण्याचा निर्णय त्याने घेतला असेल तर, देय असलेली वर्गणीची रक्कम ही, वर निर्दिष्ट केलेल्या रजा व्यतिरिक्त, इतर कोणतीही रजा असल्यास ती धरून, त्याने काम केलेल्या दिवसांच्या प्रमाणानुसार होईल तितकी असेल.]

**८ क.** जेव्हा एखाद्या वर्गणीदाराची स्वीयेतर सेवेत बदली केली असेल किंवा त्यास प्रतिनियुक्तीवर भारताच्या बाहेर पाठवले असेल, तेव्हा जणू काही त्याची बदली झालेली नाही किंवा त्याला प्रतिनियुक्तीवर पाठवलेले नाही असे समजून तो भविष्य निर्वाह निधी नियमांना अधीन राहील.

**८ कक.** या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, वेतनाच्या किंवा भत्त्याच्या दराची सर्वसाधारण पुनर्रचना करण्यात असल्यामुळे, वेतन व भत्ते यांची, वर्गणीदाराच्या नावे कोणत्याही वेळी जमा होणारी थकबाकी राज्य शासनाने तसा निदेश दिला असेल तर, निधीमध्ये त्याच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

**वर्गणीची वसुली**

९.(१) जेव्हा वित्तलब्धी भारतातील सरकारी कोषागारातून किंवा भारताबाहेरील संवितरणाचे प्राधिकार दिलेल्या कार्यालयातून मिळत असेल, तेव्हा या वित्तलब्धी आणि आगाऊ रकमा यादाखलची वर्गणीची वसुली उक्त वित्तलब्धीमधूनच करण्यात येईल.

(२) जेव्हा वित्तलब्धी इतर कोणत्याही मार्गाने दिली जात असेल अशा बाबतीत वर्गणीदार त्याच्या देय रकमा दरमहा लेखा अधिकाऱ्याकडे पाठवील :

परंतु शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाच्या नियंत्रणाखालील महामंडळाकडे वर्गणीदाराला प्रतिनियुक्तीवर पाठवले असेल तेव्हा, महामंडळ त्याच्या वित्तलब्धीमधून त्याच्या देय रकमा वसूल करील आणि त्या लेखा अधिकाऱ्याकडे पाठवील.

**शासनाचे अंशदान**

१०. (१) शासन दरवर्षी ३१ मार्च पासून, प्रत्येक वर्गणीदाराच्या खात्यामध्ये अंशदान करील :

परंतु वर्गणीदाराने एखाद्या वर्षात सेवा सोडून दिली असेल किंवा त्याचा मृत्यू झाला असेल तर, मागील वर्षाच्या अखेरपासून अशा घटनेच्या किंवा दुर्घटनेच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी त्याच्या खात्यावर अंशदान जमा केले जाईल :

परंतु आणखी असे की, वर्गणीदाराला नियमानुसार ज्या कालावधीत निधीची वर्गणी न भरण्याची परवानगी देण्यात आली असेल किंवा तो वर्गणी भरत नसेल, अशा कोणत्याही कालावधीच्या संबंधात, कोणतेही अंशदान देय होणार नाही.

---

* शासकीय अधिसूचना, दिनांक १०-१२-१९८१ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

(२) शासनाने, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विहित केले असेल किंवा शासन विहित करील त्याप्रमाणे वर्षभरात किंवा यथास्थिती कर्तव्यार्थ कालावधीत काढण्यात आलेल्या वर्गणीदाराच्या वित्तलब्धीच्या टक्केवारी इतके अंशदान असेल :

परंतु, जर नजर चुकीने किंवा अन्य कारणामुळे भरण्यात आलेली वर्गणीची रक्कमही नियम ८ च्या पोट-नियम (१) आणि (२) अनुसार वर्गणीदाराने देय असलेल्या किमान वर्गणीच्या रकमेहून, कमी होत असेल आणि अशी कमी भरलेली वर्गणीची रक्कम, त्यावर उपर्जित झालेल्या व्याजासहित, जे प्राधिकरण, निधीतून आगाऊ रक्कम मंजूर करण्यास सक्षम असते-अशा मंजुरीसाठी नियम १२ च्या खंड (ख) किंवा खंड (ग) अनुसार विशेष कारणे देण्याची आवश्यकता असते-त्या प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केले असेल, त्या कालावधीत भरली नसेल तर, शासनाकडून देय असलेले अंशदान, शासनाने कोणत्याही विशिष्ट प्रकरणी अन्यथा निदेश दिला नसेल तर, वर्गणीदाराने प्रत्यक्ष भरलेली रक्कम किंवा शासनाकडून सामान्यतः देय असेल तितकी रक्कम, यापैकी कमी असेल, त्या रकमेइतकी असेल.

(३) जर वर्गणीदार भारताबाहेर प्रतिनियुक्तीवर गेला असेल तर, या नियमाच्या प्रयोजनासाठी, तो भारतात कामावर असता तर त्याला जी वित्तलब्धी मिळाली असती ती वित्तलब्धी त्याला कामावर असताना मिळालेली वित्तलब्धी मानण्यात येईल.

(४) जर वर्गणीदाराने रजेच्या कालावधीत वर्गणी देण्याचा निर्णय घेतला असेल तर, या नियमाच्या प्रयोजनांसाठी, त्याचे रजावेतन हे, त्याला कामावर असताना मिळालेली वित्तलब्धी मानण्यात येईल.

(५) जर वर्गणीदाराने निलंबनाच्या कालावधीच्या बाबतीत वर्गणीची थकबाकी भरण्याचा निर्णय घेतला असेल, तर, पुनःस्थापनाच्या कालावधीसाठी त ना करर .. न आलेली वित्तलब्धी किंवा वित्तलब्धीचा काही भाग, या नियमाच्या प्रयोजनासाठी, त्याला कामावर असताना लेली वित्तलब्धी मानण्यात येईल.

(६) स्वीयेतर सेवेच्या कालावधीच्या संदर्भात देय असणाऱ्या कोणत्याही अंशदानाची रक्कम, ती स्वीयेतर सेवायोजकाकडून वसूल केली नसेल तर, शासन वर्गणीदाराकडून वसूल करील.

(७) देय असलेली अंशदानाची रक्कम, नजिकच्या पूर्ण रुपयात मोजण्यात येईल (पन्नास नवे पैसे पुढील पूर्ण रुपया म्हणून मोजले जातील).

[1][टीप.–ज्या शासकीय कर्मचाऱ्यांना, या नियमांतील नियम ४, पोट-नियम (१) खंड (एक) च्या उपखंड (क) आणि (ख) अनुसार, अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी (मुंबई) याचा वर्गणीदार होण्याचा हक्क असेल, अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी लेख्यामध्ये, शासनाने द्यावयाचे अंशदान, १ मे, १९६० पासून पुढीलप्रमाणे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

(एक) ज्या शासकीय कर्मचाऱ्याने, १ मे, १९६० च्यापूर्वी निधीचा वर्गणीदार झाल्यानंतर त्याच्या वेतनाच्या ८ १/३ टक्के (म्हणजेच १/१२) दराने अंशदान जमा केले होते, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासनाने द्यावयाच्या अंशदानाची रक्कम, वर्षभरात किंवा यथास्थिती कालावधीत कामावर असताना त्याला मिळालेल्या वित्तलब्धीच्या ८ १/३ टक्के इतकी असेल ;

(दोन) जो शासकीय कर्मचारी त्या दिनांकानंतर निधीचा वर्गणीदार झाला असेल, त्याच्या बाबतीत, शासनाने वर्गणीदाराच्या खात्यावर जमा करावयाच्या अंशदानाची रक्कम वर्षभरात किंवा, यथास्थिती कालावधीत कामावर असताना त्याला मिळालेल्या वित्तलब्धीच्या ८ १/३ टक्के (म्हणजेच १/१२) टक्के इतकी असेल.]

---

[1] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९७६ द्वारे दाखल करण्यात आला.

## व्याज

११. (१) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीवर द्यावयाच्या व्याजासाठी शासन वेळोवेळी विहित करील अशा दराने, वर्गणीदाराच्या खात्यावर निधीमध्ये जमा असलेल्या रकमेवरील व्याज वर्गणीदाराच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

(२) प्रत्येक वर्षी ३१ मार्चपासून खालील पद्धतीने व्याज जमा करण्यात येईल :-

(एक) चालू वर्षात काढून घेतलेल्या रकमा वजा करुन, मागील वर्षाच्या ३१ मार्च रोजी वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेवर बारा महिन्याचे व्याज ;

(दोन) चालू वर्षात काढून घेतलेल्या रकमेवर चालू वर्षाच्या १ एप्रिलपासून, ज्या महिन्यात रक्कम काढून घेतली होती, त्याच्या मागील महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यन्तचे व्याज ;

(तीन) मागील वर्षातील ३१ मार्च नंतर वर्गणीदाराच्या खात्यावर जमा करण्यात आलेल्या सर्व रकमांवर त्या रकमा ठेवण्यात आल्याच्या दिनांकापासून चालू वर्षातील ३१ मार्च पर्यन्तचे व्याज ;

(चार) नियम १० च्या पोटनियम (६) मध्ये तरतूद केलेल्या पद्धतीने, व्याजाची एकूण रक्कम नजिकच्या संपूर्ण रुपयात मोजण्यात येईल :

परंतु वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेली रक्कम देय झाले असेल तेव्हा, चालू वर्षाच्या सुरुवातीपासून किंवा यथास्थिती ती ठेवल्याच्या दिनांकापासून, त्याच्या खाती असलेली रक्कम देय होणार असेल, त्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठीच, त्या रकमेवरील व्याज या पोटनियमाखाली त्याच्या खाती जमा केले जाईल.

(३) या नियमाच्या प्रयोजनासाठी, वित्तलब्धीमधून करण्यात आलेल्या वसूलीबाबत, ठेवीचा दिनांक, वसुली ज्या महिन्यात करण्यात आली, त्या महिन्याचा पहिला दिवस समजला जाईल, आणि वर्गणीदाराने पाठवलेल्या रकमेबाबत, त्या महिन्याच्या पाचव्या दिवसाच्या आत लेखा अधिकाऱ्याला ती रक्कम पोचली असेल, तर ती ज्या महिन्यात मिळाली त्या महिन्याचा पहिला दिवस किंवा ही रक्कम त्या महिन्याच्या पाचव्या दिवशी किंवा त्यानंतर पोचली असेल तर, त्याच्या लगतनंतरच्या महिन्याचा पहिला दिवस, हा ठेवीचा दिनांक समजला जाईल :

परंतु, नियम ९ च्या पोटनियम (२) मधील परंतुकाखाली पाठवण्यात आलेल्या रकमेबाबत, जर ही रक्कम, लेखा अधिकाऱ्याकडे महिन्याच्या पंधराव्या दिवसापूर्वी पोचली असेल, तर त्या महिन्याचा पहिला दिवस हा ठेवीचा दिनांक समजला जाईल :

परंतु, आणखी असे की, महिन्यातील वित्तलब्धी त्याच महिन्यातील शेवटच्या कामाच्या दिवशी काढण्यात येऊन संवितरित केल्या जात असतील, तर अशा बाबतीत, त्याच्या वर्गणीच्या वसुलीच्या बाबतीत ठेवीचा दिनांक हा लगतनंतरच्या महिन्याचा पहिला दिवस समजला जाईल ;

(३क) वर्गणीदाराचे वेतन किंवा रजावेतन काढण्यात विलंब झाल्याकारणाने वर्गणीच्या वसुलीस विलंब झाला असेल तर कोणत्या महिन्यात ते वेतन प्रत्यक्षात काढण्यात आले, हे विचारात न घेता, वर्गणीदाराचे वेतन किंवा रजावेतन ज्या महिन्यात देय असेल त्या महिन्यापासून अशा वर्गणीवरील व्याज देय होईल.

(४) नियम २७ अन्वये द्यावयाच्या रकमेबरोबरच, ज्या महिन्यात ही रक्कम दिली गेली, त्या अगोदरच्या महिन्याच्या अखेरपर्यन्त किंवा ही रक्कम देय झाल्यानंतरच्या सहाव्या महिन्याच्या अखेरपर्यन्त, यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कोणत्याही कालावधीसाठी अशा रकमेवरील व्याज, अशी रक्कम जिला द्यावयाची असेल अशा कोणत्याही व्यक्तीला देय असेल ;

परंतु, लेखा अधिकाऱ्याने, ज्या दिनांकास ही रक्कम रोख देण्यास आपण तयार असल्याचे त्या व्यक्तीला (किंवा तिच्या प्रतिनिधीला) कळवले असेल, त्या दिनांकानंतर किंवा जर तो या रकमेचे प्रदान धनादेशाने करणार असेल तर, त्या व्यक्तीच्या नावे काढलेल्या धनादेश ज्या दिनांकास टपालाने पाठवला असेल, त्या दिनांकानंतर कोणत्याही कालावधीच्या बाबतीत व्याज दिले जाणार नाही ;

[1][परंतु आणखी असे की, शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या एखाद्या निगम निकायामध्ये किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) अन्वये नोंदलेल्या एखाद्या स्वायत्त संघटनेमध्ये प्रतिनियुक्तीवर असलेल्या वर्गणीदारास भूतलक्षी दिनांकापासून अशा निगम निकायामध्ये किंवा संघटनेमध्ये सामावून घेण्यात आल्यास, त्या वर्गणीदाराच्या निधीमधील जमा रकमांवर देय होणारे व्याज मोजण्याच्या प्रयोजनार्थ, त्याला सामावून घेण्यासंबंधीच्या आदेशाचा दिनांक हा वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेली रक्कम देय झाल्याचा दिनांक मानण्यात येईल. तथापि, त्याला सामावून घेतल्याच्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या व सामावून घेतल्याच्या दिनांकापर्यन्तच्या कालावधीमध्ये वर्गणी म्हणून वसूल केलेली रक्कम ही, केवळ या पोटनियमाखाली व्याज देण्याच्या प्रयोजनार्थ, निधीमधील वर्गणी असल्याचे मानण्यात येईल, या शर्तीच्या अधीन असेल.]

[2][टीप-निधीतील शिल्लक रकमेवरील व्याज सहा महिन्याहून अधिक काळाने देण्यास मुख्य लेखा अधिकाऱ्यास त्याने वर्गणीदाराच्या [3][किंवा ज्यांना असे प्रदान करावयाचे होते,] अशा व्यक्तीच्या आवाक्याबाहेरील परिस्थितीमुळे, त्याच्या कार्यालयाकडून अधिकृत मंजुरी देण्यास विलंब झाला, असल्याबद्दल प्रत्यक्ष खात्री पटवून घेतल्यानंतर एका वर्षापर्यंत त्यास अधिकृत मंजुरी देता येईल.

आणि अशा प्रत्येक प्रकरणामध्ये, त्याच्या कार्यालयातील बाबीसंबंधात झालेल्या प्रशासनिक विलंबासंबंधी संपूर्ण चौकशी करण्यात येईल व त्यासंबंधी कार्यवाही करणे आवश्यक असेल तर, अशी कार्यवाही करण्यात येईल.]

(५) मुसलमान वर्गणीदाराच्या बाबतीत, जर त्याने व्याज घेण्याची आपली इच्छा नाही, असे लेखा अधिकाऱ्याला कळवले असेल, तर त्याच्याखाती व्याज जमा केले जाणार नाही, पण नंतर जर त्याने व्याजाची मागणी केली, तर ज्या वर्षात त्याने मागणी केली असेल त्या वर्षीच्या १ एप्रिलपासून त्याच्या खाती व्याज जमा केले जाईल.

(६) नियम २४ [4][ * * * ] अनुसार, वर्गणीदाराच्या निधीमधील खात्यात ज्या रकमा पुनःस्थापित करण्यात आल्या असतील, त्या रकमांवरील व्याज या नियमाच्या पोटनियम (१) खाली नंतर विहित करण्यात येईल अशा दराने आणि शक्य असेल तोवर या नियमात वर्णन केलेल्या पद्धतीनुसार मोजण्यात येईल.

---

[1] शासकीय अधिसूचना दिनांक २७-६-१९८४ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना दिनांक ९-८-१९८५ द्वारे बदली दाखल केला.

[3] शासकीय अधिसूचना दिनांक ८-५-१९८७ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[4] हा मजकूर शासकीय अधिसूचना दिनांक २३-३-१९८६ द्वारे वगळण्यात आला.

## निधीमधून मिळणारी अग्रिमे

१२. (१) निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेतून त्याला पाचव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या समुचित प्राधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार खाली शर्तीवर तात्पुरते अग्रिम मंजूर करता येईल :-

(क) अर्जदाराची आर्थिक परिस्थिती विचारात घेता, त्याला अग्रिम मंजूर करणे समर्थनीय आहे आणि ते खाली नमूद केलेल्या उद्दिष्टांसाठी किंवा उद्दिष्टासाठीच केवळ खर्च करण्यात येईल, अशी मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याची खात्री जोवर होत नाही, तोवर कोणतेही अग्रिम मंजूर केले जाणार नाही :-

(एक) आजारापणाचा किंवा प्रसूतीचा खर्च भागवण्यासाठी, आणि आवश्यक असेल तेथे वर्गणीदार [1][व त्याचे कुटुंबीय ] किंवा त्यांच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली कोणतीही व्यक्ती यांच्या प्रवासाच्या खर्चाचाही त्यात समावेश होईल ;

(दोन) खाली नमूद केलेल्या प्रकरणांत, उच्च शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी, आणि आवश्यक असेल तेथे वर्गणीदार [व त्यांचे कुटुंबीय] किंवा प्रत्यक्ष त्याच्यावर अवलंबून असलेली कोणतीही व्यक्ती, यांच्या प्रवासाच्या खर्चाचा समावेश होईल-

(१) माध्यमिक शाळेच्या टप्प्यानंतर भारताबाहेरच्या शैक्षणिक, तांत्रिक, धंदेशिक्षण किंवा व्यवसायिक शिक्षणक्रमाचा खर्च भागवण्यासाठी ; आणि

(२) माध्यमिक शाळेच्या टप्प्यानंतरच्या भारतातील कोणत्याही वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा अन्य तांत्रिक किंवा विशेषीकृत शिक्षणक्रमांच्या किंवा कोणत्याही सैनिकी किंवा लष्करी शाळेत माध्यमिक शाळेच्या टप्पा खालील लष्करी शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी, मात्र हा अभ्यासक्रम तीन वर्षांपेक्षा कमी असणार नाही ;

(तीन) [2]( वाङ्निश्चय किंवा विवाह), अंत्यसंस्कार किंवा इतर धार्मिक कार्यासाठी वर्गणीदारास परंपरागत रूढीनुसार त्याच्या दर्जानुसार समुचित असा जो खर्च करणे भाग असेल तो खर्च भागविण्यासाठी ;

[3][ (चार) वर्गणीदार, त्याच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती किंवा त्याच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली एखादी व्यक्ती यांनी किंवा त्यांच्याविरुध्द दाखल केलेल्या कायदेशीर कार्यवाहीचा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून त्याच प्रयोजनासाठी अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही अन्य शासकीय अग्रिमाव्यतिरिक्त याबाबतीत उपलब्ध असलेले अग्रिम देणे ;

(पाच) वर्गणीदाराने त्याच्या एखाद्या अभिकथित कार्यालयीन गैरवर्तनाच्या संबंधातील चौकशीमध्ये त्याचा बचाव करण्यासाठी विधी व्यवसायी नेमला असल्यास, त्याच्या बचावासाठी झालेला खर्च भागविण्यासाठी ; ]

(सहा) वर्गणीदार आपली पदीय कर्तव्ये पार पाडण्याच्या संबंधातील कोणत्याही बाबीच्या संबंधात एखाद्या खाजगी पक्षकाराने वर्गणीदाराविरुध्द दाखल केलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीचा खर्च भागविण्यासाठी ;

---

[1] हा मजकूर शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९७७ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २०-६-१९८४ द्वारे दाखल करण्यात आला.

[3] शासकीय अधिसूचना, दिनांक १०-१२-१९८१ द्वारे दाखल करण्यात आला.

[1][(सात) त्याच्या निवासाकरिता, भूखंडाची किंमत किंवा घर अथवा फ्लॅट बांधण्यासाठीचा खर्च भागविण्यासाठी अथवा शहर व औद्योगिक विकास महामंडळातर्फे किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे किंवा एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतर्फे देण्यात आलेल्या भूखंडासाठी किंवा फ्लॅटसाठी द्यावयाची रक्कम देण्याकरिता.]

(ख) विशेष कारणे वगळता, असे अग्रिम, तीन महिन्यांचे वेतन किंवा वर्गणीदाराच्या खात्यावर निधीमध्ये जमा असणारी वर्गणीची रक्कम व त्यावरील व्याज यांसहित एकूण रक्कम, यापैकी कमी असेल त्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

टीप.–या नियमाच्या प्रयोजनार्थ, "वेतन" या संज्ञेत "महागाई वेतनाचा" समावेश होत नाही.

(ग) विशेष कारणे वगळता, मंजूर करावयाचे अग्रिम हे पूर्वीच्या कोणत्याही अग्रिमाच्या शेवटच्या हप्त्याची परतफेड झाल्यानंतर किमान ३ महिने होईपर्यंत [2][ * * * ] यापूर्वी देण्यात आलेल्या अग्रिमाची रक्कम ही खंड (ख) अन्वये अनुज्ञेय असलेल्या रकमेच्या दोन तृतियांशाहून अधीक होणार नाही एवढी असल्याखेरीज मंजूर करता येणार नाही.

(गग) खंड (ख) व (ग) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, खंड (क) चे उप-खंड (चार), (पाच) किंवा (सहा) यांमध्ये नमूद केलेल्या उद्दिष्टांसाठी मंजूर करावयाचे अग्रिम, तीन महिन्यांचे वेतन किंवा रुपये ५०० यापैकी जी रक्कम अधिक असेल, त्या रकमेपेक्षा जास्त असता कामा नये आणि कोणत्याही बाबतीत ते निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली वर्गणीची रक्कम व त्यावरील व्याज यापेक्षा अधिक असता कामा नये.

[3][(गगग) पूर्वीच्या अग्रिमाच्या शेवटच्या हप्त्याची परतफेड होण्यापूर्वी, खंड (ग) खाली जर अग्रिम मंजूर करण्यात आले असेल, तर, आधीच्या अग्रिमाची वसूल न झालेली शिल्लक रक्कम अशा मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमात मिळवण्यात येईल आणि वसुलीचे हप्ते एकत्रित रकमेच्या संदर्भात निश्चित केले जातील.]

(घ) मंजुरी देणारा प्राधिकारी, अग्रिमाला मंजुरी देताना त्याची कारणे अभिलिखित करील :

परंतु, जर कारण गोपनीय स्वरूपाचे असेल तर लेखा अधिकाऱ्यास ते प्रत्यक्ष आणि/किंवा गोपनिय रीत्या कळवता येईल.

(२) पोट-नियम (१) च्या खंड (ख) आणि (ग) मध्ये नमूद केलेल्या शर्तीस अधीन राहून, शासनास, विशेष परिस्थितीत, पोटनियम (१) च्या खंड (क) मध्ये निर्देशित केलेल्या कारणाव्यतिरिक्त, इतर कारणांसाठी संबंधित वर्गणीदाराला अग्रिम आवश्यक आहे, याबाबत शासनाची खात्री झाली असेल तर शासनास, अग्रिम मंजूर करता येईल.

[4][(३) अग्रिमाची रक्कम मंजूर करण्यात आल्यानंतर, ज्या प्रकरणी अंतिम प्रदानाचा अर्ज नियम २७ च्या पोटनियम (३) मधील खंड (दोन) अन्वये लेखा अधिकाऱ्याकडे पाठवण्यात आलेले असतील, अशा प्रकरणी ती रक्कम, लेखा अधिकाऱ्याने प्राधिकृत केल्यानंतर काढण्यात येईल.]

---

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २७-८-१९८४ द्वारे जादा दाखल करण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २३-४-१९८६ द्वारे वगळण्यात आला.

[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९८६ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

[4] शासकीय अधिसूचना, दिनांक २७-८-१९८४ द्वारे जादा दाखल करण्यात आला.

१३. [वगळण्यात आला.]

१४. (१) वर्गणीदाराकडून अग्रिमाची वसुली, मंजुरी देणारा प्राधिकारी ज्याप्रमाणे निदेश देईल तितक्या समान मासिक हप्त्यांत करण्यात येईल. परंतु वर्गणीदाराने वेगळा पर्याय दिला नसेल तर अशा हप्त्यांची संख्या बारापेक्षा कमी असता कामा नये आणि ती चोवीसपेक्षा अधिक असता कामा नये. नियम १२ च्या खंड (ख) अन्वये अग्रिमाची रक्कम, वर्गणीदाराच्या तीन महिन्यांच्या वेतनापेक्षा अधिक होईल, अशा विशेष प्रकरणामध्ये मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याला अशा हप्त्यांची संख्या चोवीसपेक्षा अधिक ठरवता येईल. मात्र कोणत्याही बाबतीत ती छत्तीस पेक्षा अधिक असता कामा नये. वर्गणीदारास, स्वेच्छेने विहित हप्त्यांपेक्षा कमी हप्त्यांमध्ये परतफेड करता येईल. प्रत्येक हप्ता पूर्ण रुपयांमध्ये असावा, असा निश्चित केलेले हप्ते मान्य करण्यासाठी आवश्यक असेल तर, अग्रिमाची रक्कम कमी किंवा जास्त करता येईल.

(२) अग्रिमाची वसुली, नियम ९ मध्ये वर्गणीच्या वसुलीबाबत तरतूद केलेल्या पद्धतीनुसार केली जाईल आणि ही वसुली, अग्रिम ज्या महिन्यात काढण्यात आले त्यानंतरच्या महिन्याच्या वेतनापासून सुरू केली जाईल. वर्गणीदाराला जेव्हा निर्वाह अनुदान मिळत असेल किंवा तो १[कोणत्याही कॅलेंडर महिन्यात दहा दिवस अथवा त्याहून अधिक काळ] रजेवर असेल आणि त्या कालावधीत एकतर रजावेतन मिळणार नसेल किंवा हे रजावेतन अर्धवेतना इतके किंवा अर्ध सरासरी वेतनाइतके किंवा त्यापेक्षा किंवा असेल तर वर्गणीदाराच्या संमती शिवाय वसुली करण्यात येऊ नये. अशी वसुली, वर्गणीदाराने लेखी विनंती केल्यास, त्याला देण्यात आलेल्या वेतनाच्या अग्रिमाच्या वसुलीच्या कालावधीत मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याला स्थगित करता येईल.

२[* * * * *]

(३) जर वर्गणीदाराला अग्रिम मंजूर करण्यात आले असेल आणि त्याने ते प्रत्यक्ष घेतले असेल आणि नंतर त्याची संपूर्ण परतफेड होण्यापूर्वी ते नामंजूर करण्यात आले असेल तर घेतलेल्या अग्रिमाची संपूर्ण रक्कम किंवा शिल्लक रक्कम वर्गणीदाराला ३[* * * *] तात्काळ निधीत भरावी लागेल किंवा तसे करण्यात कसूर झाल्यास नियम १२ च्या खंड (ख) किंवा खंड (ग) खाली त्यासाठी विशेष कारणांची आवश्यकता आहे तशा अग्रिमास मंजुरी देण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकाऱ्याने निर्देशित केले असेल त्या वर्गणीदाराच्या मिळणाऱ्या वितलब्धीमधून एक रकमी किंवा जास्तीत जास्त बारा हप्त्यात वजा करून वसुल करण्याबाबत लेखा अधिकारी निदेश देईल.

(४) या नियमाखाली करण्यात येणारी वसुली, ती जशजशी करण्यात येईल त्याप्रमाणे वर्गणीदाराच्या निधीमधील लेख्यात जमा केली जाईल.

४[१४-क. ५[(१) नियम १२ च्या पोट-नियम [१] च्या खंड (ख) खाली विशेष कारणासाठी अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकाऱ्यांना येथे नमूद केलेल्या शर्तींच्या अधीनतेने, पुढीलपैकी कोणत्याही वेळी अग्रिम काढण्यास मंजूरी देता येईल :—

(क) एखाद्या वर्गणीदाराची वीस वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर (सेवेमध्ये खंड झालेला असल्यास खंडित सेवेचा समावेश करून) अथवा त्याचे नियत वयमान होऊन तो सेवानिवृत्त होण्यापूर्वीची दहा वर्षे, यापैकी जो अगोदरचा कालावधी असेल त्यावेळी निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यामधून पुढीलपैकी एका किंवा अनेक प्रयोजनार्थ, म्हणजेच :—

(क) (एक) माध्यमिक शाळेच्या टप्प्यानंतर शैक्षणिक, तांत्रिक व्यावसायिक अथवा धंदाविषयक पाठ्यक्रम भारताबाहेर पूर्ण करण्याकरिता, आणि

---

१ शासकीय अधिसूचना, दिनांक २७-६-१९८४ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२ शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९८६ द्वारे वगळण्यात आला.

३ शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९८६ द्वारे वगळण्यात आला.

४ शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९८६ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

५ शासकीय अधिसूचना, दिनांक २७-६-१९८४ द्वारे दाखल करण्यात आला.

(दोन) माध्यमिक शाळेच्या टप्प्यानंतरच्या कोणताही वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा अन्य तांत्रिक किंवा विशेषीकृत पाठ्यक्रम भारतात पूर्ण करण्यासाठी;

आवश्यक असेल तेव्हा, वर्गणीदार किंवा त्याचे कोणतेही मूल यांच्या प्रवास खर्चासह उच्च शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी,

(ख) वर्गणीदार अथवा त्याचे मुलगे किंवा मुली अथवा त्याच्यावर प्रत्यक्षपणे अवलंबून असलेली त्याच्या नात्यातील अन्य कोणतीही स्त्री यांचा वाङ्‌निश्चय किंवा विवाह, या संबंधातील खर्च भागविण्याकरिता;

(ग) वर्गणीदार आणि त्याचे कुटुंबिय अथवा त्याच्यावर प्रत्यक्षपणे अवलंबून असलेली अन्य व्यक्ती यांच्या संबंधातील आजारपणाचा खर्च आवश्यक असेल तर, प्रवास खर्चासह भागविण्याकरिता;

**(ख)** वर्गणीदाराच्या सेवेची पंधरा वर्षे पूर्ण झाल्यानंतर (सेवेमध्ये खंड झालेला असल्यास, खंडित सेवेचा समावेश करुन) किंवा नियत वयोमानामुळे तो ज्या दिनांकास सेवानिवृत्त होईल, त्या दिनांकापूर्वी दहा वर्षांमध्ये, यापैकी जो अगोदरचा कालावधी असेल त्यावेळी निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा असेल ती रक्कम व त्यावरील व्याज यामधून पुढीलपैकी एका किंवा अनेक प्रयोजनार्थ, म्हणजेच :—

(क) त्याला राहण्यासाठी तयार असे घर किंवा फ्लॅट बांधण्यासाठी किंवा संपादित करण्यासाठी यात जागेच्या किंमतीचा समावेश आहे;

(ख) त्याला राहण्यासाठी तयार असे घर किंवा फ्लॅट बांधण्यासाठी किंवा संपादित करण्यासाठीच केवळ घेतलेल्या कर्जाची अदत्त रक्कम फेडण्यासाठी;

(ग) त्याला राहण्यासाठी, घर बांधण्याकरिता जागा घेण्यासाठी किंवा केवळ या प्रयोजनासाठी घेतलेल्या कोणत्याही कर्जाची अदत्त रक्कम फेडण्यासाठी;

(घ) पूर्वीपासूनच वर्गणीदाराच्या मालकीच्या असलेल्या किंवा त्याने घेतलेल्या घराची किंवा फ्लॅटची पुनर्बांधणी करण्यासाठी किंवा त्यात भर घालण्यासाठी किंवा त्यामध्ये फेरफार करण्यासाठी;

(ङ) कामाच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र असलेल्या वडिलोपार्जित घराचे किंवा शासनाकडून कर्ज घेऊन कामाच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र बांधलेल्या घराचे नवीकरण, त्यात वाढ करणे किंवा त्यात फेरफार करणे अथवा त्याची देखभाल करणे यासाठी,

(च) उपखंड (ग) अन्वये खरेदी केलेल्या जागेवर घर बांधण्यासाठी ;

**(ग)** वर्गणीदाराच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकपूर्वीच्या सहा महिन्याच्या कालावधीत त्याच्या नावे निधीमध्ये जमा झालेली रक्कम व त्यावरील व्याज यामधून शेतीसाठी जमीन अथवा व्यवसायाकरिता जागा खरेदी करण्यासाठी किंवा दोन्हीही प्रयोजनार्थ.

**टीप १.**— ज्या वर्गणीदाराने कमी उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली अग्रिम घेतले असेल किंवा मुंबई वित्तीय नियम, १९५९ (शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक एचबीए- १०५८-८५३०-सात, दिनांक २८ जुलै, १९६२ अन्वये सुधारलेले) यांचा नियम १३४ खाली घरबांधणीसाठी देण्यात येणारे अग्रिम घेतलेले असेल किंवा ज्याला याबाबतीत अन्य कोणत्याही शासकीय मार्गाद्वारे कोणतेही साहाय्य देण्यात आले असेल असा वर्गणीदार खंड **(ख)** चे उपखंड (क), (ग), (घ) किंवा (च) खाली त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी आणि तसेच, घेतलेल्या कोणत्याही कर्जाची परतफेड करण्याच्या प्रयोजनार्थ नियम १४ **(ख)** च्या पोट-नियम (१) च्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेस अधीन राहून अतिमरीच्या रक्कम काढण्यासाठी मंजुरी मिळण्यास पात्र असेल.

वर्गणीदाराचे वडिलोपार्जित घर असेल किंवा त्याने शासनाकडून कर्ज सहाय्य घेऊन, त्याच्या कामाच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र एखादे घर बांधले असेल तर, त्याच्या कामाच्या ठिकाणी घरासाठी जागा खरेदी करण्यासाठी किंवा दुसरे घर बांधण्यासाठी किंवा त्याला राहण्यासाठी तयार फ्लॅट संपादित करण्यासाठी **खंड** (ख) च्या उपखंड (क), (ग) आणि (च) खाली अतिमरीत्या रक्कम काढण्यासाठी मंजुरी मिळण्यास तो पात्र असेल.

टीप २.— वर्गणीदाराने, तो जर घर बांधणार असेल तर बांधावयाच्या घराचा किंवा करावयाच्या वाढीचा किंवा फेरफाराचा नकाशा, सादर केल्यानंतर आणि ते घर किंवा घराची जागा जेथे असेल तेथील स्थानीक नगरपालिकेच्या नियमाखाली किंवा उपविधीखाली त्याला रीतसर मान्यता मिळवणे आवश्यक असेल तो तसा मान्य करून घेतल्यानंतरच **खंड** (ख) च्या उपखंड (क), (घ), (ड) किंवा (च) खाली काढावयाची रक्कम काढण्यास मंजुरी देण्यात येईल.

टीप ३.— खंड (ख), उपखंड (ख) खाली मंजूर केलेली काढावयाची रक्कम, त्याने त्यापूर्वी काढलेली रक्कम वजा करून उपखंड (क) अन्वये काढलेल्या अगोदरच्या रकमेसह अर्जाच्या दिनांकास असलेल्या शिल्लक रकमेच्या ३/४ पेक्षा अधिक असता कामा नये. यामध्ये अनुसरावयाची पध्दत अशी (त्या दिनांकास असलेली शिल्लक रक्कम **अधिक** संबंधीत घरासाठी अगोदरच काढलेली रक्कम /काढलेल्या रकमा) यांच्या ३/४ वजा अगोदरच काढलेली रक्कम/काढलेल्या रकमा.

टीप ४.—घराची जागा अथवा घर पत्नीच्या किंवा पतीच्या नावे असेल तरीही **खंड** (ख) च्या उपखंड (क) किंवा (घ) अन्वये निधीमधून रक्कम घेता येईल, मात्र वर्गणीदाराने केलेल्या नामनिर्देशनामध्ये ती किंवा तो निधीची रक्कम घेणारी/घेणारा पहिली/पहिला नामनिर्देशित व्यक्ती असणे, आवश्यक आहे.

टीप ५.—या नियमावली खाली एकाच प्रयोजनासाठी फक्त एकदाच रक्कम घेता येईल. परंतु वेगवेगळ्या मुलांचे विवाह अथवा शिक्षण किंवा निरनिराळ्या वेळी उद्भवणारे आजार किंवा त्यांचे घर अथवा फ्लॅट ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्रातील स्थानिक नगरपरिषदेने रीतसर मान्य केलेल्या नवीन नकाशात अंतर्भूत असेल अशी वाढ किंवा फेरफार त्या घरात अथवा फ्लॅटमध्ये करणे, याबाबी एकच प्रयोजन असल्याचे समजण्यात येणार नाही. त्याच घराचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी **खंड** (ख) च्या उपखंड (क) किंवा (घ) अन्वये, दुसऱ्यांदा अथवा त्यानंतर निधीमधून रक्कम काढताना टीप ३ मध्ये घालून दिलेल्या मर्यादेपर्यंत काढता येईल.

टीप ६.— नियम १४ खाली त्याच प्रयोजनार्थ व त्याचवेळी अग्रिम मंजूर करण्यात येत असेल तर या नियमाखाली रक्कम काढण्यास मंजुरीदेण्यात येणार नाही.

(२) एखादा वर्गणीदार अंशदायी भविष्य निर्वाह निधी लेख्याच्या उपलब्ध अद्यावत विवरणाचा संदर्भ देऊन व त्याप्रमाणे त्यानंतर निधीमध्ये केलेल्या अंशदानाचा पुरावा देऊन अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये त्याच्या नावे जमा असलेल्या रकमेसंबंधी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटवून देऊ शकला तर परतावायोग्य अग्रिमाच्या प्रकरणाप्रमाणेच विहित मर्यादेपर्यंतची रक्कम काढण्याची परवानगी सक्षम प्राधिकरणालाच देता येईल असे करीत असताना सक्षम प्राधिकरणाने वर्गणीदारासाठी अगोदरच कोणतीही रक्कम काढण्यास मंजुरी दिली असेल अथवा परतावा योग्य अग्रिम मंजूर केले असेल तर तेही विचारात घेईल. तथापि, वर्गणीदार, त्याच्या नावे जमा झालेल्या रकमेच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री करवून देण्यास असमर्थ असेल किंवा जेवढी रक्कम काढण्यासाठी अर्ज केला असेल ती रक्कम अनुज्ञेय आहे किंवा नाही यासंबंधी कोणतीही शंका असेल अशा बाबतीत काढावयाच्या रकमेची अनुज्ञेयता ठरविणे सक्षम प्राधिकाऱ्यास शक्य व्हावे म्हणून वर्गणीदाराच्या नावे किती रक्कम जमा आहे, याबाबत खात्री करून घेण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याला लेखा अधिकाऱ्याकडे निर्देश करता येईल. निधीमध्ये —

काढण्यास मंजुरी देणाऱ्या आदेशामध्ये अंशदायी भविष्यनिर्वाह निधी लेखा क्रमांक आणि लेखे ठेवणाऱ्या लेखा अधिकाऱ्याचे नाव ठळकपणे दर्शवण्यात यावे आणि मंजुरी देणाऱ्या आदेशाची प्रत लेखा अधिकाऱ्यास न चुकता पाठविण्यात यावी. वर्गणीदाराच्या खातेवही लेख्यामध्ये रक्कम काढण्यास मंजुरी देणाऱ्या आदेशाची नोंद करण्यात आली आहे, यासंबंधीची पोच लेखा अधिकाऱ्याकडून मिळाली आहे, याची खात्री करून घेण्याची जबाबदारी मंजुरी प्राधिकाऱ्यांची असेल. जेवढी रक्कम काढण्यास मंजुरी देण्यात आली असेल ती रक्कम वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेपेक्षा अधिक आहे अथवा ती अनुज्ञेय नाही, असे लेखा अधिकारी कळवील तर वर्गणीदाराने घेतलेली रक्कम त्याने निधीमध्ये ताबडतोब एक रकमी भरली पाहिजे आणि अशी रक्कम परत करण्यात त्याने कसूर केल्यास ती रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून एक रकमी अथवा राज्यपालाकडून निश्चित करण्यात येतील अशा मासिक हप्त्यामध्ये वसूल करण्याबाबतचा आदेश मंजुरी प्राधिकाऱ्याकडून देण्यात येईल.

(३) पुढीलप्रमाणे रक्कम काढून घेणे अनुज्ञेय असेल,-

(क) पोट-नियम (१) च्या खंड (क) खाली येणाऱ्या प्रकरणात वर्गणीदाराने विनिर्दिष्ट करावयाच्या अशा योग्य हप्त्यांमध्ये दिली जाईल आणि प्रत्येक हप्ता, आधीचा हप्ता ज्या प्रयोजनासाठी घेण्यात आला होता त्याच प्रयोजनासाठी त्याचा उपयोग केला आहे, याची खात्री करून घेतल्यानंतर मंजुर करण्यात येईल.

टीप.– एकाच कारणासाठी घेतलेले परतावा योग्य अग्रिम खंड (क) च्या प्रयोजनार्थ, अंतिमतः काढून घेतले असल्याचे समजण्यात येईल.

(ख) पोट-नियम (१) च्या खंड (ख) खाली येणाऱ्या प्रकरणात, प्रत्यक्ष विवाह होणार असेल त्या महिन्याच्या अगोदर तीन महिन्यांहून अधिक अगोदर देण्यात येऊ नये.

(ग) पोट-नियम (१) च्या खंड (घ), (च), (छ) आणि (ज) खाली येणाऱ्या प्रकरणात कमीत कमी दोन आणि जास्तीत जास्त चार समान हप्त्यांत देण्यात येईल. प्रत्येक हप्ता, बांधकामाची प्रगती पाहून स्वतंत्रपणे मंजूर करावा :

परंतु जागेची किंमत धरून एखाद्या घराच्या खरेदीसाठी किंवा रक्कम काढण्याच्यावेळी ताबा घेण्यास तयार असलेल्या कोणत्याही फ्लॅटच्या मालकी हक्क तत्त्वावरील खरेदीसाठी किंवा उक्त प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाच्या उर्वरित रकमेची परतफेड करण्यासाठी काढून घेण्यात येणारी रक्कम वर्गणीदाराच्या विनंतीवरून एका हप्त्यात दिली जाईल.

(घ) पोट-नियम (१) च्या खंड (ग) खाली येणाऱ्या प्रकरणात ती रक्कम वर्षातून एकदा देण्यात येईल.

(४) (क) रक्कम काढल्यापासून सहा महिन्यांच्या आत घराच्या बांधकामाची सुरवात करावी व बांधकामाची सुरवात केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीमध्ये किंवा रक्कम काढून घेण्यासाठी मंजुरी देण्यास सक्षम असलेले प्राधिकारी प्रत्येक बाबतीतील परिस्थिती लक्षात घेऊन अनुमती देईल अशा अधिक कालावधीत ते काम पूर्ण करावे. तयार घराच्या खरेदीकरिता रक्कम काढून घेण्याच्या बाबतीत घराकरिता व जमिनीकरिता निर्विवाद हक्क रक्कम काढून घेतल्यापासून तीन महिन्यांच्या आत मिळविण्यात यावे.

(ख) पोट-नियम (१) च्या खंड (च) खाली घरासाठी जागेची खरेदी रक्कम काढल्यापासून किंवा यथास्थिती, रकमेचा पहिला हप्ता घेतल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत केली पाहिजे.

(ग) उपरोक्त प्रकारे काढून घेण्यात आलेल्या रकमेतून विकत घ्यावयाचे किंवा बांधावयाचे नियोजित निवासस्थान किंवा-फ्लॅट वर्गणीदार जेथे कामाला असेल त्या ठिकाणी किंवा त्याच्या निवृत्तीनंतर तो स्थायिक होऊ इच्छितो अशा ठिकाणी असले पाहिजे.

(घ) रक्कम काढून घेणे हे फक्त एकाच घराच्या बांधणीसाठी, संपादनासाठी आणि विनियोजनासाठी अनुज्ञेय असेल आणि तीसुद्धा या पोट-नियमाच्या खंड (ग) खाली उल्लेखिलेल्या ठिकाणी सरकारी कर्मचाऱ्यांच्या मालकीचे घर नसेल अशाच प्रकरणात देण्यात येईल.]

[1][ (५) रक्कम काढण्यास मंजूरी देण्यात आल्यानंतर नियम २७, पोट-नियम (३) च्या खंड (दोन) अन्वये लेखा अधिकाऱ्याकडे अंतिम प्रदानासाठीचा अर्ज अग्रेषित करण्यात आला असेल त्या बाबतीत लेखा अधिकाऱ्याकडून प्राधिकारपत्र मिळाल्यावर रक्कम काढण्यात येईल.]

[2][ **१४ख.** (१) नियम १४ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एका किंवा अधिक प्रयोजनार्थ कोणत्याही वेळी वर्गणीदाराने निधीमध्ये त्याच्या नावे जमा असलेल्या रकमेतून काढलेली कोणतीही रक्कम सर्वसाधारणपणे वर्गणीदाराच्या खात्यावर निधीमध्ये जमा असलेली वर्गणी व त्यावरील व्याजाच्या रकमेच्या निम्मे रक्कम किंवा सहा महिन्यांचे वेतन यापैकी जी कमी असेल त्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये. तथापि, मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्यास या बाबी विचारात घेऊन कोणत्या कारणासाठी रक्कम काढण्यात येत आहे ते वर्गणीदाराचा दर्जा, निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम या मर्यादेपेक्षा जास्त म्हणजे निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाली जमा असलेल्या रकमेच्या तीन चतुर्थांश पर्यंत रक्कम काढून घेण्यास मंजुरी देता येईल.

परंतु, घर बांधणीच्या प्रयोजनाकरिता कमी उत्पन्नाच्या गटासाठी असलेल्या गृहनिर्माण योजनेखाली किंवा मुंबई वित्तीय नियम, १९५९ (शासकीय अधिसूचना वित्त विभाग क्र. एच. बीए १०५८/८५३०-सात, दिनांक २८ जुलै, १९६२ द्वारे सुधारणा केल्याप्रमाणे) याच्या नियम १३४ अन्वये ज्याने अग्रिमाचा उपयोग करून घेतलेला असेल अशा वर्गणीदाराच्या बाबतीत पूर्वोक्त योजनेखाली किंवा नियमाखाली घेतलेल्या अग्रिमाच्या रकमेसहित या पोट-नियमाअन्वये काढून घेतलेली रक्कम [3][रुपये १,२५,०००] किंवा मासिक वेतनाच्या ८० पट इतकी रक्कम यापैकी जी कमी असेल त्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

[4][ **टीप १.**—नियम १४ (क) या पोट-नियम (१) खंड (क) उपखंड (क) अन्वये वर्गणीदारास दर सहा महिन्यांतून एकदा निधीमधून रक्कम काढण्यास परवानगी देता येईल. प्रत्येक वेळी अशाप्रकारे काढलेली रक्कम ही, नियम १४ ख पोट-नियम (१) च्या प्रयोजनार्थ वेगवेगळ्या प्रयोजनासाठी स्वतंत्रपणे काढलेली रक्कम असल्याचे मानण्यात येईल.

**टीप २.**—एखाद्या वर्गणीदाराला खरेदी केलेली एखादी जागा किंवा घर अथवा फ्लॅटसाठी किंवा सिडकोमार्फत किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत, किंवा एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत बांधलेल्या घराकरिता अथवा फ्लॅटकरिता हप्त्यांनी पैसे भरावयाचे असतील तर त्या बाबतीत, त्याला जेव्हा जेव्हा हप्ते भरण्यासाठी सांगण्यात येईल त्या त्या वेळी त्याला रक्कम काढण्याची परवानगी देण्यात येईल असे प्रत्येक प्रदान हे नियम १४ ख च्या पोट-नियम (१) च्या प्रयोजनार्थ स्वतंत्र प्रयोजनासाठी केलेले प्रदान असल्याचे मानण्यात येईल.

**टीप ३.**—वर्गणीदाराच्या नावे निधीमध्ये जमा झालेली रक्कम अपुरी असून निधीमधून रक्कम काढण्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे त्याची गरज तो भागवू शकत नाही अशी मंजूरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्याबाबतीत या पोट-नियमामध्ये घालून दिलेल्या मर्यादेच्या प्रयोजनार्थ निधीमध्ये त्याच्या नावे जमा

---

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९-६-१९८४ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९९६ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २०-१२-१९९६ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] शासकीय अधिसूचना, दिनांक २९-६-१९८४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

असलेल्या प्रत्यक्ष रकमेव्यतिरिक्त, नियम १५ खालील कोणतेही विमापत्र अथवा विमापत्रे यांच्या संबंधात वित्तव्यवस्था करण्यासाठी वर्गणीदाराने अगोदरच काढलेली रक्कम ही जादा रक्कम त्याच्या नावे जमा असल्याप्रमाणे विचारात घेतली जाईल. काढावयाची अनुज्ञेय रक्कम अशा प्रकारे निश्चित करण्यात आल्यानंतर :—

(एक) अशा प्रकारे निश्चित केलेली रक्कम नियम १५ अन्वये विमापत्र अथवा विमापत्रे यांच्यासाठी वित्त व्यवस्था करण्यासाठी अगोदरच काढलेल्या रकमेपेक्षा अधिक होत असेल तर, अशाप्रकारे काढलेली रक्कम ही अंतिमरीत्या काढलेली रक्कम असल्याचे मानण्यात येईल आणि अशी रक्कम व अंतिमरीत्या काढण्याकरिता अनुज्ञेय असलेली रक्कम यात कोणतीही तफावत असेल तर अशी रक्कम रोख देता येईल; आणि

(दोन) अशाप्रकारे निश्चित केलेली रक्कम नियम १५ अन्वये विमापत्र अथवा विमापत्रे यांच्यासाठी वित्तव्यवस्था करण्यासाठी अगोदरच काढलेल्या रकमेपेक्षा अधिक होत नसेल तर, अशाप्रकारे काढलेली रक्कम ही, पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली मर्यादा विचारात न घेता अंतिमरीत्या काढलेली रक्कम आहे असे मानण्यात येईल.

उपरोक्त प्रयोजनार्थ लेखा अधिकारी विमापत्र किंवा विमापत्रे वर्गणीदाराकडे अथवा, यथास्थिति, वर्गणीदार आणि सह विमेदार यांच्याकडे पुन्हा अभिहस्तांकित करील आणि ती ज्या प्रयोजनार्थ देण्यात आलेली असतील त्या प्रयोजनार्थ वापरण्यासाठी वर्गणीदारास परत करील.

(२) नियम १४क खाली निधीमधून संपूर्ण किंवा अंशतः रक्कम काढून घेण्याची त्यास परवानगी देण्यात आली आहे असा वर्गणीदार, याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत, ज्या प्रयोजनासाठी ती रक्कम काढून घेण्यात आली होती, त्यासाठीच वापरण्यात आली याबाबत मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याची खात्री पटवली पाहिजे, आणि त्याने जर असे करण्यात कसूर केली तर, अशा रीतीने काढून घेतलेली संपूर्ण रक्कम किंवा ज्या प्रयोजनासाठी ही रक्कम काढून घेण्यात आली होती त्यासाठी जी उपयोगात आणलेली नसेल असा अशा रकमेचा भाग, वर्गणीदाराने, तात्काळ ठोक रकमेत परत केला पाहिजे आणि याबाबतीत त्याने कसूर केली तर, मंजुरी देणारे प्राधिकारी ही रक्कम एकरकमी किंवा ती निश्चित करील अशा मासिक हप्त्यांमध्ये वर्गणीदाराच्या वित्तलब्धी मधून वसूल करण्याचा आदेश देईल.

[1][ (३) (क) नियम १४क च्या पोट-नियम (१) चे खंड (ख) चे उप-खंड (क), (ख) किंवा (ग) अन्वये ज्या वर्गणीदाराला, त्याच्या नावे निधीमध्ये जमा झालेल्या अंशदान व त्यावरील व्याज यांच्या रकमेतून पैसे काढण्याची परवानगी देण्यात आलेली असेल तो, त्याच्या ताब्यात असलेले त्याने बांधलेले अथवा घेतलेले घर किंवा त्या पैशांनी खरेदी केलेली घराची जागा यांचा विक्रीद्वारे, गहाण ठेवून (शासनाकडे गहाण ठेवण्यात येईल त्याव्यतिरिक्त) देणगीदाखल देऊन, अदलाबदल करून किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगी खेरीज कब्जा सोडणार नाही:

परंतु, अशी परवानगी पुढील गोष्टींसाठी आवश्यक नसेल,—

(एक) तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कोणत्याही मुदतीसाठी घर अथवा घराची जागा भाडेपट्ट्याने दिलेली असेल तर, किंवा

---

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २७-६-१९८४ द्वारे दाखल केले.

(दोन) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ अन्वये स्थापन केलेले एखादे मंडळ किंवा प्राधिकरण, आयुर्विमा महामंडळ किंवा नवीन घराच्या बांधकामासाठी किंवा विद्यमान घरात वाढ करण्याची बांधकामे अथवा फेरफार करण्यासाठी कर्ज देणारे केंद्र शासनाच्या अथवा राज्य शासनाच्या मालकीचे अथवा त्या कडून नियंत्रित होणारे अन्य कोणतेही महामंडळ यांच्याकडे गहाण ठेवण्यात आलेली असेल तर ;

(ख) वर्गणीदाराने घर अथवा यथास्थिति, घराची जागा अजूनही त्याच्या ताब्यात आहे की नाही किंवा ती गहाण ठेवली आहे, अथवा उपरोक्तप्रमाणे हस्तांतरित करण्यात आली आहे किंवा भाड्याने देण्यात आली किंवा कसे यासंबंधीचे अधिकथन प्रत्येक वर्षी ३१ डिसेंबर पर्यंत सादर केले पाहिजे आणि मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याने फर्मावले तर तो प्राधिकारी त्याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा दिनांकास अथवा त्यापूर्वी, वर्गणीदाराने मूळ विक्रीचे कागदपत्र, गहाणखत किंवा भाडेपट्ट्यासंबंधीचे विलेख आणि तसेच त्याला मालमत्तेवरील हक्क ज्यावर आधारित असेल असे कागदपत्र सादर केले पाहिजे.

(ग) वर्गणीदाराच्या सेवानिवृत्तीपूर्वी कोणत्याही वेळी जर त्याने मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता घराचा अथवा घराच्या जागेचा कब्जा सोडला, तर, त्याने अशाप्रकारे काढलेली रक्कम निधीमध्ये एकरकमी भरली पाहिजे आणि अशी रक्कम परतफेड करण्यास त्याने कसूर केली तर मंजुरी देणारा प्राधिकारी त्या बाबीसंबंधी अभिवेदन करण्याची वाजवी संधी त्याला दिल्यानंतर उक्त रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून एका रकमेत अथवा मंजुरी प्राधिकारी निर्धारित करील इतक्या मासिक हप्त्यात वसूल करील.

**टीप.**-ज्या वर्गणीदाराने शासनाकडून कर्ज घेतले असेल व त्याच्या बदल्यात त्याने घर अथवा घराची जागा शासनाकडे गहाण ठेवली असेल, [1]त्या वर्गणीदारास पुढीलप्रमाणे अधिकथन करावे लागेल, ते म्हणजे :-

"मी याद्वारे असे प्रमाणित करतो की, जे घर किंवा घराची जागा बांधकामासाठी किंवा संपादन करण्यासाठी मी भविष्यनिर्वाह निधीमधून अंतिमरित्या रक्कम काढलेली आहे. ते घर अथवा घराची जागा अद्याप माझ्या ताब्यात असून ते/ती शासनाकडे गहाण ठेवण्यात आले/आली आहे.]"

[2][**१४ ग.** नियम १४ क, पोट-नियम (१), खंड (क), (ख) किंवा (ग) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रयोजनार्थ, नियम १२ खाली ज्या वर्गणीदाराने पूर्वी अग्रिम घेतले असेल किंवा भविष्यात तो घेणार असेल, त्या वर्गणीदारास मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्यामार्फत लेखा अधिकाऱ्याला उद्देशून केलेल्या लेखी विनंतीद्वारे नियम १४ क आणि १४ ख मध्ये घालून दिलेल्या शर्तींची पूर्तता केल्यानंतर या कर्जातील शिल्लक रकमेचे अंतिमरित्या काढून घेतलेल्या रकमेत रुपांतर करता येईल.]

[2][टीप १.-अराजपत्रित वर्गणीदाराच्या बाबतीत कार्यालय प्रमुख यांनी आणि राजपत्रित वर्गणीदारांच्या बाबतीत संबंधित कोषागार अधिकारी यांनी लेखा अधिकाऱ्याकडे अशा रुपांतरणाबाबतचा अर्ज अग्रेषित केला असेल तेव्हा, कार्यालय प्रमुखास आणि संबंधित कोषागार अधिकाऱ्यास वेतनदेयकातून करण्यात येणारी वसुली थांबवण्यास प्रशासकीय अधिकाऱ्यास सांगता येईल. राजपत्रित वर्गणीदारांच्या बाबतीत, प्रशासकीय अधिकारी, त्यापुढील वसुली थांबवण्याची परवानगी देण्यासाठी कोषागार अधिकाऱ्याकडे वर्गणीदाराची माहिती कळवणाऱ्या पत्राची प्रत त्याचे वेतन ज्या कोषागारातून काढण्यात येते, त्या कोषागार अधिकाऱ्याला पृष्ठांकित करील.

---

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९८६ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २७-६-१९८४ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

**टीप २.**-नियम १४ **ख** च्या पोट-नियम (१) च्या प्रयोजनार्थ, रुपांतरणाच्यावेळी वर्गणीदाराच्या खात्यामध्ये जमा असलेली वर्गणीची रक्कम व त्यावरील व्याज अधिक अग्रिमाची अदत्त रक्कम शिल्लक रक्कम म्हणून हिशोबात घेण्यात येईल. काढण्यात आलेली प्रत्येक रक्कम स्वतंत्र रक्कम मानण्यात येईल आणि एकाहून अधिक रुपांतरणाच्या बाबतीत हेच तत्व लागू करण्यात येईल.]

**विमापत्रे आणि कुटुंबवेतन निधीसाठी प्रदाने**

१५. नियम १५ **ख** ते २२ मधील शर्तींच्या अधीन राहून—

(क) (एक) शासनाने यावाबत मान्य केलेल्या कुटुंब वेतन निधीच्या वर्गण्या ;

(दोन) विमापत्राबाबतची प्रदाने (यात आता महाराष्ट्र शासनाकडून प्रशासित केल्या जाणाऱ्या भूतपूर्व हैद्राबाद राज्य आयुर्विमा निधीअन्वये देण्यात आलेल्या आयुर्विमापत्रांचा समावेश होतो.) वर्गणीदाराच्या स्वेच्छा निर्णयानुसार, निधीच्या संपूर्ण वर्गणीकरिता किंवा त्याच्या काही भागाकरिता करता येतात.

(ख) निधीतील वर्गणीदाराच्या खात्यावर जमा असलेली रक्कम, त्यावरील व्याजासहित खाली कारणांसाठी काढता येईल :-

(एक) आयुर्विमापत्राचा हप्ता भरण्यासाठी,

(दोन) आयुर्विमापत्र काढताना, त्यावरील हप्त्याचे एक रकमी प्रदान करण्यासाठी.

(तीन) विमापत्राचा एक हप्ता भरण्यासाठी किंवा शासनाने या संबंधात मान्य केलेल्या कुटुंबवेतनाची वर्गणी भरण्यासाठी :

परंतु, (१) प्रस्तावित विमापत्राचा संपूर्ण तपशील लेखी अधिकाऱ्याला कळविण्यापूर्वी आणि त्याने तो तपशील योग्य म्हणून स्वीकारण्यापूर्वी, किंवा

(२) रक्कम काढण्यासाठी केलेल्या अर्जाच्या दिनांकापासून किंवा मागणी सादर केल्याच्या दिनांकापूर्वी तीन महिन्यांहून अधिक काळ अगोदर केलेल्या प्रदानासाठी किंवा केलेल्या किंवा घडवून आणलेल्या खरेदीचा खर्च भागविण्यासाठी, किंवा

(३) रक्कम काढण्यासाठी केलेल्या अर्जाच्या किंवा मागणी सादर केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीतील प्रदानांसाठी प्रत्यक्ष देय असणाऱ्या हप्त्याचा किंवा वर्गणीचा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेहून अधिक अशी कोणतीही रक्कम काढता येणार नाही ]:

परंतु, आणखी असे की, शैक्षणिक सावधि विमापत्राचे हप्ते निधीच्या वर्गणीच्या बदली देता येणार नाहीत आणि जर अशा विमापत्राची रक्कम वर्गणीदाराच्या नियत वयोमानापूर्वी पूर्णतः किंवा अंशतः देय होत असेल तर अशा विमापत्राबाबत कोणताही हप्ता किंवा खरेदीचा खर्च भागविण्यासाठी रक्कम काढता येणार नाही ;

(ग) खंड (ख) अनुसार काढलेली कोणतीही रक्कम नियम १०, पोट-नियम (६) मध्ये तरतूद करण्यात आलेल्या पद्धतीनुसार, केवळ लगतच्या पूर्ण रुपयात रूपांतरित करून भरण्यात येईल.

**१५ क.** (१) निधीत देय असणाऱ्या वर्गणीऐवजी जितकी विमापत्रे काढता येत असतील त्यांची संख्या किंवा नियम १५ अन्वये निधीतून जितक्या वेळा रक्कम काढणे, अनुज्ञेय असेल त्यांची संख्या चार पेक्षा जास्त नसेल :

परंतु, १३ मे, १९५५ च्या लगतपूर्वी, निधीत देय असलेल्या वर्गणीऐवजी चारपेक्षा अधिक विमापत्रे काढता येत असतील किंवा निधीतून चारहून अधिक वेळा रक्कम काढून घेणे, अनुज्ञेय असेल तर अशी बदली विमापत्रे घेणे किंवा रकमा काढून घेणे चालु ठेवण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) च्या परंतुकामध्ये निर्देशित केलेल्या ज्या विमापत्रांच्या बाबतीत, नियम १५ खाली निधीच्या वर्गणीच्या रकमेतून रक्कम काढणे अनुज्ञेय असेल, अशा कोणत्याही विमापत्रासह, विमापत्राचा हप्ता, वार्षिक रक्कम देण्याव्यतिरिक्त, १२ मे, १९५६ नंतर कोणत्याही प्रकारे प्रदेय होणार नाही.

**स्पष्टीकरण** :–पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विमापत्रांची कमाल संख्या परिगणित करताना, जी विमापत्रे परिणत झाली असतील ती वगळण्यात येतील.

१६. (१) जर नियम १५ च्या खंड (क) खाली बदली देण्यात आलेल्या वर्गणीची किंवा प्रदानाची एकूण रक्कम, नियम ८ खाली निधीत भरावयाच्या किमान वर्गणीच्या रकमेपेक्षा कमी असेल तर, त्यामधील फरक नियम १० च्या पोटनियम (६) मध्ये तरतूद केलेल्या पद्धतीने नजिकच्या पूर्ण रुपयांत रुपांतरित करण्यात येईल आणि ती वर्गणीदाराकडून निधीची वर्गणी म्हणून भरण्यात येईल.

(२) जर वर्गणीदाराने नियम १५ च्या खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी त्याच्या खात्यावर शिल्लक असलेल्या रकमेपैकी काही रक्कम काढली असेल तर, त्या नियमाच्या खंड (क) खालील, त्याच्या स्वेच्छानिर्णयाच्या अधीन राहून तो नियम ८ खाली देय असलेली निधीची वर्गणी भरणे चालू ठेवील.

१७. (१) जो वर्गणीदार, नियम १५ च्या खंड (क) अनुसार प्रदानाऐवजी वर्गणी देऊ इच्छित असेल तर त्यास निधीची वर्गणी त्या प्रमाणात कमी करता येईल.

परंतु वर्गणीदार–

(क) वर्गणीत कपात केल्याची वस्तुस्थिती आणि त्याबाबतचे कारण लेखा अधिकाऱ्याला वेतन देयकाद्वारे किंवा पत्राद्वारे सुचित करील.

(ख) वर्गणीत करण्यात आलेली कपात ही नियम १५ च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनार्थ, योग्य प्रकारे उपयोजित करण्यात आली आहे, याबाबत लेखा अधिकाऱ्याची खात्री करून देण्यासाठी वर्गणीदार पावती किंवा पावतीच्या-प्रमाणित प्रती, लेखा अधिकारी आदेश देईल, तितक्या कालावधीत त्याच्याकडे पाठवील.

(२) नियम १५ च्या खंड (ख) खाली कोणतीही रक्कम काढून घेण्याची इच्छा असणारा वर्गणीदार-

(क) रक्कम काढून घेण्याचे कारण लेखा अधिकाऱ्याला पत्राद्वारे सुचित करील ;

(ख) रक्कम काढून घेण्याबाबतची कार्यवाही करण्याची विनंती लेखा अधिकाऱ्याला करील ;

(ग) वर्गणीतून काढून घेण्यात आलेली रक्कम, नियम १५ च्या खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनार्थ, योग्य प्रकारे उपयोजित करण्यात आली आहे, याबाबत लेखा अधिकाऱ्याची खात्री करून देण्यासाठी वर्गणीदार पावती किंवा पावतीच्या प्रमाणित प्रती, लेखा अधिकारी आदेश देईल, तितक्या कालावधीत त्याच्याकडे पाठवील.

(३) जर लेखा अधिकाऱ्याचे पोट-नियम (१) च्या खंड (ख) आणि पोटनियम २ च्या खंड (ग) अनुसार ज्या बाबतीत योग्यरित्या समाधान झाले नसेल अशा वर्गणीत कपात केलेली रक्कम किंवा काढून घेतलेली कोणतीही रक्कम वर्गणीदाराच्या [1][ * * * * ]वित्तलब्धीमधून वसूल केली जावी व निधीमध्ये वर्गणीदाराच्या खाती जमा करण्यात यावी असा आदेश देईल.

---

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २३-[illegible] अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

१८. (१) शासन वर्गणीदाराच्या वतीने विमा कंपनीला कोणतीही रक्कम देणार नाही, तसेच विमापत्र चालू ठेवण्यासाठी कोणतीही उपाययोजना करणार नाही.

(२) विमापत्राचे स्वरुप कोणते असावे, याला महत्व नसते, परंतु ते, वर्गणीदाराने स्वतःच्या जीवनावर काढलेले असले पाहिजे आणि (पुरुष वर्गणीदाराने काढलेले विमापत्र त्याची पत्नी किंवा पत्नी आणि मुले किंवा दोहोंपैकी एकाच्या हितासाठी असल्याचे त्यावर स्पष्ट करण्यात आले नसेल तर) तो असे विमापत्र मुंबईच्या राज्यपालांच्या नावे कायदेशीररीत्या अभिहस्तांकित करु शकेल, असे असेल.

**स्पष्टीकरण १.**-वर्गणीदार आणि वर्गणीदाराची पत्नी यांच्या संयुक्त जीवनावर काढलेले विमापत्र या पोटनियमाच्या प्रयोजनार्थ वर्गणीदाराच्या जीवनावरील विमापत्र मानले जाईल.

**स्पष्टीकरण २.**-वर्गणीदाराच्या पत्नीच्या नावे, अभिहस्तांकित करण्यात आलेले विमापत्र योग्य अभिहस्तांकनाद्वारे पुन्हा वर्गणीदार किंवा वर्गणीदार व त्याच्या पत्नीच्या नावे अभिहस्तांकित केल्याखेरीज स्वीकारले जाणार नाही.

(३) विमापत्र वर्गणीदाराची पत्नी किंवा त्याची पत्नी आणि मुले किंवा यांच्यापैकी कोणत्याही व्यक्तीखेरीज इतर लाभाधिकाऱ्यांच्या लाभासाठी काढलेले नसावे.

१९. (१) विमापत्राच्या बाबतीत, एखादी वर्गणी प्रथम रोखून ठेवल्यानंतर अथवा निधीतून रक्कम काढून घेतल्यानंतर सहा महिन्याच्या आत अथवा ज्या विमाकंपनीचे मुख्यालय भारताबाहेर असेल, अशा प्रकरणी, पुरेसा प्रमाणपत्र (अंतरिम पावती) सादर करण्यात आल्यानंतर लेखा अधिकाऱ्याची खात्री पटली तर तो निश्चित करील अशा पुढील कालावधीत, विमापत्र—

(क) त्याच्या दर्शनी बाजूवर, वर्गणीदाराच्या पत्नीच्या किंवा त्याची पत्नी आणि मुले यांच्या किंवा दोहोंपैकी कोणाही एकाच्या हितासाठी आहे, असे व्यक्त केलेले असेल तर ती गोष्ट खेरीज करुन ते विमापत्र, नियम २० ते २२ च्या अनुसार निवेशित देय होईल अशा कोणत्याही रकमेचे प्रदान करण्यासाठी तारण म्हणून, मुंबईच्या राज्यपालांकडे अभिहस्तांकित करण्यात येईल आणि असे अभिहस्तांकन ते विमापत्र वर्गणीदाराच्या जीवनावर किंवा वर्गणीदार व त्याची पत्नी यांच्या संयुक्त जीवनावर काढलेले असेल, त्यानुसार किंवा असे विमापत्र अगोदरच वर्गणीदाराच्या पत्नीला अभिहस्तांकित केले असेल त्यानुसार दुसऱ्या अनुसूचितील नमुना (१) किंवा नमुना (२) किंवा नमुना (३) मध्ये पृष्ठांकित करुन लेखा अधिकाऱ्याकडे सुपुर्द करण्यात येईल.

(ख) जर अशा विमापत्राच्या दर्शनी बाजूवर ते वर्गणीदाराच्या पत्नीच्या किंवा त्याची पत्नी आणि मुले किंवा दोहोंपैकी कोणाही एकाच्या लाभासाठी काढण्यात आले असल्याचे व्यक्त केले असेल तर ते लेखा अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येईल.

(२) लेखा अधिकारी, शक्य असेल तेथे, विमा कंपनीशी संपर्क साधून विमापत्राबाबत कोणतेही पूर्व अभिहस्तांकन अस्तित्वात नाही याची खात्री करुन घेईल.

(३) निधीमधून वित्तव्यवस्था करण्याच्या हेतूने एखादे विमापत्र लेखा अधिकाऱ्याने मान्य केल्यानंतर त्याची पूर्वसंमती घेतल्याखेरीज आणि त्यात करण्यात येणारे बदल किंवा नवीन विमापत्राचा तपशील पुरवण्यात आल्याखेरीज त्या विमापत्राच्या अटींमध्ये कोणताही बदल करता येणार नाही किंवा ते विमापत्र दुसऱ्या विमापत्राऐवजी बदलून घेता येणार नाही.

(४) जर हे विमापत्र अभिहस्तांकित करून सादर करण्यात आले नसेल किंवा उक्त सहा महिन्याच्या कालावधीत किंवा लेखा अधिकाऱ्याने पोटनियम (१) खाली निश्चित केलेल्या अशा अधिक कालावधीत सादर केले नाही, तर निधीमध्ये [1][ * * * * ] त्या विमापत्रासाठी रोखून ठेवलेली किंवा त्यातून काढून घेतलेली कोणतीही रक्कम भरण्यात येईल किंवा यथास्थिती वर्गणीदार ती निधीत परत जमा करील असे करण्यात कसूर झाली तर नियम १२ च्या खंड (ख) किंवा खंड (ग) अनुसार विशेष कारणांसाठी कर्ज मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात आलेल्या हप्त्यामध्ये किंवा अन्यथा वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून वजात करून वसूल केली जावी, असा लेखा अधिकाऱ्यास आदेश देता येईल.

(५) विमापत्राच्या अभिहस्तांकनाची नोटीस वर्गणीदारातर्फे विमा कंपनीला पाठवण्यात येईल आणि विमा कंपनी नोटिशीच्या पोचपावतीची प्रत अभिहस्तांकनाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत लेखा अधिकाऱ्याकडे पाठवील.

**टीप १.**-वर्गणीदारांना अशी सुचना देण्यात येते की, त्यांनी विमा कंपनीला अभिहस्तांकनाच्या नोटिशीच्या दोन प्रती पाठवाव्यात, त्या ठिकाणी नोटीस ग्रेट ब्रिटनमध्ये किंवा आयर्लंडमध्ये असलेल्या विमा कंपनीकडे पाठवावयाची असेल त्याबाबतीत नोटिशीसोबत फी म्हणून पाच शिलींग पाठवले पाहिजेत. पॉलिसीज ऑफ इन्शुरन्स ॲक्ट, १८६७ (विमापत्र अधिनियम) खाली अधिकृत पोच पावतीबदलची ही फी असल्याचे समजण्यात आले आहे. ज्या विमापत्रांवर अभिहस्तांकन पृष्ठांकित केलेले आहे, अशी विमापत्रे विमा कंपनीकडे पाठवण्याची आवश्यकता नसते, कारण विमापत्र मागणीयोग्य होईपर्यंत विमापत्र धारकाच्या हक्कावर परिणाम करणारे मूळ लेख सादर करण्यात विमा कंपन्या सहसा भाग पाडत नाहीत.

**टीप २.**-नोकरी सोडून ग्रेट ब्रिटन किंवा आयर्लंडमध्ये जाणाऱ्या वर्गणीदारांना अशी सूचना करण्यात येते की, इंग्लीश मुद्रांक कायद्याखाली त्यांनी या देशात प्रथम गेल्यानंतर ३० दिवसांच्या आत, त्यांना अभिहस्तांकने व पुर्नअभिहस्तांकने मुद्रांकित करून घेणे आवश्यक आहे. अन्यथा मुद्रांक अधिनियमाखाली त्यांना दंड भरावा लागेल व विमापत्र त्याच्या रकमेच्या प्रदानासाठी परिणाम झाल्यानंतर त्यांना अडचणी येतील.

**१९.क.** वर्गणीदार विमापत्र चालू असण्याच्या काळात विमापत्राच्या अटींनुसार वैकल्पिक असलेला कोणताही बोनस स्वीकारणार नाही आणि विमापत्राच्या अटींनुसार वर्गणीदाराने बोनस स्वीकारणे, अपरिहार्य असेल तर विमापत्र चालू असण्याच्या काळात दाटण्यात आलेली कोणतीही बोनसची रक्कम तात्काळ निधीमध्ये वर्गणीदारातर्फे जमा केली जाईल किंवा यात कसूर झाल्यास, त्याच्या वित्तलब्धीतून हप्त्याहप्त्याने वजात करून किंवा अन्यथा, नियम १२ (२) (क) खाली अशा वर्गणीदारास अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असलेला व या नियमांना जोडलेल्या परिशिष्ट "क" मध्ये विनिर्दिष्ट केलेला प्राधिकारी निर्देशित करील त्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

२०. (१) नियम २२ याच्या पोट-नियम (३) मध्ये तरतूद केली असेल ती खेरीज करून जेव्हा वर्गणीदार-

(क) नोकरी सोडून जाईल, किंवा

(ख) निवृत्तिपूर्व रजेवर गेलेला असेल आणि त्याने लेखा अधिकाऱ्याकडे विमापत्राच्या पुर्नअभिहस्तांकनासाठी किंवा परतीसाठी अर्ज केला असेल, किंवा

(ग) तो रजेवर असताना त्यास निवृत्त होण्याची परवानगी देण्यात आली असेल किंवा सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याद्वारे त्यास पुढील सेवेसाठी अयोग्य ठरवण्यात आले असेल आणि त्याने विमापत्राच्या पुर्नअभिहस्तांकनासाठी किंवा परतीसाठी अर्ज केला असेल, किंवा

---

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९७६ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

(घ) नियम १५ च्या खंड (क) च्या उपखंड (दोन) आणि नियम १५ च्या खंड (ख) च्या उपखंड (एक) आणि (दोन) मध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी रोखून ठेवलेली किंवा निधीमधून काढून घेतलेली कोणतीही रक्कम निधीत पूर्णतः भरील किंवा परत करील, तर अशा बाबतीत [1][*    *    *    *    *] लेखा अधिकारी,—

(एक) जर नियम १९ खाली विमापत्र मुंबईच्या राज्यपालांच्या नावे अभिहस्तांकित करण्यात आले असेल तर तिसऱ्या अनुसूचीमध्ये दिलेल्या पहिल्या नमुन्यानुसार वर्गणीदाराला किंवा यथास्थिती वर्गणीदार आणि संयुक्त विमेदार विमापत्र पुर्नअभिहस्तांकित करील/करतील आणि विमा कंपनीला उद्देशून करण्यात आलेल्या पुर्नअभिहस्तांकनाच्या स्वाक्षरीत नोटीसीसह ते विमापत्र वर्गणीदाराच्या स्वाधीन करील/करतील.

(दोन) जर विमापत्र नियम १९ च्या पोटनियम (४) च्या खंड (ख) खाली त्याच्या स्वाधीन करण्यात आले असेल तर हे विमापत्र वर्गणीदाराच्या नावे करून देईल;

परंतु जर, वर्गणीदार निवृत्तिपूर्व रजेवर गेल्यानंतर किंवा रजेवर असताना निवृत्त होण्याची त्यास अनुज्ञा मिळाली असेल किंवा सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून पुढील सेवेसाठी अयोग्य ठरवण्यात आल्यानंतर तो पुन्हा कामावर आला असेल आणि पुर्नअभिहस्तांकित करण्यात आलेले किंवा वर्गणीदाराच्या नावे करून देण्यात आलेले विमापत्र परिणत झाले नसेल, अभिहस्तांकित करण्यात आले नसेल किंवा त्यावर कोणताही भार निर्माण केला नसेल किंवा त्यावर बोजा टाकण्यात आला नसेल तर ते विमापत्र पुन्हा मुंबईचे राज्यपाल यांच्या नावे अभिहस्तांकित करून लेखा अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात येईल किंवा यथास्थिती नियम १९ मध्ये तरतूद करण्यात आलेल्या पद्धतीनुसार पुन्हा लेखा अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येईल आणि त्यानंतर प्रस्तुत नियमांच्या तरतुदी शक्य असतील तेथवर विमापत्राबाबत लागू होतील :

परंतु आणखी असे की, विमापत्र कोणत्याही प्रकारे परिणत झाले असेल किंवा अभिहस्तांकित केले गेले असेल किंवा त्यावर भार निर्माण करण्यात आला असेल किंवा त्यावर बोजा टाकण्यात आला असेल तर विमापत्र अभिहस्तांकित आणि स्वाधीन करण्यात कसूर झाल्यावर नियम १९ च्या पोट-नियम (३) च्या तरतुदी ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणे त्या याबाबतीतही लागू होतील.

(२) नियम २२ च्या पोट-नियम (३) मध्ये तरतूद केली असेल ती खेरीज करून, वर्गणीदार नोकरी सोडून जाण्यापूर्वी मरण पावल्यास लेखा अधिकारी,—

(एक) नियम १९ खाली, जर विमापत्र मुंबईच्या राज्यपालांच्या नावे अभिहस्तांकित करण्यात आले असेल तर तिसऱ्या अनुसूचीमध्ये दिलेल्या दुसऱ्या नमुन्यानुसार ते विमापत्र कायदेशिर हक्कदार असलेल्या व्यक्तीच्या नावे पुर्नअभिहस्तांकित करील आणि पुर्नअभिहस्तांकनाद्वारे आपल्या स्वाक्षरीनिशी विमा कंपनीला अनुलक्षून लिहिलेल्या नोटिशीसह असे विमापत्र अशा व्यक्तींच्या स्वाधीन करील.

(दोन) जर नियम १९ च्या पोट-नियम (१) च्या खंड (ख) खाली विमापत्र त्याच्या स्वाधीन करण्यात आले असेल तर हे विमापत्र जर कोणी लाभाधिकारी असेल तर त्याच्या आणि लाभाधिकारी नसल्यास ते मिळण्यास जी कायदेशीररीत्या हक्कदार असेल त्या व्यक्तीच्या स्वाधीन करील.

[2][ २१. (१) नियम १९ खाली, राज्यपालांच्या नावे अभिहस्तांकित केलेले विमापत्र वर्गणीदार नोकरी सोडून जाण्यापूर्वी परिणत झाले असेल किंवा वर्गणीदार आणि त्याची पत्नी यांच्या संयुक्त जीवनावरील विमापत्र उक्त नियमाखाली अभिहस्तांकित केले असेल आणि पत्नी किंवा पती यांचा मृत्यू झाल्याकारणाने भरणा झालेल्या

---

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९७८ अन्वये वगळण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक ८-१-१९८० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

विमापत्राची रक्कम देय झाली असेल तर नियम २२ च्या पोट-नियम (३) मध्ये तरतूद केली असेल ती खेरीज करून लेखा अधिकारी कोणत्याही उपर्जित बोनससहित विम्याची रक्कम वसूल करील व अशी वसूल केलेली रक्कम वर्गणीदाराच्या निधीमध्ये जमा करील :

परंतु, जर उपर्जित बोनससहित विम्याची रक्कम रोखून ठेवलेल्या किंवा काढून घेतलेल्या रकमेपक्षा अधिक असेल तर, अशा फरकाची रक्कम याबाबतीत त्याने केलेला लेखी अर्ज मिळाल्यावर वर्गणीदारास परत करणे हे लेखा अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

(२) दिलेल्या नियम २२ च्या पोट-नियम (३) अन्वये तरतूद केली असेल ती खेरीज करून लेखा अधिकाऱ्याकडे वर्गणीदाराने जर नोकरी सोडून जाण्यापूर्वी, नियम १९ च्या पोट-नियम (१) च्या खंड (ख) अन्वये परिणत विमापत्र पाठवले असेल तर लेखा अधिकारी वर्गणीदारास विमापत्र परत करील.

परंतु, विमापत्राच्या दर्शनी बाजूवर व्यक्त केल्याप्रमाणे, वर्गणीदाराची पत्नी किंवा त्याची पत्नी आणि मुले यांचे किंवा त्यापैकी कोणाचेही हितसंबंध, विमापत्र परिणत झाल्यावर संपुष्टात आले असतील तर वर्गणीदार, विमा कंपनीद्वारे विमापत्राची रक्कम त्याला देण्यात आली असल्यास ती रक्कम मिळताच ताबडतोब एकतर–

(एक) विमापत्राच्या संबंधात रोखून ठेवलेल्या किंवा निधीमधून काढून घेतलेल्या कोणत्याही रकमेचा संपूर्ण हिस्सा [1][ * * ], किंवा

(दोन) उपर्जित केलेल्या बोनससहित विम्याची रकमेइतकी रक्कम, यापैकी जी कमी असेल ती रक्कम निधीमध्ये जमा करील आणि असे करण्यास कसूर झाल्यास, नियम १५ च्या खंड (क) आणि खंड (ख) खाली रोखून ठेवलेली किंवा निधीतून काढून घेतलेली रक्कम ज्या कारणासाठी ती रोखून ठेवण्यास किंवा निधीतून काढून घेण्यास मंजूरी देण्यात आली होती त्या व्यतिरिक्त वापरण्यात आली असेल तर अशा प्रकरणात ज्याप्रमाणे नियम २२ (क) च्या तरतुदी लागू होतात त्याचप्रमाणे त्या याबाबतही लागू होतील.

२२. (१) जर कोणत्याही कारणासाठी कुटुंबवेतन निधीमधील वर्गणीदाराचे हितसंबंध पूर्णतः किंवा अंशतः संपुष्टात आले असतील तर, वर्गणीदाराला कुटुंबवेतन निधीमधून मिळालेल्या रकमेतून, कोणतीही असल्यास, त्याच्या भविष्यनिर्वाह निधी खात्यात तात्काळ भरपाई करावी लागेल आणि यात कसूर झाल्यास ती रक्कम नियम १२ (२) (क) खालील यासारख्या वर्गणीदारास अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असणाऱ्या अशा ह्या नियमांच्या अनुसूची पाच मध्ये विनिर्दिष्ट असेल त्याप्रमाणे प्राधिकाऱ्याने निर्देशित केल्यानुसार हप्त्याहप्त्याने किंवा इतर प्रकारे वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून भरपाईसाठी वजा केली जाईल.

(२) जर विमापत्र व्यपगत झाले असेल किंवा नियम १९ खाली मुंबईच्या राज्यपालाव्यतिरिक्त अन्य कोणाला ते अभिहस्तांकित केले गेले असेल, त्यावर भार निर्माण केलेला असेल किंवा बोजा टाकलेला असेल तर, विमापत्र अभिहस्तांकित किंवा स्वाधीन करण्यात कसूर केल्याबाबत नियम १९ च्या पोट-नियम (४) च्या तरतुदी ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे त्या याबाबतीतही लागू होतील.

(३) जर लेखा अधिकाऱ्याला,—

(क) (नियम १९ खाली मुंबईचे राज्यपाल यांच्या नावे केलेल्या अभिहस्तांकनाव्यतिरिक्त) अन्य अभिहस्तांकनाची, किंवा

(ख) भार निर्माण केलेल्या किंवा बोजा असलेल्या विमापत्राबाबत नोटीस मिळाली असेल, किंवा

---

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९७८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

(ग) विमापत्र किंवा त्यावर मिळालेल्या रकमेसंबंधी कोणताही व्यवहार करण्याबाबत न्यायालयाकडून मनाई आदेश मिळाला असेल तर, लेखा अधिकारी–

(एक) नियम २० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे विमापत्र पुर्नअभिहस्तांकित करणार नाही किंवा परत करणार नाही, किंवा

(दोन) विमापत्राद्वारे उतरविलेली रक्कम वसूल करणार नाही किंवा नियम २१ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे विमापत्र पुर्नअभिहस्तांकित करणार नाही किंवा परत करणार नाही.

परंतु ही बाब लेखा अधिकारी शासनाकडे तावडतोब संदर्भित करील.

२२क. या नियमात काहीही अंतर्भूत असले तरीही नियम १२ अन्वये निधीमधून अग्रिम म्हणून काढण्यात आलेली रक्कम किंवा नियम १५ च्या खंड (क) किंवा खंड (ख) खाली रोखून ठेवलेली किंवा काढून घेतलेली निधीमधील रक्कम मंजुरी देण्यात आलेल्या प्रयोजनाखेरीज इतर प्रकारे वापरण्यात आली, अशी मंजुरी प्राधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर वर्गणीदार अशी रक्कम [1][* * *] निधीमध्ये जमा करील किंवा परत करील आणि यात कसूर झाल्यास वर्गणीदाराच्या वित्तलब्धीमधून ही रक्कम तो रजेवर असला तरीही एक रकमी वसूल करण्याचा आदेश दिला जाईल. जर परत करावयाची रक्कम किंवा यथास्थिती जमा करण्यात येणारी एकूण रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीच्या अर्ध्यापेक्षा जास्त असेल तर परत करावयाच्या किंवा यथास्थिती भरण्यात येणाऱ्या रकमेची संपूर्ण परतफेड होईपर्यंत वर्गणीदाराच्या वित्तलब्धीच्या अर्ध्या रकमेच्या मासिक हप्त्यानुसार वसूल केली जाईल.

टीप.—या नियमात वापरण्यात आलेल्या " वित्तलब्धी " या शब्दप्रयोगात निर्वाह अनुदानाचा समावेश होत नाही.

खाती जमा असलेल्या रकमा कोणत्या परिस्थितीत देय आहेत

२३. जेव्हा वर्गणीदार नोकरी सोडून जाईल तेव्हा निधीमध्ये त्याच्या खाती जमा असलेली रक्कम, नियम २६ खाली असलेली कोणतीही वजावी करून त्याला देय होईल :

परंतु, सेवेतून बडतर्फ करण्यात आलेल्या वर्गणीदाराला पुन्हा सेवेत घेण्यात आले तर, शासनाला तसे करणे आवश्यक वाटल्यास वर्गणीदाराला या नियमानुसार निधीमधून देण्यात आलेली रक्कम, तो नियम ११ अन्वये त्यावरील व्याजासह, नियम २४ च्या परंतुकात तरतूद केलेल्या पद्धतीनुसार परत करील. अशी परत करण्यात आलेली रक्कम त्याच्या खात्यात निधीमध्ये जमा करण्यात येईल. त्याची वर्गणी व त्यावरील व्याज निर्दिष्ट करणारा एक भाग आणि शासकीय अंशदान व त्यावरील व्याज निर्दिष्ट करणारा दुसरा भाग, नियम ६ मध्ये तरतूद केलेल्या पद्धतीने हिशेबात घेण्यात येईल.

स्पष्टीकरण एक.–ज्या वर्गणीदारास नाकारण्यात आलेली रजा मंजूर करण्यात आली असेल तो वर्गणीदार सक्तीच्या निवृत्तीच्या दिनांकापासून किंवा सेवाकाळ संपल्यानंतर सेवा सोडून गेला असल्याचे मानण्यात येईल.

स्पष्टीकरण दोन.–संविदेतर नियुक्त करण्यात आलेल्या किंवा निवृत्त झाल्यानंतर ज्यास पुनर्नियुक्त करण्यात आले असेल मग त्याच्या सेवेत खंड पडलेला असो वा नसो-अशा वर्गणीदाराव्यतिरिक्त इतर वर्गणीदाराची सेवेत खंड न पडता, परंतु पहिल्या पदाशी काहीही संबंध न ठेवता इतर राज्यातील किंवा केंद्र शासनातील किंवा त्याच शासनाच्या दुसऱ्या विभागातील नवीन पदावर (जे पद भविष्य निर्वाह निधी नियमांच्या वेगळ्या संचाद्वारे प्रशासित केले जाते) बदली करण्यात आली तर तो सेवा सोडून गेला असे मानले जाणार नाही. अशा प्रकरणी त्याची

---

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९७६ अन्वये वगळण्यात आले.

वर्गणी आणि शासकीय अंशदान त्यावरील व्याजासहित.—

(क) जर नवीन पद राज्य शासनाच्या दुसऱ्या विभागात असेल तर, तेथील निधींच्या नियमांनुसार त्या निधीतील खात्यावर, किंवा

(ख) जर नवीन पद दुसऱ्या राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या अधिकारात असेल तर संबंधित राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या अधिकारातील नवीन खात्यात असे राज्य शासन किंवा केंद्र शासन त्याची वर्गणी, शासकीय अंशदान आणि व्याज हस्तांतरित करण्यास सर्वसामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे संमती देईल त्याप्रमाणे हस्तांतरित करण्यात येईल.

**स्पष्टीकरण तीन.**–(१) संविदेवर नियुक्त झालेल्या किंवा निवृत्त झाल्यानंतर पुन्हा कामावर घेतलेल्या वर्गणीदाराखेरीज इतर वर्गणीदार जेव्हा सेवेत खंड न पडता, शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या महामंडळामध्ये किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदणी केलेल्या स्वायत्त संघटनांमध्ये नोकरीसाठी बदलून जाईल तेव्हा निधीत त्यांच्या खाती जमा असलेली रक्कम त्याला दिली जाणार नाही तर, यथास्थिती अशा महामंडळाच्या किंवा संघटनेच्या संमतीने त्याच्या नवीन भविष्यनिर्वाह निधीच्या खात्याकडे ती हस्तांतरित केली जाईल.

(२) "बदली " या संज्ञेत राज्य शासनाच्या अनुज्ञेने शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या महामंडळामध्ये किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६०, खाली निर्देशित केलेल्या स्वायत्त संघटनेमध्ये नियुक्ती स्वीकारण्यासाठी राजीनामा दिलेल्या प्रकरणांचाही अंतर्भाव होईल. नवीन पद स्वीकारण्यासाठी लागणारा कालावधी हा शासकीय कर्मचाऱ्याला एक पद सोडून दुसरे स्वीकारताना लागणाऱ्या पदग्रहण अवधीपेक्षा अधिक नसेल तर तो सेवेतील खंड असल्याचे मानले जाणार नाही.

**टीप.**–' बदली ' या संज्ञेत केंद्र सरकार किंवा इतर राज्य शासनाच्या किंवा त्याच राज्य शासनाच्या इतर विभागात (जेथे वर्गणीदारास भविष्यनिर्वाह निधीचे इतर नियम लागू असतील) नियुक्ती स्वीकारण्यासाठी सेवेत खंड न पडता दिलेल्या राजीनाम्याच्या प्रकरणाचाही समावेश केला जाईल. सेवेत नाममात्र खंड असणाऱ्या प्रकरणी असा खंड दुसऱ्या गादी बदली करण्यासाठी मिळणाऱ्या पदग्रहण अवधी इतकाच काटेकोरपणे मर्यादित असला पाहिजे.

कपातीच्या प्रकरणीसुद्धा, जर त्याच किंवा इतर राज्य शासनाखाली त्वरित नवीन नोकरी मिळाली असेल तर हाच नियम लागू होईल.

२४. जेव्हा वर्गणीदार,—

(क) निवृत्तीपूर्व रजेवर गेला असेल किंवा दीर्घ कालावधीची सुटी मिळणाऱ्या विभागामध्ये नोकरीस असेल आणि त्याने निवृत्तीपूर्व रजा आणि सुटी एकत्रित घेतली असेल तेव्हा, किंवा

(ख) रजेवर असताना त्याला निवृत्त होण्याची परवानगी देण्यात आली असेल, किंवा सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने त्यास आणखी सेवेसाठी अयोग्य ठरवले असेल तेव्हा, वर्गणीदाराला त्याच्या खाती निधीत जमा असलेली वर्गणीची व त्यावरील व्याजाची रक्कम त्या बाबतीत त्याने लेखा अधिकाऱ्याकडे अर्ज केल्यास देय होईल :

परंतु, जर वर्गणीदारास पुन्हा सेवेत रूजू करून घेण्यात आले असेल तर ह्या नियमाला अनुसरून निधीमधून, नियम ११ मध्ये तरतूद केलेल्या दरानुसार त्यावर होणाऱ्या व्याजासहित रोख रकमेत किंवा कर्जरोख्यांमध्ये किंवा अंशतः रोख आणि अंशतः कर्जरोख्यांमध्ये हप्त्याहप्त्याने किंवा अन्यथा त्याच्या वित्तलब्धीमधून वसुलीने किंवा शासनाने निर्देशित केले असेल त्याप्रमाणे [1][शासनाने अन्यथा हा निर्णय घेतला असेल ते खेरीज करून त्याला देण्यात आलेली रक्कम त्याच्या खात्यावर निधीत पुन्हा जमा करावी लागेल.]

[1] हा मजकूर शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९७६ अन्वये दाखल करण्यात आला.

|. वर्गणीदाराच्या खात्यावर असलेली जमा रक्कम देय होण्यापूर्वी किंवा रक्कम देय झाल्यानंतर ती करण्यात येण्यापूर्वी वर्गणीदार मृत्यू पावल्यास, नियम २६ खालील कोणतीही वजाती करण्याच्या तेने,–

क) त्याच्यामागे त्याचे कुटुंब असेल त्यावेळी–

(क) जर त्याने नियम ५ च्या तरतुदींनुसार हयात असलेल्या त्याच्या कुटुंबातील व्यक्तीच्या किंवा क्तींच्या नावे नामनिर्देशन केले असेल तर निधीतील त्याच्या खात्यावरील रक्कम किंवा नामनिर्देशनात नमूद लेली अंशतः रक्कम नामनिर्देशित व्यक्तीला किंवा व्यक्तींना, नामनिर्देशनात विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणात ली जाईल.

, (ख) असे कोणतेही नामनिर्देशन कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे करण्यात आले सेल किंवा हे नामनिर्देशन त्याच्या खात्यावरील रकमेच्या काही भागापुरतेच मर्यादित असेल तर, यथास्थिति पूर्ण रक्कम किंवा नामनिर्देशनाशी संबंधित नसेल अशा तिचा भाग, कुटुंबातील व्यक्ती सोडून इतर कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे एखादे नामनिर्देशन केलेले असो वा नसो, कुटुंबातील व्यक्तींना समप्रमाणात देय होईल :

रंतु खंड (१), (२), (३) व (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त अन्य व्यक्ती कुटुंबात असतील

(१) कायदेशीरदृष्ट्या सज्ञान झालेले मुलगे ;
(२) मयत मुलाचे कायदेशीरदृष्ट्या सज्ञान झालेले मुलगे ;
(३) ज्यांचे पती हयात आहेत अशा विवाहित मुली ;
(४) ज्यांचे पती हयात आहेत अशा, मयत मुलांच्या विवाहित मुली ;
यांना ह्यातील कोणताही हिस्सा देय होणार नाही :

रंतु आणखी असे की, मृत मुलाच्या विधवेला किंवा विधवांना व मुलाला किंवा मुलांना, जर तो मुलगा णीदाराच्या मागे हयात राहिला असता व त्याला पहिल्या परंतुकाच्या खंड (१) च्या तरतुदींतून वगळले असते त्याला जो हिस्सा मिळाला असता त्याचे भाग त्यांना सम प्रमाणात मिळतील.

टीप.–ह्या नियमाखाली वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्तींना देय असलेली कोणतीही रक्कम, अशा व्यक्तींना ष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५, कलम ३, पोट-कलम (२) खाली निहित असते.

दोन) जेव्हा वर्गणीदाराचे कोणतेही कुटुंब नसेल तेव्हा जर त्याने नियम ५ च्या तरतुदींअनुसार किंवा यापूर्वी लात असलेल्या संबंधित नियमानुसार कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे केलेले नामनिर्देशन हयात असेल तर निधीत त्याच्या नावे असलेली रक्कम किंवा तिचा भाग ज्याच्याशी नामनिर्देशन संबंधित ल त्या नामनिर्देशित व्यक्तीला किंवा व्यक्तींना नामनिर्देशनात विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणात देय होईल.

टीप १.–भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५, कलम २, खंड (ग) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जेव्हा निर्देशित व्यक्ती वर्गणीदारावर अवलंबून असते तेव्हा त्या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) खाली रक्कम अशा नामनिर्देशित व्यक्तीला निहित असते.

टीप २.–जेव्हा वर्गणीदाराचे कोणतेही कुटुंब नसेल आणि त्याने विद्यमान नियम ५ च्या तरतुदींअनुसार निर्देशन केले नसेल, किंवा असे नामनिर्देशन निधीमध्ये त्याच्या खात्यावरील रकमेच्या काही भागापुरते दित असेल तर, भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५, च्या खंड (ख) आणि खंड (ग) च्या उपखंड (दोन) ा कलम ४ च्या पोट-कलम (१) यांच्याशी संबंधित तरतुदी, संपूर्ण रकमेस किंवा नामनिर्देशनाशी संबंधित ल अशा तिच्या भागास लागू आहेत.

[1][२५-क. वर्गणीदाराच्या मृत्युनंतर, वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीस, लेखा अधिकारी, पुढील शर्तीस अधीन राहून, अशा वर्गणीदाराच्या मृत्यूच्या लगतपूर्वीच्या तीन वर्षांमध्ये त्याच्या खाती जमा असलेल्या वर्गणीची रक्कम आणि त्यावरील व्याज दर्शविणाऱ्या सरासरी शिलकीएवढी अतिरिक्त रक्कम देईल, त्या शर्ती अशा–

(क) अशा वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली वर्गणीची रक्कम, त्यावरील व्याजासह दर्शविणारी शिल्लक ही, मृत्यूच्या महिन्याच्या निकटपूर्वीच्या तीन वर्षांमध्ये कोणत्याही वेळी पुढील मर्यादेपेक्षा कमी असता कामा नये, त्या मर्यादा अशा–

(एक) ज्या वर्गणीदाराने वर्ग एकचे पद धारण केले असेल त्याच्या बाबतीत रुपये ४,००० ;

(दोन) ज्या वर्गणीदाराने वर्ग दोनचे पद धारण केले असेल त्याच्या बाबतीत रुपये २,५०० ;

(तीन) ज्या वर्गणीदाराने वर्ग तीनचे पद धारण केले असेल त्याच्या बाबतीत रुपये १,५०० ;

(चार) ज्या वर्गणीदाराने वर्ग चारचे पद धारण केले असेल त्याच्या बाबतीत रुपये १,००० ;

परंतु, असा वर्गणीदार १ एप्रिल १९७८ पूर्वी मरण पावला असेल तर या खंडातील कोणतीही गोष्ट त्यास लागू होणार नाही :

परंतु आणखी असे की, वर्ग एकच्या अधिकाऱ्याच्या संबंधात भविष्य निर्वाह निधीतील किमान अर्हताकारी शिल्लक म्हणजेच ४,००० ही रक्कम तो १ ऑगस्ट १९७८ रोजी किंवा त्यानंतर मरण पावला असेल त्या बाबतीतच लागू होईल.

(ख) या नियमाअन्वये देय असलेली अतिरिक्त रक्कम रुपये १०,००० हून अधिक असता कामा नये ;

(ग) वर्गणीदाराने मृत्यूच्या वेळेपर्यंत किमान पाच वर्षांची सेवा केलेली असली पाहिजे ;

(घ) ह्या योजनेच्या प्रयोजनासाठी कर्मचाऱ्यादी फक्त वर्गणी तीवरील व्याजासह शिल्लक म्हणून घेण्यात येईल.

टीप १.–सरासरी शिल्लक ही, ज्या महिन्यात मृत्यू घडला असेल त्या महिन्याच्या आधीच्या ३६ महिन्यांच्या प्रत्येक महिना अखेरीस त्या वर्गणीदाराच्या खाती जमा असलेल्या शिल्लक रकमेच्या आधारावर काढण्यात येईल. या प्रयोजनासाठी तसेच वर विहित केलेली किमान शिल्लक रक्कम तपासण्यासाठी–

(क) मार्चच्या अखेरीस असलेल्या शिलकेमध्ये, नियम ११ च्या संदर्भात जमा झालेल्या वर्गणीवरील वार्षिक व्याजाचा अंतर्भाव होईल ; आणि

(ख) उपरोक्त ३६ महिन्यांच्या शेवटचा महिना मार्च नसेल तर, उक्त शेवटच्या महिन्यांच्या अखेरीच्या शिलकीमध्ये, ज्या वित्तीय वर्षात मृत्यू झाला असेल त्या वित्तीय वर्षाच्या प्रारंभापासून उक्त अखेरच्या महिन्यापर्यंतच्या कालावधीच्या संबंधीतील वर्गणीवरील व्याजाचा अंतर्भाव होईल ;

टीप २.–या योजनेखालील रक्कम संपूर्ण रुपयात असावी. देय रकमेमध्ये अपूर्ण रुपया असेल तर त्याचे नजीकच्या रुपयापर्यंत पूर्ण आकड्यात रुपांतर करण्यात यावे (५० पैसे लगत पुढील रुपयाइतके मानण्यात यावेत).

टीप ३.–ह्या योजनेअन्वये देय असलेली कोणतीही रक्कम विम्याच्या पैशाच्या स्वरुपात असेल आणि, म्हणून भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ (१९२५ चा १९) याच्या कलम ३ द्वारे देण्यात आलेले सर्वाधिक संरक्षण अशा रकमेस लागू होणार नाही.

टीप.४.–एखाद्या शासकीय विभागाचे एखाद्या स्वायत्त संस्थेमध्ये रुपांतर झाल्यानंतर ज्या वर्गणीदारांची अशा स्वायत्त संघटनेकडे बदली झाली असेल आणि अशी बदली झाल्यानंतर त्यांना देण्यात आलेल्या पर्यायाच्या अनुसार ज्यांनी या नियमानुसार निधीमध्ये वर्गणी देण्याचा पर्याय स्वीकारला असेल अशा वर्गणीदारांना सुध्दा ही योजना लागू होईल.

---

[1] हा मजकूर शासकीय अधिसूचना, दिनांक ३०-६-१९८१ अन्वये दाखल करण्यात आला.

टीप ५.–(क) नियम ४ च्या पोट-नियम (४) किंवा पोट-नियम (५) अन्वये ज्याला या निधीचे फायदे मिळणार सतील परंतु निधीमध्ये दाखल करून घेतल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीन वर्षाची किंवा पाच वर्षाची किंवा ाच वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी जो मरण पावला असेल अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याने पूर्वीच्या लिकाकडे केलेल्या ज्या सेवेच्या संबंधातील त्याच्या वर्गणीची रक्कम आणि मालकाचे अंशदान, कोणतेही सल्यास, व्याजासह मिळाले तर तो असा त्याच्या सेवेचा कालावधी खंड (क) आणि (ग) यांच्या प्रयोजनासाठी शोबात घेण्यात येईल.

(ख) पदावधीच्या (टेन्युअर) तत्त्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत आणि पुन्हा नोकरीत वलेल्या निवृत्तीवेतनधारींच्या बाबतीत, अशा नियुक्तीच्या किंवा यथास्थिती पुनर्सेवा योजनेच्या दिनांकापासून लेली सेवा फक्त, या नियमाच्या प्रयोजनासाठी हिशेबात घेण्यात येईल.

(ग) ही योजना कंत्राटाच्या तत्त्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना लागू होणार नाही.

टीप ६.–या योजनेच्या संबंधातील खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज, मंत्रालयाच्या संबंधित प्रशासकीय विभागाकडून यार करण्यात येईल.

टीप ७.–मृत्यूच्या वेळी शासकीय कर्मचारी ज्या कार्यालय प्रमुखाच्या हाताखाली काम करीत असेल तो र्यालय प्रमुख, या योजनेखाली अनुज्ञेय असलेली रक्कम मंजूर करणारा प्राधिकारी असेल तसेच, तो उक्त क्कम देणारा आहरण व संवितरण अधिकारीही असेल.

टीप ८.–एखाद्या वर्गणीदाराने त्याच्या मृत्यूच्या महिन्याच्या लगतपूर्वीच्या ३६ महिन्यामध्ये वेगवेगळ्या वर्गातील द (पदे) धारण केली असतील त्याबाबतीत, अशा एखाद्या मृत वर्गणीदाराच्या संबंधातील समूचित किमान र्हताकारी शिल्लकही, उक्त ३६ महिन्यापैकी अधिक मोठ्या कालावधीसाठी ज्या वर्गातील पद त्याने धारण केले सेल त्या वर्गाच्या संबंधातील असेल.

टीप ९.–या योजनेच्या फायद्यासाठी मुसलमान वर्गणीदाराची पात्रता, त्याच्या खाती जे व्याज जमा करण्यात ाले असते ते व्याज त्याने अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियमाखाली (मुंबई) च्या नियम ११(५) अन्वये स्वेच्छेने ाधीन केले असल्यास काल्पनिकदृष्ट्या विचारात घेऊन ठरवण्यात येईल.]

वजाती

२६. वर्गणीदाराच्या खात्यातील निधीत जमा असलेली रक्कम निधीमधून देण्यात येण्यापूर्वी कोणत्याही जातीने शासनाचे कोणतेही अंशदान व नियम १० व ११ अन्वये त्यावर जमा केलेल्या व्याजाची रक्कम यापेक्षा मा रक्कम कमी केली जाणार नाही. ह्या शर्तीच्या अधीनतेने शासन त्यामधून वजाती करण्याचा व शासनास दान करण्याचा निदेश देईल—

(एक) जर वर्गणीदार गैरवर्तणूक, दिवाळखोरी किंवा अकार्यक्षमतेमुळे नोकरीतून काढून टाकला असेल तर से अंशदान आणि व्याजाच्या सर्व रकमा;

परंतु, जर अशा प्रकारच्या वजाती वर्गणीदारास असामान्य त्रास होईल अशी शासनाची खात्री पटल्यास ते शा वजातीमधून, वर्गणीदार जर वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त झाला असता तर त्याला जी रक्कम देय झाली राती ती अशा अंशदानाच्या व व्याजाच्या रकमेच्या दोन तृतीयांशाहून अधिक नसलेली रक्कम आदेशाद्वारे माफ रील :

परंतु आणखी असे की, जर बडतर्फीचा असा कोणताही आदेश नंतर रद्द केला गेला तर, अशी वजा केलेली क्कम त्याला सेवेमध्ये पुन्हा घेतल्यानंतर त्याच्या निधीमध्ये जमा केली जाईल;

(दोन) वर्गणीदाराने जर त्याची सेवा सुरू केल्यानंतर पाच वर्षाच्या आत सेवेचा राजीनामा दिला किंवा अन्यथा मृत्यू, नियत सेवावधि किंवा सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तो पुढील सेवेसाठी अयोग्य आहे अशा निवेदनावर किंवा ते पद रद्द केल्यामुळे किंवा आस्थापना कमी केल्यामुळे तो शासनाचा कर्मचारी म्हणून कमी केला गेला असेल तर असे अंशदान व व्याजाच्या सर्व रकमा;

(तीन) वर्गणीदाराने पत्करलेल्या शासनाच्या दायित्वामुळे कोणतीही देय असलेली रक्कम.

टीप १.—या नियमाच्या उप-खंड (दोन) च्या प्रयोजनार्थ—

(क) पाच वर्षाचा कालावधी, वर्गणीदाराच्या शासनातील अखंड सेवेच्या प्रारंभापासून गणण्यात येईल,

(ख) राज्य शासनाच्या अन्य विभागात किंवा केंद्र शासनात किंवा इतर राज्य शासनात किंवा शासनाद्वारे मालकी व नियंत्रण असलेल्या निगम निकायात किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) खाली, नोंदणीकृत स्वायत्त संघटनेत नेमणूक स्वीकारण्यासाठी सेवेत कोणताही खंड न करता, राज्य शासनाची योग्य परवानगी घेऊन देण्यात आलेला राजीनामा हा शासन सेवेचा देण्यात आलेला राजीनामा असल्याचे समजण्यात येणार नाही.

टीप २.—या नियमाखालील शासनाचे अधिकार, त्यात निर्देशिलेल्या रकमांच्याबाबतीत ज्याच्या अनुदानासाठी नियम १२ च्या खंड (ख) व (ग) अन्वये विशेष कारणांची आवश्यकता आहे. ते अग्रिम मंजूर करण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्याकडून देखील वापरण्यात येतील.

### प्रदान

२७. (१) जेव्हा वर्गणीदाराच्या नावे निधीत जमा असलेली रक्कम, किंवा नियम २६ अन्वये कोणतीही वजात झाल्यानंतर शिल्लक रक्कम देय होईल तेव्हा, लेखा अधिकाऱ्याने स्वतःची खात्री पटवून घेतल्यानंतर त्याचे कर्तव्य असेल की, जेव्हा त्या नियमाखाली अशी कोणतीही वजात विनिर्दिष्ट केलेली नसेल तर भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९२५ च्या कलम ४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रदान करण्यासाठी कोणतीही वजात करण्यात येवू नये.

(२) ज्या कोणत्याही व्यक्तीस या नियमाखाली, कोणतीही रक्कम किंवा कोणतेही विमापत्र प्रदान करावयाचे असेल, अभिहस्तांकित, पुनर्अभिहस्तांकित किंवा स्वाधीन करावयाचे असेल ती व्यक्ती वेडी असेल तर अशा व्यक्तीच्या इस्टेटीसाठी भारताचा वेड्याबाबतचा अधिनियम, १९१२ अन्वये ज्या व्यवस्थापकाची याबाबतीत नेमणूक केली असेल तर त्या व्यवस्थापकास अशी रक्कम प्रदान करण्यात येईल किंवा त्याच्या नावे विमापत्र पुनर्अभिहस्तांकित किंवा स्वाधीन करण्यात येईल. वेड्या व्यक्तीस ती रक्कम देण्यात येणार नाही.

परंतु जेथे कोणताही व्यवस्थापक नेमण्यात आला नसेल व ज्या व्यक्तीला रक्कम देय असेल ती व्यक्ती वेडी असल्याचे दंडाधिकाऱ्याने प्रमाणित केले असेल तर, भारताचा वेड्याबाबतचा अधिनियम, १९१२ च्या कलम ९५ च्या पोट-कलम (१) च्या अर्थानुसार जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशान्वये अशा वेड्या व्यक्तीचा जिच्याकडे ताबा असेल त्या व्यक्तीस ती रक्कम प्रदान करण्यात येईल, व लेखा अधिकारी अशा वेड्या व्यक्तीचा ताबा जिच्याकडे असेल त्या व्यक्तीस केवळ, त्याला योग्य वाटेल अशी रक्कम देईल आणि जर कोणतीही रक्कम शिल्लक राहिली तर ती किंवा तिचा कोणताही भाग, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे वेड्या व्यक्तीच्या कुटुंबीयांच्या निर्वाहासाठी, ते निर्वाहासाठी त्याच्यावर अवलंबून असल्याने देण्यात येईल.

[१][(३) काढलेल्या रकमेचे प्रदान केवळ भारतातच करण्यात येईल. रकमा ज्या व्यक्तींना देय असतील त्या व्यक्ती, त्यांना भारतात रक्कमा मिळतील अशी व्यवस्था स्वतःच करतील. वर्गणीदाराने रकमेची मागणी करताना पुढील पद्धती अनुसरावी ती अशी,—

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २३-३-१९७६ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(एक) वर्गणीदारास निधीतील रक्कम काढण्यारिता अर्ज सादर करणे शक्य व्हावे म्हणून कार्यालय प्रमुख, प्रत्येक वर्गणीदारास, त्यांचे नियत वयोमान होण्याच्या दिनांकापूर्वी एक वर्ष अगोदर किंवा त्याची अपेक्षित सेवानिवृत्ती जर अगोदरची असेल तर त्यापूर्वी, आवश्यक ते नमुने, ते वर्गणीदारास मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत यथोचितरित्या भरून त्याच्याकडे परत पाठविण्यात यावे अशा अर्थाच्या सूचनांसह पाठविल. वर्गणीदार, तो अर्ज, निधीची रक्कम मिळविण्यासाठी कार्यालय प्रमुखामार्फत अथवा विभागामार्फत, लेखा अधिकाऱ्याकडे सादर करील, असा अर्ज—

(क) वर्गणीदाराच्या नियत वयोमानाच्या दिनांकाच्या अथवा त्याच्या अपेक्षित सेवानिवृत्तीच्या दिनांकाच्या एक वर्ष अगोदर संपणाऱ्या वर्षाच्या लेखाविवरणामध्ये दर्शविल्याप्रमाणे निधीमधील त्याच्या खात्यावर जमा झालेल्या रकमेसाठी; किंवा

(ख) लेखाचे विवरण वर्गणीदारास मिळालेले नसेल तर अशा वेळी त्याच्या खातेवही लेख्यामध्ये दर्शवलेल्या रकमेसाठी, करता येईल.]

(दोन) कार्यालय प्रमुख किंवा विभागप्रमुख, लेखा अधिकाऱ्याकडे वर्गणीदाराने घेतलेल्या ज्या रकमांची वसुली सध्या चालू आहे अशा आगाऊ रकमा, अग्रिमाच्या रकमा आणि अग्रिमानुसार वसूल करण्यात येणारी रक्कम व अजूनही वसूल करण्याचे चालू असलेल्या आणि प्रत्येक अग्रिमाच्या संबंधात वसूल करावयाच्या हप्त्यांची संख्या दर्शवणारा आणि त्याने जर कोणत्याही रकमा काढल्या असतील तर त्या रकमाही दर्शवणारा अर्ज अग्रेषित करील.

(तीन) लेखा अधिकारी, लेखाची पडताळणी केल्यानंतर अर्जात दर्शविलेल्या रकमेसाठी नियत कालावधीच्या किमान एक महिना आधी परंतु नियत कालावधीच्या दिनांकास त्यास रक्कम मिळेल अशा बेताने त्यास प्राधिकारपत्र देईल.

(चार) खंड (तीन) मध्ये उल्लेखिलेले प्राधिकारपत्र हे प्रदान करावयाच्या रकमेचा पहिला हप्ता असेल. दुसरे प्राधिकारपत्र नियत सेवावधीच्या नंतर शक्य तितक्या लवकर दिले जाईल. दुसरे प्राधिकारपत्र वर्गणीदाराने खंड (एक) खाली सादर केलेल्या अर्जात उल्लेखिलेल्या रकमेनंतर दिलेली वर्गणी अधिक पहिला अर्जाच्या वेळेस आगाऊ जे हप्ते चालू होते त्यांच्या परताव्याशी संबंधित असेल.

[२][(पाच) लेखा अधिकाऱ्याकडे अंतिम प्रदानासाठी अर्ज अग्रेषित केल्यानंतर, अग्रिम किंवा काढावयाची रक्कम, मंजूर करण्यात येईल, परंतु अग्रिमाची किंवा काढावयाची रक्कम संबंधित लेखा अधिकाऱ्याने प्राधिकृत केल्यानंतर काढण्यात येईल. अशी व्यवस्था, मंजुरी प्राधिकाऱ्याची त्याला औपचारिक मंजुरी मिळताच तावडतोब करील.

टीप.-जेव्हा वर्गणीदाराच्या नावे असलेली रक्कम नियम २३, २४ किंवा २५ खाली देय होईल, तेव्हा लेखा अधिकारी पोट-नियम (३) मध्ये दर्शविलेल्या रीतीने तत्परतेने रक्कम देण्यासंबंधीचे अधिकारपत्र देईल.]

### निवृत्तीवेतनार्ह सेवा

२८. (१) जर एखाद्या वर्गणीदाराची शासनातील निवृत्तिवेतनार्ह सेवेमध्ये कायमची बदली झाली तर तो पुढील पर्यायांसाठी हक्कदार असेल—

(क) एखाद्या वर्गणीदाराने ज्यामध्ये तो कोणत्याही निवृत्तीवेतनाचा हक्कदार नसेल त्या निधीमध्ये वर्गणी देणे चालू ठेवणे; किंवा

(ख) निवृत्तीवेतनार्ह सेवेच्या बाबतीत निवृत्तीवेतन मिळविणे या प्रकरणात त्याच्या कायम बदलीच्या दिनांकापासून—

(एक) तो निधीमध्ये वर्गणी देण्याचे बंद करील ;

(दोन) निधीत त्याच्या नावे असलेल्या शासकीय अंशदानाची त्यावरील व्याजासह असलेल्या रकमेची शासनाकडे परतफेड करण्यात येईल ;

---

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २७-६-१९८४ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] शासकीय अधिसूचना, दिनांक २७-६-१९८४ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

(तीन) निधीत त्याच्या नावे वर्गणीची, त्यावरील व्याजासह, असलेली रक्कम त्याच्या नावे सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीत हस्तांतरित करण्यात येईल. ज्यामध्ये त्यानंतर तो अनुक्रमे सक्तीच्या किंवा पर्यायी वर्गणीशी संबंधित असलेल्या त्या निधीच्या नियमांनुसार वर्गणी देईल किंवा त्याला वर्गणी देता येईल ; आणि

(चार) त्यास लागू असलेल्या निवृत्तवेतन नियमांनुसार त्यास अनुज्ञेय असलेल्या मर्यादेपर्यंत बदलीच्या दिनांकापूर्वी त्याने व्यतीत केलेला सेवावधी निवृत्तिवेतनासाठी जमेस धरण्याचा हक्क राहील.

(२) वगर्णणीदार पोट-नियम (१) खाली त्याचा पर्याय, त्याला कायमचे नवृत्तिवेतनार्ह सेवेमध्ये बदली करणाऱ्या आदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत लेखा अधिकाऱ्यास पत्राद्वारे कळवील ; आणि जर लेखाधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये हा पत्रव्यवहार त्या कालावधीत मिळाला नाही तर वर्गणीदाराने त्याचा पर्याय त्या उपनियमाच्या खंड (ख) मध्ये उल्लेख केलेल्या पद्धतीने उपयोगात आणला असे मानण्यात येईल.

## कार्यपद्धती

२९. या नियमाखाली निधीत भरलेल्या सर्व रकमा शासनाच्या पुस्तकांतील "अंशदायी भविष्यनिर्वाह निधी (मुंबई) लेखा " या नावाच्या लेख्यात जमा करण्यात येतील. या नियमाखाली रकमा देय झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत ज्या घेतल्या गेल्या नाहीत त्या रकमा, या नियमाखाली या वर्षाच्या ३१ मार्च नंतर "ठेवी " या सदरात हस्तांतरित करण्यात येतील आणि त्याबाबतची कार्यवाही ठेवीसंबंधीच्या सर्वसाधारण नियमांनुसार करण्यात येईल.

३०. जेव्हा भारतात, एक तर वित्तलब्धीमधून वजा करुन किंवा रोख स्वरुपात वर्गणी भरावयाची असेल तेव्हा वर्गणीदार त्याच्या निधीतील लेखा क्रमांक नमूद करील. असा लेखा क्रमांक त्यास लेखा अधिकाऱ्याकडून कळविण्यात येईल. त्याचप्रमाणे क्रमांकातील कोणताही बदल वर्गणीदाराला लेखा अधिकाऱ्याकडून कळवण्यात येईल.

३१. (१) लेखा अधिकारी प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चनंतर शक्य तितक्या लवकर प्रत्येक वर्गणीदाराला निधीतील त्याच्या लेख्याचे विवरणपत्र पाठवील. अशा विवरणपत्रात वर्षातील १ एप्रिल रोजीची प्रारंभिक शिल्लक, वर्षात जमा केलेली किंवा नावे बाजूस टाकलेली एकूण रक्कम, वर्षाच्या ३१ मार्च रोजीची जमा केलेली व्याजाची एकूण रक्कम व त्या दिनांकाची अखेरची शिल्लक रक्कम नमूद करण्यात येईल. लेखा अधिकारी लेख्याच्या विवरणपत्रास—

(क) नियम ५ अनव्ये कोणत्याही नामनिर्देशनात बदल करावयाची वर्गणीदाराची इच्छा आहे की काय;

(ख) नियम ५ च्या पोट-नियम (१) च्या परंतुकान्वये वर्गणीदाराच्या कुटुंबातील सदस्याच्या नावे कोणतेही नामनिर्देशन केलेले नसेल तर त्याचे कुटुंब आहे की काय, याबाबतची विचारणा जोडील.

(२) वर्गणीदारांनी वार्षिक विवरणपत्राच्या बिनचूकपणाबद्दल आपले समाधान करून घेतले पाहिजे व विवरणपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यात लेखा अधिकाऱ्याच्या निदर्शनास चुका आणून दिल्या पाहिजेत.

(३) लेखा अधिकारी, जर वर्गणीदाराकडून विनंती करण्यात आली तर, ज्या महिन्याचा लेखा लिहिण्यात आला आहे त्या शेवटच्या महिन्याच्या अखेरीस निधीत त्याच्या नावे असलेली रक्कम वर्षातून एकदाच पण अधिक वेळा नव्हे, त्याला कळवील.

३२. या नियमांपैकी कोणताही नियम कार्यान्वित केल्याने वर्गणीदाराला अनुचित त्रास होईल किंवा त्रास होण्याची शक्यता आहे. याबाबत शासनाची खात्री पटली असेल तेथे या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, शासनास वर्गणीदाराचे असे प्रकरण त्यास न्याय व समदर्शी वाटेल अशा रीतीने निकालात काढता येईल.

[1][अनुसूची एक

[नियम ५(३)]

* कुटुंब असलेल्या वर्गणीदारांच्या

* कुटुंब नसलेल्या वापरासाठी

(नमुना भरण्यापूर्वी मागील पृष्ठावर छापलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात)

नामनिर्देशनाचा नमुना

भविष्यनिर्वाह निधी लेखा क्र. .................

*(१) मी, ‡ ........................................................................................ याद्वारे, माझी भविष्यनिर्वाह निधीमधील रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून देण्यात आलेली नसेल अशावेळी माझा मृत्यू झाल्यास, निधीमध्ये माझ्या खात्यावर जमा झालेली असेल अशी रक्कम घेण्यास, अंशदायी भविष्यनिर्वाह निधी नियम (मुंबई) यांच्या नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, माझ्या कुटुंबातील व्यक्ती

*असलेली          *केलेल्या व्यक्तीला<br>
————— खाली निर्दिष्ट ————— नामनिर्दिष्ट करीत आहे, आणि असा निदेश देत<br>
*असलेल्या          *केलेल्या व्यक्तींना

*उक्त व्यक्तीच्या नावासमोर<br>
आहे की, उक्त रक्कम ————————— दिलेल्या पद्धतीने<br>
*उक्त व्यक्तींच्या नावासमोर

*त्या व्यक्तीला देण्यात यावी

—————————————

*त्या व्यक्तींमध्ये वाटून देण्यात यावी.

*(२) मी, ‡....................................... ‡ ........................................ अंशदायी भविष्यनिर्वाह निधी नियम (मुंबई) याच्या नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, कुटुंब धारण करीत नसल्याकारणाने माझी भविष्यनिर्वाह निधीमधील रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून देण्यात आलेली नसेल अशावेळी माझा मृत्यू झाल्यास निधीमध्ये माझ्या खात्यावर जमा झालेली असेल अशी रक्कम

*व्यक्तीस<br>
घेण्यास खाली निर्दिष्ट केलेल्या ————— नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निदेश देत आहे की,<br>
*व्यक्तींना

*उक्त व्यक्तीच्या नावासमोर<br>
उक्त रक्कम ————————— दिलेल्या पद्धतीने<br>
*उक्त व्यक्तींच्या नावासमोर

*त्या व्यक्तीला देण्यात यावी

—————————————

*त्या व्यक्तींमध्ये वाटून देण्यात यावी.

---

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २७-६-१९८४ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

यानंतर मी कुटुंब प्राप्त केल्यास हे नामनिर्देशन विधिग्राह्य ठरेल :—

| नामनिर्देशित *व्यक्तीचे/ *व्यक्तींचे नाव व पूर्ण पत्ता | वर्गणीदाराशी असलेले नाते | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | (प्रत्येक नाम-निर्देशित) व्यक्तीला देय असलेला भाग | आकस्मिक घटना घडल्यामुळे नामनिर्देशन निधी अग्राह्य ठरेल अशा आकस्मिक घटना | नामनिर्देशित व्यक्ती मरण *त्याचा पावल्यास —— हक्क *तिचा ज्या व्यक्तीकडे/व्यक्तींकडे जाणार असेल त्या व्यक्तीचे/व्यक्तींची नाव/नावे पत्ता आणि नाते |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

दिनांक .............................. २० .............................. ठिकाण ..............................

स्वाक्षरीचे दोन साक्षीदार

| नाव | पत्ता | वर्गणीदाराची स्वाक्षरी स्वाक्षरी |
|---|---|---|
| (१) | | |
| (२) | | |

*कार्यालय प्रमुखाच्या/*महालेखाकारांच्या कार्यालयातील वापरासाठी

श्री./श्रीमती/कुमारी .............................. यांनी केलेले नामनिर्देशनपत्र

पदनाम ..............................

नामनिर्देशन पत्र मिळाल्याचा दिनांक ..............................

स्वाक्षरी ..............................

(कार्यालय प्रमुखाचे पदनाम)

दिनांक ..............................

स्वाक्षरी ..............................

लेखा अधिकारी,

महालेखाकार यांचे कार्यालय

दिनांक ..............................

सूचना—

* लागू नसलेला किंवा अनावश्यक असलेला मजकूर खोडावा.

† येथे वर्गणीदाराने स्वतःचा भविष्य निर्वाह निधीतील लेखा क्रमांक लिहावा.

‡ येथे वर्गणीदाराने स्वतःचे नाव लिहावे.

(१) अंशदायी भविष्यनिर्वाह निधी नियम (मुंबई) यातील "कुटुंब" या शब्दाची व्याख्या खाली पुनरुदधृत केली ाहे:-

"कुटुंब" याचा अर्थ–

(एक) पुरूष वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराची पत्नी किंवा एक किंवा अनेक पत्नी आणि त्याची मुले; आणि वर्गणीदाराच्या मृत मुलाची विधवा किंवा मृत मुलाच्या विधवा आणि त्याची मुले :

परंतु, जर वर्गणीदार, त्याची पत्नी न्यायिकरीत्या त्याच्यापासून विभक्त झाली आहे किंवा ती ज्या जातीची आहे त्या जातीच्या रूढीगत विधीअनुसार तिने निर्वाहाचा हक्क गमावलेला असेल असे सिध्द करून दाखविले तर, हे नियम ज्या बाबतीत लागू होतात त्या बाबतीत ती व्यक्ती, वर्गणीदाराच्या कुटुंबाची सदस्य मानली जाणार नाही. तथापि, जर वर्गणीदार नंतर स्पष्ट लेखी नोटिशीद्वारे अशी व्यक्ती कुटुंबातील सदस्य समजण्यात यावी, असे लेखा अधिकाऱ्यास कळविल तर ती व्यक्ती वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्ती म्हणून समजण्यात येईल;

(दोन) स्त्री वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराचा पती आणि तिची मुले आणि वर्गणीदाराच्या मृत मुलाची विधवा किंवा मृत मुलांच्या विधवा आणि मुले असा आहे :

परंतु, जर एखाद्या वर्गणीदाराने, लेखा अधिकाऱ्याला केलेल्या लेखी निवेदनाद्वारे तिच्या पतीला कुटुंबातून वगळण्यात यावे, अशी इच्छा व्यक्त केली असेल आणि वर्गणीदाराने त्यानंतर त्याला, तिच्या कुटुंबातून वगळण्यासंबंधीचे लेखी निवेदन रद्द केलेले नसेल तर, हे नियम ज्या बाबींच्या संबंधात लागू असतील, त्या बाबींपुरते त्यास त्यापुढे कुटुंबाचा सदस्य असल्याचे समजण्यात येणार नाही.

टीप एक. –"मुले" याचा अर्थ औरस संतती असा आहे.

टीप दोन.–वर्गणीदारास लागू असलेल्या व्यक्तिगत कायद्यानुसार जर मूल दत्तक घेणे कायदेशीररीत्या मान्य रण्यात आले असेल व त्यामुळे मुलाला नैसर्गिक मुलाचा दर्जा प्राप्त होतो याबाबत लेखा अधिकाऱ्याची किंवा खा अधिकाऱ्यांच्या मनात कोणताही संदेह निर्माण झाल्यास, मुंबई शासनाचे सॉलिसिटर यांची खात्री पटली !, केवळ या प्रकरणी दत्तक घेतलेले मूल, मूल म्हणून समजण्यात येईल.

(२) केवळ एकाच व्यक्तीला नामनिर्देशित करण्यात आले असेल तर, नामनिर्देशितीच्या नावासमोर स्तंभ (४) ध्ये "पूर्ण रक्कम" असे लिहिण्यात यावे. एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्देशित केले असेल तर, वेष्यनिर्वाह निधीच्या संपूर्ण रकमेतील किती हिस्सा नामनिर्देशितीला देय आहे ते नामनिर्देशितीच्या नावासमोर भ (४) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात यावे.

(३) नामनिर्देशितीचा (नामनिर्देतींचा) मृत्यु ही घटना आकस्मिक घटना म्हणून स्तंभ (५) मध्ये नमूद करू नये.

(४) वर्गणीदाराने स्वतःचे नाव स्तंभ (६) मध्ये नमूद करू नये.

(५) वर्गणीदाराने नामनिर्देशनावर स्वाक्षरी केल्यानंतर त्यामध्ये आणखी कोणतीही नावे समाविष्ट करता येऊ ोत म्हणून शेवटच्या नोंदीनंतरच्या रिकाम्या जागेत तिरप्या रेषा काढाव्यात.]

## दुसरी अनुसूची

(नियम १९ पहा)

### अभिहस्तांकनाचे नमुने

(१)

मी, ............................ येथील अ. ब ............................ याद्वारे अंशदायी भविष्यनिर्वाह निधी नियम (मुंबई) यांच्या नियम २२ च्या पोट-नियम (२) खाली अंशदायी भविष्य निर्वाह निधी (मुंबई) मध्ये ज्या रकमा भरण्यास यापुढे दायी होईल, त्या सर्व रकमांचा भरणा करण्यासाठी मुंबईचे राज्यपाल यांना प्रस्तुत विमापत्र प्रतिभूती म्हणून अभिहस्तांकित करीत आहे.

मी याद्वारे असे प्रमाणित करतो की, विमापत्राचे यापूर्वी कोणतेही अभिहस्तांकन करण्यात आलेले नाही.

दिनांक ..................... २० वर्गणीदाराची स्वाक्षरी

ठिकाण .....................

स्वाक्षरीचा एक साक्षीदार

(२)

आम्ही, अ. ब. (वर्गणीदार) व ............................ क. ड. (सह-विमेदार) अंशदायी भविष्य निर्वाह निधी (मुंबई) यामध्ये मी उक्त अ. ब. यांच्याकडून देय असणाऱ्या वर्गणीऐवजी यासोबतच्या विमापत्रासंबंधातील प्रदाने करण्यास मान्यता देण्याची (किंवा, यथास्थिती, यासोबतच्या विमापत्राचा हप्ता देण्यासाठी, उक्त अ.ब. यांच्या खाती अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा असलेल्या रकमेमधून रुपये ........................इतकी रक्कम काढून घेण्यास मान्यता देण्याची) आमची विनंती मुंबईचे राज्यपाल यांनी मान्य केल्यावरुन, याद्वारे, उक्त अ.ब. हे अंशदायी भविष्य निर्वाह निधी (मुंबई) उक्त निधी नियमांच्या नियम ३२ च्या पोट-नियम (२) अन्वये त्या निधीत ज्या रकमा भरण्यास यापुढे पात्र होतील, त्या सर्व रकमांच्या प्रदानासाठी प्रतिभूती म्हणून आम्ही हे विमापत्र मुंबईचे राज्यपाल यांना संयुक्तपणे व पृथकपणे अभिहस्तांकित करीत आहोत.

आम्ही याद्वारे प्रमाणित करतो की, विमापत्राचे यापूर्वी कोणतेही अभिहस्तांकन करण्यात आलेले नाही.

दिनांक ..................... २० वर्गणीदार व सह-विमेदार यांच्या स्वाक्षऱ्या

ठिकाण ..................... स्वाक्षरीचा एक साक्षीदार .....................

टीप–अभिहस्तांकन, विमापत्रावरच एक तर वर्गणीदाराच्या हस्ताक्षरात किंवा टंकलिखित करून घेण्यात यावे, किंवा त्याऐवजी अभिहस्तांकन केलेली टंकलिखित किंवा मुद्रित चिठ्ठी विमापत्रावर त्यासाठी असलेल्या मोकळ्या जागी चिकटविण्यात यावी. टंकलिखित किंवा मुद्रित पृष्ठांकनावर योग्यरीतीने स्वाक्षरी करण्यात यावी व जर ते लेखी पृष्ठांकन विमापत्रांवर चिकटवले तर चारही बाजूच्या रिकाम्या जागी त्यावर आद्याक्षरी करावी.

(३)

अ. ब. ने अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये द्यावयाच्या वर्गणीऐवजी यासोबतच्या विमापत्रांची प्रदाने करण्यास मुंबईच्या राज्यपालांनी संमती दिल्याने अ. ब. ला विमापत्र राज्यपालांकडे अभिहस्तांकित करता यावे, यासाठी माझे हितसंबंध अ. ब. ला प्राप्त व्हावेत यासाठी ते सोडून देण्यास विमापत्रकर्त्याची संमती असल्यामुळे, अ. ब. ने विनंती केल्यामुळे अ. ब. च्या विनंतीवरून व निदेशावरून , मी अ. ब. ची पत्नी व यासोबतच्या विमापत्राची

ंहस्तांकिती, क. ड. आणि मी , उक्त अ. ब. हे उक्त निधीच्या नियमांच्या नियम २२ चा पोट-नियम (२) ध्ये त्या निधीमध्ये ज्या रकमा भरण्यासाठी उक्त अ. ब. यानंतर पात्र होईल. त्या सर्व रकमांच्या ानासाठी प्रतिभूती म्हणून यासोबतचे विमापत्र, राज्याचे सचिव यांच्याकडे, अनुक्रमे अभिहस्तांकित व कायम ीत आहे.

आम्ही याद्वारे असे प्रमाणित करतो की, या विमापत्रांच्या संबंधात यापूर्वी कोणतेही अभिहस्तांकन करण्यात ेले नाही.

दिनांक ............................ २०

ठिकाण ..........................

अभिहस्तांकिती व वर्गणीदारांच्या स्वाक्षऱ्या

स्वाक्षरीचा एक साक्षीदार

(४)

जेथे सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदाराने त्या निधीच्या नियमाअन्वये विमापत्र काढलेले असून अंशदायी भविष्य निर्वाह निधी (मुंबई) यामध्ये समाविष्ट केलेले आहे, अशा प्रकरणात वापरावयाचा ंहस्तांकनाचा नमुना :

मी, .......................................... येथील अ. ब. .......................................... याद्वारे नंतर अंशदायी भविष्य निर्वाह ी नियम (मुंबई) यांच्या नियम २२ चा पोट-नियम (२) खाली अंशदायी भविष्य निर्वाह निधी (मुंबई) यामध्ये ज्या मा भरण्यास यापुढे दायी होईन त्या सर्व रकमांचा भरणा करण्यासाठी नंतर मुंबईचे राज्यपाल यांना प्रस्तुत ापत्र प्रतिभूति म्हणून अभिहस्तांकित करीत आहे.

मी, याद्वारे असे प्रमाणित करतो की, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियमांच्या नियम २१ खाली ज्या सर्व मा देण्यासाठी मी दायी आहे त्या सर्व रकमांच्या प्रदानासाठी प्रतिभूति म्हणून मुंबईचे राज्यपाल यांना दिलेल्या हस्तांकनाशिवाय या विमापत्रात इतर कोणतेही आधीचे अभिहस्तांकन करण्यात आलेले नाही.

वर्गणीदाराची स्वाक्षरी

स्वाक्षरीचा एक साक्षीदार

## तिसरी अनुसूची

(नियम २० पहा)

### मुंबईचे राज्यपाल यांनी पुनर्अभिहस्तांकित व अभिहस्तांकित करावयाचे नमुने

(१)

अंशदायी भविष्य निर्वाह निधी नियम (मुंबई) यांच्या नियम २२ च्या पोट-नियम (२) खाली उपरिनामित
अ. ब.
_______________
अ. ब. आणि क. ड.

यांनी देय असलेल्या सर्व रकमा भरण्यात आल्यामुळे व/किंवा अशा सारख्या कोणत्याही रकमा पुढे भरणा करण्याचे त्याचे सर्व दायित्व संपुष्टात आल्यामुळे मुंबईचे राज्यपाल याद्वारे उपरोक्त विमापत्र अ. ब.
_______________
अ. ब. आणि क. ड.

यांच्या नावे पुनर्अभिहस्तांकित करीत आहेत.

दिनांक ............ २०

............ निधी लेखा अधिकारी, यांनी मुंबईचे राज्यपाल यांच्यासाठी व त्यांच्या वतीने निष्पादित केले.

क्ष. य.
(लेखा अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

य. ज्ञ. ............ यांच्या उपस्थितीत.

(एक साक्षीदार त्याने आपले पदनाम व पत्ताही लिहावा.)

(२)

उपरिनामित अ. ब. ............ यांचे दि. ............ २० ...... च्या ............ रोजी निधन झाल्यामुळे, मुंबईचे राज्यपाल याद्वारे विमापत्रानुसार क. ड.* यांना याद्वारे, उपरोक्त विमापत्र अभिहस्तांकित करीत आहेत.

दिनांक ............ २०

............ निधी लेखा अधिकारी,
यांनी मुंबईचे राज्यपाल यांच्यासाठी
व त्यांच्या वतीने निष्पादित केले–

क्ष. य.
(लेखा अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

य. ज्ञ. ............ यांच्या उपस्थितीत.

(एक साक्षीदार, त्याने आपले पदनाम व पत्ताही लिहावा.)

*विमापत्र मिळण्याचा वैध रीतीने हक्क असलेल्या व्यक्तींचा तपशिल येथे नमूद करावा.

---

[१](चौथी अनुसूची)

(नियम २१ पहा)

---

[१]हा मजकूर दिनांक ८-१-१९८० च्या शासकीय अधिसूचनेद्वारे वगळण्यात आला.

## पाचवी अनुसूची

(नियम १२ पहा)

### तात्पुरती अग्रिमे मंजूर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी

१. ज्या अग्रिमाच्या मंजुरीसाठी नियम १२ च्या खंड (ब) किंवा (क) खाली विशेष कारणांची आवश्यकता सते, असे अग्रिम कार्यालयाच्या प्रभारी स्थानिक राजपत्रित अधिकाऱ्याला व अशा राजपत्रित अधिकाऱ्याच्या बितीत त्याच्या नंतरच्या वरिष्ठ प्रशासकीय प्राधिकाऱ्याला मंजूर करता येईल.

**स्पष्टीकरण.**–"कार्यालयाचा स्थानिक राजपत्रित प्रभारी अधिकारी" याचा अर्थ कार्यालयाचा प्रशासकीय भारी असेल असा निकटवर्ती राजपत्रित अधिकारी, असा आहे.

२. ज्या अग्रिमाच्या मंजुरीसाठी नियम १२ च्या खंड (ख) किंवा खंड (ग) खाली विशेष कारणांची ावश्यकता असते असे अग्रिम, स्तंभ १ मध्ये नमूद केलेल्या वर्गणीदारांच्या बाबतीत स्तंभ २ मध्ये त्यांच्या नावापुढे मूद केलेल्या प्राधिकाऱ्यांना मंजूर करता येईल :-

| | | |
|---|---|---|
| (१) | विभाग प्रमुख | संबंधित प्रशासकीय विभाग |
| (२) | गुन्हा अन्वेषण विभागाच्या गुप्तवार्ता शाखेच्या आस्थापनेतील कर्मचारी | पोलीस उप-महानिरीक्षक, गुन्हा अन्वेषण विभाग |
| (३) | पोलीस प्रशिक्षण विद्यालय, नाशिक येथील भाषा प्रशिक्षक | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय. |
| (४) | वरील (१) ते (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वर्गणीदारांव्यतिरिक्त इतर वर्गणीदार | मुंबई नागरी सेवा नियमांच्या परिशिष्ट दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेले शाखा प्रमुख. |

परंतु, कोणत्याही विशिष्ट प्रकरणी स्तंभ २ मध्ये नमूद केलेला प्राधिकारी हा जे अग्रिम मिळण्यासाठी मागील ्यमाखाली असे अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असणारा प्राधिकारी असेल तर, भविष्य निर्वाह निधीतील हे ग्रिम फक्त त्याच्या निकटचा उच्च प्रशासकीय प्राधिकारीच मंजूर करू शकेल.

स्पष्टीकरण.–शासन विभागाचा "निकटचा प्रशासकीय अधिकारी" शासन आहे :

परंतु, आणखी असे की, नियम १२ च्या खंड (क) च्या उप-खंड

(एक) खालील आजारपणासाठी असलेल्या ज्या अग्रिमाच्या मंजुरीसाठी त्या नियमाच्या खंड (ख) किंवा (ग) ाली विशेष कारणांची आवश्यकता असेल अशा बाबतीत, परिच्छेद-१ मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्याला,ज्याच्या जुरीसाठी विशेष कारणांची आवश्यकता आहे असे अग्रिम मंजूर करण्यास अन्यथा जो सक्षम आहे त्या धिकाऱ्याला सूचना देऊन अशी रक्कम मंजूर करता येईल.

[१][३. एका विभागातून दुसऱ्या विभागाकडे प्रतिनियुक्तीवर गेलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, त्याची सेवा सनी घेणारा विभाग, नियम १२ च्या खंड (ख) किंवा खंड (ग) खाली विशेष कारणे आवश्यक असलेले अग्रिम जूर करण्यास सक्षम असेल.]

---

[१]हा मजकूर शासकीय अधिसूचना, दिनांक २७-६-१९८४ अन्वये दाखल करण्यात आला.

## [1]सहावी अनुसूची

[नियम १४ ख (ग) पहा]

### वार्षिक प्रतिज्ञापनाचा नमुना

मी, याद्वारे असे घोषित करतो की, मी, भविष्य निर्वाह निधीतील माझ्या नावे असलेली रक्कम काढून बांधलेले/खरेदी केलेले घर/सदनिका (फ्लॅट) किंवा घरासाठी खरेदी केलेली जमीन विकून, गहाण ठेवून, अदलाबदल करून किंवा देणगी म्हणून देऊन किंवा तीन वर्षांहून अधिक असणाऱ्या मुदतीसाठी भाडेपट्ट्याने देऊन किंवा अन्यथा इतर प्रकारे, मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याच्या लेखी पूर्व मंजुरीशिवाय हस्तांतरित केलेली नाही व मी असे वचन देतो की, जर तसे करण्यास मला फर्माविण्यात आले तर मी ते घर/सदनिका (फ्लॅट) घराची जागा माझ्या एकट्याच्या संपूर्ण मालकीची आहे हे दर्शविणाऱ्या व उक्त प्राधिकारी विनिर्दिष्ट करील अशा कराच्या पावत्या, हक्कविलेख व असे अन्य दस्तऐवज, मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे सादर करीन.

दिनांक ........................................२०

साक्षीदार (पत्त्यासह)

१ ..............................

..............................

२ ..............................

..............................

स्वाक्षरी ..............................

पदनाम ..............................

[1]हा मजकूर शासकीय अधिसूचना, दि. २३-३-१९७६ अन्वये जादा दाखल करण्यात आला.

**परिशिष्ट-अ**

महाराष्ट्र शासन

**विधी व न्याय विभाग**

# भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५

## (१९२५ चा अधिनियम क्रमांक एकोणीस)

(३१ जुलै, १९८४ पर्यंत सुधारलेला)

# भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५

## (१९२५ चा अधिनियम क्रमांक एकोणीस)

## अनुक्रमणिका

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. सक्तीच्या ठेवींचे संरक्षण.

४. परतफेडीसंबंधीच्या तरतुदी.

५. नामनिर्देशित व्यक्तीचे अधिकार.

६. रकमा वजा करण्याचा अधिकार.

७. सद्‌भावनेने केलेल्या कृत्यासाठी संरक्षण.

८. हा अधिनियम भविष्य निर्वाह निधीला लागू करण्याचा अधिकार.

९. सैनिकांच्या इस्टेटीच्या संबंधात व्यावृत्ती.

१०. निरसन.

अनुसूची.

# भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५

## (१९२५ चा अधिनियम क्रमांक एकोणीस)

[ २७ ऑगस्ट १९२५ ]

**शासकीय भविष्य निर्वाह निधी व इतर भविष्य निर्वाह निधीसंबंधीच्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी व तो एकत्रित करण्यासाठी अधिनियम.**

(१) १९२५ चा अधिनियम क्रमांक २८ याद्वारे सुधारित.

(२) १९३० चा अधिनियम क्रमांक १ याद्वारे सुधारित.

(३) भारत सरकारचा (भारतीय कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९३७.

(४) १९४६ चा अधिनियम क्रमांक ११ याद्वारे सुधारित.

(५) स्वातंत्र्य (सर्वसाधारण अधिनियम व अध्यादेश यांचे अनुकूलन) आदेश, १९४८.

(६) कायद्यांच्या आदेशाचे अनुकूलन, १९५०.

(७) १९५२ चा अधिनियम क्रमांक ३ याद्वारे सुधारित.

**ज्याअर्थी,** शासकीय व इतर भविष्य निर्वाह निधीसंबंधीच्या कायद्यात सुधारणा करणे व तो एकत्रित करणे ष्ट आहे ; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :–

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**–(१) या अधिनियमास, भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ असे म्हणावे.

(२) तो [१][जम्मू व काश्मीरखेरीज ] [२][ * * ] संपूर्ण भारतास लागू असेल.

(३) हा अधिनियम केंद्र सरकार शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा *दिनांकास मलात येईल.

२. व्याख्या.–या अधिनियमांत विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसेल तर–(क) "सक्तीची ठेव" शब्दप्रयोगाचा अर्थ, आयुर्विम्याचा हप्ता देण्याच्या [३][ किंवा कौटुंबिक निवृत्तिवेतनाची वर्गणी किंवा हप्ता ण्याच्या] प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी अथवा विशिष्ट आकस्मिक घटना घडून आल्या वाय मागणी केली असता जो निधीच्या नियमान्वये देता येत नाही अशी भविष्य निर्वाह निधीसाठी दिलेली णी किंवा निधित जमा असलेली ठेवीची रक्कम, असा आहे आणि यात, अशा वर्गणीत, ठेवीत किंवा शदानात निधीच्या नियमान्वये उपार्जित केलेले कोणतेही अंशदान [४][ * * ] आणि कोणतेही व्याज किंवा वाढ, चे अशी कोणतीही आकस्मिक; घटना घडून आल्यानंतर वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती जमा सलेली कोणतीही वर्गणी, ठेवीची रक्कम, अंशदान, व्याज किंवा वाढ यांचासुद्धा समावेश होईल ;

---

[१] "भाग ब राज्ये वगळता" या मजकुराऐवजी हा मजकूर भाग ब राज्य (विधी) अधिनियम, १९५१ (१९५१ चा अधिनियम ३) कलम ३, अनुसूचीद्वारे दाखल करण्यात आला.

[२] "ब्रिटिश बलुचिस्तानसह" हा मजकूर अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे वगळण्यात आला.

* १ एप्रिल १९२६ भारताचे राजपत्र, १९२५ भाग एक पृष्ठ ११८२.

[३] १९३० चा अधिनियम क्रमांक १ कलम २ द्वारे समाविष्ट केले.

[४] वरील अधिनियमांच्या कलम २ द्वारे "अशा कोणत्याही वर्गणीच्या किंवा ठेवीच्या संबंधात जमा केलेली" हा मजकूर वगळण्यात आला.

(ख) "अंशदान" याचा अर्थ, निधी प्रशासित करणाऱ्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने भविष्य निर्वाह निधीतील वैयक्तिक लेख्यात भर घालून किंवा वर्गणी अथवा ठेव म्हणून जमा केलेली कोणतीही रक्कम किंवा वैयक्तिक लेख्यात असलेली शिल्लक, असा आहे व "अंशदायी भविष्य निर्वाह निधी" म्हणजे ज्या भविष्य निर्वाह निधीच्या नियमात अंशदाने जमा करण्याची तरतूद केलेली असेल तो भविष्य निर्वाह निधी असा आहे ;

(ग) "अवलंबून असलेली व्यक्ती" याचा अर्थ, भविष्य निर्वाह निधीचा मृत वर्गणीदार किंवा त्यात ठेव ठेवणाऱ्याचे पुढीलपैकी कोणतेही नातेवाईक म्हणजे पत्नी, पती, आई, वडील, मूल, अज्ञान भाऊ अविवाहित बहीण व मृत मुलाची विधवा व मूल व जेथे वर्गणीदाराची किंवा ठेव ठेवणाऱ्याची आई, वडील, हयात नसतील तेथे पैतृक आजा-आजी असा आहे ;

(घ) "शासकीय भविष्य निर्वाह निधी" याचा अर्थ शासकीय सेवेतील व्यक्तींना कोणताही वर्ग किंवा कोणतेही वर्ग यांच्यासाठी किंवा शैक्षणिक संस्थेत कामावर असलेल्या व्यक्ती किंवा फक्त शैक्षणिक प्रयोजनासाठी अस्तित्वात असलेल्या संस्थेत कामावर असलेल्या व्यक्तींसाठी राज्याचे सचिव, केंद्र सरकार, राज्याचे प्रतिनिधी किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या प्राधिकाऱ्यांनी रेल्वे भविष्य निर्वाह निधी वगळता स्थापन केलेला निधी, असा आहे व या अधिनियमातील शासनाच्या निर्देशांचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात येईल ;

(ङ) "भविष्य निर्वाह निधी" याचा अर्थ, ज्यात कर्मचारीवर्गाच्या किंवा वर्गाच्या वर्गण्या किंवा ठेवींच्या रकमा स्वीकारल्या जातात व त्यांच्या वैयक्तिक लेख्यात ठेवण्यात येतात तो निधी असा आहे, व यात, कोणतेही अंशदान व अशी वर्गणी, ठेव किंवा अंशदानावर निधीच्या नियमान्वये उपार्जित होणारे कोणतेही व्याज किंवा वाढ अंतर्भूत आहे ;

(च) "रेल्वे प्रशासन" याचा अर्थ,–

(एक) युनायटेड किंग्डमच्या संसदेच्या विशेष अधिनियमान्वये किंवा भारतीय विधिअन्वये किंवा शासनाच्या संविदेअन्वये भारताच्या कोणत्याही रेल्वे किंवा ट्राममार्ग प्रशासित करणारी कोणतीही कंपनी असा आहे; किंवा

(दोन) केंद्र सरकार किंवा राज्य शासनाद्वारे प्रशासित केली जाणारी कोणतीही रेल्वे किंवा ट्रामनार्ग यांचा व्यवस्थापक व त्यात, उपखंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रकरणात केंद्र सरकार किंवा, यथास्थिती, राज्यशासन यांचा अंतर्भाव होईल ;

(छ) "रेल्वे भविष्य निर्वाह निधी" याचा अर्थ, रेल्वे कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही वर्गासाठी किंवा वर्गांसाठी रेल्वे प्रशासनाच्या प्राधिकाऱ्याने स्थापन केलेला भविष्य निर्वाह निधी असा आहे.

३. सक्तीच्या ठेवींचे संरक्षण :-(१) कोणत्याही शासनाच्या भविष्य निर्वाह निधीत किंवा रेल्वे भविष्य निर्वाह निधीत ठेवलेली सक्तीची ठेव कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित करता येणार नाही किंवा ती प्रभारित करता येणार नाही आणि वर्गणीदाराला किंवा ठेवीदाराला कोणत्याही कर्जाच्या किंवा दायित्वाच्या संबंधात कोणत्याही दिवाणी, महसुली किंवा फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये जप्त केली जाण्यास ती पात्र ठरणार नाही व प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० (१९२० चा पाच) खाली नियुक्त केलेल्या कोणत्याही शासकीय अभिहस्तांकितीस किंवा न्यायालय धारकास अशा कोणत्याही सक्तीच्या ठेवीबाबत मागणी करण्याचा किंवा त्या रकमेसाठी दावा करण्याचा हक्क असणार नाही.

(२) कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या मृत्यूच्यावेळी अशा कोणत्याही निधीत असलेली व निधीच्या नियमान्वये वर्गणीदारावर किंवा ठेवीदारावर अवलंबून असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या किंवा त्याच्या वतीने रक्कम मिळण्यास विधीद्वारे प्राधिकृत केलेल्या अशा व्यक्तीस देय असलेली कोणतीही रक्कम, या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही वजावटीस अधीन राहून व जेथे अवलंबून असलेली व्यक्ती वर्गणीदाराची किंवा ठेवीदाराची विधवा किंवा मूल असेल ते खेरीज करुन, तसेच या अधिनिमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या अभिहस्तांकनाखाली अभिहस्तांकितीच्या हक्कास अधीन राहून अवलंबून असलेल्या व्यक्तीकडे निहित होईल, तसेच उपरिनिर्दिष्ट गोष्टीस अधीन राहून, अशी रक्कम मयत वर्गणीदाराचे किंवा ठेवीदाराचे कोणतेही कर्ज किंवा त्याने पत्करलेले कोणतेही दायित्व किंवा त्यांच्या मृत्यूपूर्वी त्यांच्या आश्रित व्यक्तीने पत्करलेले दायित्व यापासून ही मुक्त राहील.

४. **परतफेडीसंबंधीची तरतूद :-**(१) जेव्हा कोणत्याही शासनाच्या भविष्य निर्वाह निधीच्या किंवा रेल्वे भविष्य निर्वाह निधीच्या नियमाखाली कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेव ठेवणाऱ्यांच्या नावे असलेली रक्कम किंवा या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही रक्कम वजा केल्यानंतर राहिलेली शिल्लक देय होईल तेव्हा, वर्गणीदारास किंवा ठेव ठेवणाऱ्यास ती रक्कम किंवा यथास्थिती, तीची शिल्लक देणे हे ज्या अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल, तो अधिकारी वर्गणीदारास किंवा ठेवीदारास, यथास्थिती, अशी रक्कम किंवा शिल्लक देईल किंवा जर तो मृत झाला असेल तर असा अधिकारी—

(क) जर ती रक्कम किंवा तिची शिल्लक किंवा तिचा कोणताही भाग, कलम ३ च्या तरतुदीखाली अवलंबून असलेल्या व्यक्तीकडे निहित केला असेल तर ती रक्कम, अवलंबून असलेल्या व्यक्तीला किंवा अशा व्यक्तीच्या वतीने रक्कम मिळण्यास विधीद्वारे प्राधिकृत केलेल्या इतर व्यक्तीस देईल ; किंवा

(ख) जर संपूर्ण रक्कम किंवा यथास्थिती, शिल्लक रक्कम पाच हजारांहून अधिक नसेल तर अशी रक्कम किंवा खंड (क) खाली जो देय नसेल असा तिचा कोणताही भाग निधीच्या नियमान्वये ती रक्कम मिळण्यास नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीस देईल किंवा जर अशा रीतीने कोणत्याही व्यक्तीला त्याने नामनिर्देशित केले नसेल तर अशी रक्कम मिळण्यास अन्यथा जो हक्कदार असल्याचे त्यास वाटेल त्या कोणत्याही व्यक्तीला देईल ; किंवा

(ग) कोणतीही रक्कम किंवा शिल्लक रक्कम किंवा खंड (क) किंवा खंड (ख) खाली जो कोणत्याही व्यक्तीला देय नसेल असा तिचा कोणताही भाग,–

(एक) निधीच्या नियमान्वये, ती घेण्याकरिता नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीने मृताच्या इस्टेटीचे प्रशासन करण्याकरिता तिला देण्यात आल्याचा पुरावा म्हणून संप्रमाण किंवा प्रशासनपत्र अथवा उत्तराधिकार प्रमाणपत्र अधिनियम, १८८९* (१८८९ चा सात) अन्वये अथवा १८२७ चा† मुंबई विनियम क्र. ८ अन्वये दिलेले अथवा त्या इस्टेटीच्या धारकास अशा कोणत्याही रकमेचे, शिल्लक रकमेचे अथवा तिच्या काही भागाचे प्रदान स्वीकारण्यास हक्कदार ठरवणारे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्या व्यक्तीला ; किंवा

(दोन) कोणतीही व्यक्ती नामनिर्देशित करण्यात आलेली नसेल तर जी कोणतीही व्यक्ती संप्रमाण किंवा प्रशासनपत्र किंवा प्रमाणपत्र सादर करील, अशा कोणत्याही व्यक्तीला देईल :

---

*भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ पहा.

(१९२५ चा अधिनियम क्र. ३९) इस्टेट विनियमाचे प्रशासन.

† इस्टेट विनियमनाची अंमलबजावणी.

परंतु, जेथे वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या नावे असलेली संपूर्ण रक्कम किंवा तिचा काही भाग कोणत्याही अन्य व्यक्तीस या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अभिहस्तांकित करण्यात आला असेल व अभिहस्तांकनाची लेखी नोटीस अधिकाऱ्याला अभिहस्तांकितीकडून मिळाली तर असा अधिकारी या अधिनियमान्वये अधिकृत केलेली कोणतीही रक्कम वजा केल्यानंतर व वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या विधवेस किंवा मुलांना किंवा त्याच्यावतीने खंड (क) खाली देय असलेली रक्कम,–

(एक) जर वर्गणीदाराने किंवा ठेवीदाराने किंवा तो मरण पावला तर कोणत्याही विधिग्राह्य अभिहस्तांकिनाच्या अभावी, या पोटकलमाखाली रक्कम किंवा शिल्लक रक्कम जिला देय होईल त्या व्यक्तीने लेखी संमती दिली तर, यथास्थिती, अशी संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग किंवा त्यापैकी शिल्लक रक्कम अभिहस्तांकितीस देईल ; किंवा

(दोन) जर अशी संमती देण्यात आली नाही तर ती रक्कम, तिचा भाग किंवा यथास्थिती, शिल्लक रक्कम, ती मिळण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीसंबंधी सक्षम दिवाणी न्यायालयाचा निर्णय होईपर्यन्त रोखून ठेवील.

(२) पोटकलम (१) द्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही रक्कम प्रदान केल्यानंतर, वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या नावे असलेल्या रकमेतून जितकी रक्कम दिली गेली त्या मर्यादेपर्यन्त, यथास्थिती, शासन किंवा रेल्वे प्रशासन सर्व दायित्वातून मुक्त होईल.

५. **नामनिर्देशित व्यक्तीचे अधिकार-**[1][(१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा शासकीय किंवा रेल्वे भविष्य निर्वाह निधीत वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या नावे जमा असलेली रक्कम किंवा तिचा कोणताही भाग, याच्या केलेल्या कोणत्याही विनियोग व्यवस्थेत मग ती मृत्युपत्रानुसार केलेली असो किंवा इतर प्रकारे केलेली असो काहीही अंतर्भूत असले तरीही, जेथे भविष्य निर्वाह निधीच्या नियमांनुसार कोणतेही नामनिर्देशन केलेले असेल व तदनुसार, अशी संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग देय होण्यापूर्वी किंवा देय झाल्यानंतर ती देण्यात येण्यापूर्वी वर्गणीदार किंवा ठेवीदार मरण पावेल, अशावेळी ती रक्कम किंवा तिचा कोणताही भाग कोणत्याही व्यक्तीला मिळण्याचा हक्क प्रदान केला जाणे, अभिप्रेत असेल तर, वर्गणीदाराचा किंवा ठेवीदाराचा पूर्वोक्तप्रमाणे मृत्यू झाल्यास, इतर सर्व व्यक्तींना वगळून उक्त व्यक्ती, अशी रक्कम, किंवा यथास्थिती, तिचा भाग मिळण्यास हक्कदार राहील मात्र :–

(क) अशा नामनिर्देशनात त्याच पद्धतीने केलेल्या दुसऱ्या नामनिर्देशनाद्वारे कोणत्याही वेळी फेरबदल करण्यात आलेला असता कामा नये किंवा या नियमान्वये विहित केलेल्या पद्धतीने व त्या प्राधिकाऱ्यास नोटीस देऊन, ते रद्द करण्यात आलेले असता कामा नये ; किंवा

(ख) असे नामनिर्देशन ज्यात विनिर्दिष्ट केलेली एखादी आकस्मिक घटना घडल्यामुळे कोणत्याही वेळी विधीअग्राह्य झाले असता काम नये :

आणि जर, उक्त व्यक्तीचे वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या मृत्युपूर्वी निधन झाले तर असे नामनिर्देशन, उक्त व्यक्तीस प्रदान केलेल्या हक्काच्या मर्यादेपर्यन्त अवैध ठरेल व ते परिणामक्षम असणार नाही :

परंतु, निधीच्या नियमानुसार नामनिर्देशनात मृत व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीस असे हक्क प्रदान करण्यासंबंधी तरतूद केली असेल तर असा हक्क, अशी व्यक्ती मरण पावल्यानंतर अशा दुसऱ्या व्यक्तीकडे जाईल.]

[1] १९४६ चा अधिनियम, ११, कलम २ द्वारे मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

(२) [1][भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ (१९२५ चा क्र. ३९)] किंवा [2]१८२७ चा मुंबई विनियम आठ
त काहीही अंतर्भूत असले तरीही, अशा कोणत्याही व्यक्तीस, वर्गणीदार किंवा ठेवीदार मरण पावल्यानंतर
ती रक्कम किंवा तिचा भाग मिळण्यास तिला हक्कदार करणारे त्या अधिनियमाखलील किंवा, यथास्थिति,
नियमाखालील प्रमाणपत्र मिळण्याचा हक्क प्राप्त होईल व असे प्रमाणपत्र, अन्य कोणत्याही व्यक्तीला संप्रमाण
वा मृताच्या इस्टेटीस प्रशासनपत्र दिल्यामुळे विधिअग्राह्य होणार नाही किंवा ते निष्प्रभावित झाल्याचे समजण्यात
णार नाही ;

(३) भविष्य निर्वाह निधी (सुधारणा) अधिनियम, १९४६ च्या कलम २ च्या पोटकलम (१) अन्वये सुधारणा
ल्याप्रमाणे या कलमाच्या तरतुदी त्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या † दिनांकापूर्वी केलेल्या सर्व नामनिर्देशनास
खील लागू होतील :

परंतु, अशा रीतीने सुधारणा करण्यात आलेल्या या कलमाच्या तरतुदींमुळे, ज्या प्रकरणात उक्त दिनांकापूर्वी
णतीही रक्कम देण्यात आली असेल किंवा त्या नियमानुसार योग्यरित्या केलेल्या कोणत्याही नामनिर्देशनानुसार
धीच्या नियमान्वये देय झाली असेल त्या कोणत्याही प्रकरणात बाध येणार नाही.

६. रकमा वजा करण्याचे अधिकार.-कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या नावे कोणत्याही शासकीय
विष्य निर्वाह निधीत किंवा अंशदायी रेल्वे भविष्य निर्वाह निधीत जमा असलेली रक्कम जेव्हा देय होईल तेव्हा
निधीच्या नियमात याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या ] प्राधिकाऱ्याने जर तसे निर्देशित केले असेल तर जमा
मेतून खालीलप्रमाणे वजावटी करून त्या रकमा [4][ शासनाला किंवा यथास्थिति, रेल्वे प्रशासनाला देता
तील].-

(क) वर्गणीदाराला किंवा ठेवीदाराला [4][ शासनाच्या किंवा रेल्वे प्रशासनाच्या ] दायित्वाखाली देय असलेली
पण वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या लेख्यात जमा केलेल्या कोणत्याही अंशदानाच्या एकूण रकमेहून अधिक
ही अशी रक्कम व अशा अंशदानावर उपार्जित झालेले कोणतेही व्याज किंवा दिलेली वाढ ; किंवा

(ख) जेथे वर्गणीदाराला किंवा ठेवीदाराला निधीच्या नियमांत याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही
रणांसाठी बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा त्याने [5][त्याच्या सेवा] प्रारंभापासून पाच वर्षांच्या आत अशा
करीचा राजीनामा दिला असेल तर अशा कोणत्याही अंशदानाची, व्याजाची व वाढीची संपूर्ण रक्कम किंवा
चा कोणताही भाग.

७. सद्भावनेने केलेल्या कृत्यांसाठी संरक्षण.-या अधिनियमाखाली सद्भावनेने केलेल्या किंवा केल्याचे
भिप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही
ली जाणार नाही.

---

[1] १९५० चा अधिनियम ३५, कलम ३ व अनुसूचीद्वारे, "उत्तराधिकार प्रमाणपत्र अधिनियम, १८८९ या मजकुराऐवजी हा मजकूर
खल करण्यात आला.

[2] इस्टेट विनियमाचे प्रशासन.

† १८ एप्रिल, १९४६.

[3] १९२५ चा अधिनियम २८, कलम ३ द्वारे, "ज्याच्याकडून त्या निधीची स्थापना करण्यात आली असेल असा" या मजकुराऐवजी
मजकूर दाखल करण्यात आला.

[4] "त्या प्राधिकाऱ्याला" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] "त्या प्राधिकाऱ्यांच्या नोकरीतून" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. **भविष्य निर्वाह निधीला हा अधिनियम लागू करण्याचा अधिकार.**—[1][(१)] [2][ समुचित शासनास ]स्थानिक शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी स्थानिक प्राधिकारी कर्जे अधिनियम, १९१४ च्या अर्थानुसार कोणत्याही स्थानिक प्राधिकाऱ्याने त्याच्या कर्मचाऱ्यांच्या लाभांसाठी प्रस्थापित केलेल्या कोणत्याही भविष्य निर्वाह निधीला लागू होतील असा निदेश देता येईल, असे घोषित केल्यानंतर हा अधिनियम, असा भविष्यनिर्वाह निधी, हा जणू काही शासकीय भविष्य निर्वाह निधी व असा स्थानिक प्राधिकारी शासन आहे असे समजून त्यास लागू होईल.

[1][(२) [3][ समुचित शासनास ]शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या भविष्य निर्वाह निधीस लागू होतील असा निदेश देता येईल व असे घोषित केल्यानंतर हा अधिनियम, असा भविष्य निर्वाह निधी, हा जणू काही शासकीय भविष्य निर्वाह निधी आहे व निधीची अभिरक्षा करणारा प्राधिकारी, शासन आहे असे समजून लागू होईल :

परंतु कलम ६ हे त्या कलमात निर्दिष्ट केलेल्या अंशदान देणारा प्राधिकारी जणू काही शासन असल्याप्रमाणे लागू होईल.

(३) [4][ समुचित शासनास ], शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्याला योग्य वाटेल त्या सार्वजनिक संस्थेचे नाव अनुसूचित दाखल करता येईल व अशी भर जणू काही ह्या अधिनियमाद्वारेच घातली होती असे समजून ती परिणामक्षम होईल. ]

[5][(४) या कलमात " समुचित शासन " याचा अर्थ,—

(क) छावणी प्राधिकाऱ्याच्या बाबतीत किंवा प्रमुख बंदराच्या, बंदर अधिकाऱ्याच्या बाबतीत आणि ज्या संस्थेचे उद्देश, केंद्र शासनाच्या मते, [6][ संविधानाच्या ]सातव्या अनुसूचीतील सूची १ च्या कक्षेतील असतील, त्या संस्थेच्या बाबतीत, केंद्र सरकार असा आहे, आणि

(ख) अन्य बाबींमध्ये राज्य शासन असा आहे.

**स्पष्टीकरण.**—संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेच्या संबंधात, राज्य शासन याचा अर्थ, ज्या राज्यात संस्थेची नोंदणी झाली असेल त्या राज्यातील शासन असा आहे

९. **सैनिकांच्या इस्टेटीच्या संबंधात व्यावृत्ती.**—कलम ४ किंवा कलम ५ मधील कोणताही मजकूर ज्या कोणत्याही संपत्तीच्या प्रशासकीय प्रयोजनासाठी *रेजिमेंटल ऋणे अधिनियम, १८९३ लागू होत असेल त्या संपत्तीतील पैशास लागू असणार नाही.

१०. **निरसन.**—निरसन अधिनियम, [ १९२७ चा १२ ] कलम २ व अनुसूची याद्वारे निरसित.

---

[1] १९३० चा अधिनियम ५, कलम ३ द्वारे मूळ कलम ८ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[2] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे, " स्थानिक शासन " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] वरील आदेशाद्वारे " गव्हर्नर जनरल इन कौन्सिल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे " गव्हर्नर जनरल इन कौन्सिल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे समाविष्ट केले.

[6] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, " भारत शासन अधिनियम १९३५ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* रेजिमेंटल ऋणे अधिनियम १८९३ [ व्हिक्टो ५६ आणि ५७ कलम ५ ] मृत्यू, वेड यासारख्या प्रकरणामध्ये इंग्लिश मिलीटरी लॉने नियंत्रित केल्याप्रमाणे व्यक्तीची रेजिमेंटल ऋणे देणे, गोळा करणे आणि ती निकालात काढणे या गोष्टीचे विनियमन करणे. अधिनियम भारताला लागू आहेत. परंतु भारतीय मिलीटरी लॉच्या अर्थानुसार भारताच्या कोणत्याही नागरिकाला लागू होत नाही. [ त्या अधिनियमाचे कलम २५ ] आता उक्त अधिनियम ब्रिटीश स्टेट्सने निरसित केले आहेत. (भारताचे आवेदनपत्र) निरसन अधिनियम, १९६० [ १९६० चा ५७. ]

# @ अनुसूची

## संस्थांची सूची

[ कलम ८ चे पोट-कलम (२) पहा ]

१. पाश्चर इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, कसौली.

२. कलकत्ता सुधार न्यायाधिकरण.

३. पाल्याधिकरण (कोर्ट ऑफ वार्ड्स).

४. भारतीय मध्यवर्ती कापूस समिती.

५. मनोविकाराच्या रोग्यांकरिता असलेले युरोपियन रुग्णालय, रांची याचे विश्वस्त.

६. भारतातील स्त्रियांना स्त्रियांचे वैद्यकीय सहाय्य देण्यासाठी असलेली राष्ट्रीय संघटना.

७. संविधिद्वारे प्रस्थापित झालेल्या विद्यापीठाशी संलग्न असलेले महाविद्यालय.

८. भारतीय कोळसा प्रतवारी मंडळ.

९. लेडी मिंटो भारतीय नर्सिंग असोसिएशन.

१०. भारतीय रेड क्रॉस सोसायटी.

११. भारतीय लाख उपकर समिती.

१२. भारतीय रेड क्रॉस सोसायटीची मद्रास राज्य शाखा.

१३. भारताची इंपिरिअल बँक.

१४. बिहार आणि ओरिसा वैद्यकीय परीक्षा मंडळ.

[१] * * * * * *

१६. चहा जिल्हा उत्प्रवासी कामगार अधिनियम, १९३२ अनुसार उत्प्रवासी कामगारांच्या नियंत्रणाकरिता स्थापन केलेली संस्था.

१७. फिल्म सेन्सार बोर्ड, मुंबई.

१८. कलकत्ता विद्यापीठ.

१९. मध्यवर्ती पाटबंधारे मंडळ.

२०. भारतीय रिझर्व्ह बँक

[२] * * * * * *

२२. बनारस हिंदु विद्यापीठ.

२३. भारताची वैद्यकीय परिषद.

२४. भारताची कॉफी उपकर समिती.

२५. ॲंग्लो इंडियन व युरोपियन शिक्षणासाठी आंतरराज्य मंडळ.

२६. भारतीय संशोधन निधी संघटना.

२७. दिल्ली जल व मलप्रवाह संयुक्त मंडळ.

---

@ सन १९३० चा अधिनियम क्रमांक १, कलम ४ द्वारे अनुसूचित बाब क्रमांक १ ते ७ जादा दाखल करण्यात आल्या.

[१] अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे " १५ पंजाब युनिव्हर्सिटी " ही नोंद वगळण्यात आली.

[२] वरील आदेशाद्वारे " २१ व्हिक्टोरिया मेमोरिअल पार्क याचे विश्वस्त " ही नोंद वगळण्यात आली.

२८. भारतीय क्षयरोग संस्था.

२९. कोल माईन्स स्टोईंग बोर्ड.

३०. भारतीय रेल्वे स्लीपर पूल गट समिती.

३१. भारतीय कॉफी पणन विस्तार मंडळ.

३२. कोळसा खाणी बचाव केंद्र समिती.

३३. भारतीय कॉफी मंडळ.

* * * * * *

३५. भारतीय रबर मंडळ.

३६. भारतीय मध्यवर्ती ऊस समिती.

३७. अखिल भारतीय पशुप्रदर्शन समिती.

३८. कोळसा खाणी कामगार कल्याण निधी.

३९. भारतीय नारळ समिती.

४०. भारतीय मध्यवर्ती तंबाखू समिती.

४१. राज्य कामगार विमा महामंडळ.

४२.* भारतीय चहा अनुज्ञप्ति समिती.

४३. कोळसा खाणी (जतन करणे व सुरक्षा) अधिनियम, १९५२ अन्वये प्रस्थापित झालेले कोळसा मंडळ.

४४. दिल्ली मार्ग परिवहन प्राधिकरण, नवी दिल्ली.

४५. मध्यवर्ती चहा मंडळ.

४६. भारतीय मध्यवर्ती तेलबिया समिती.

४७. केंद्रीय देशी वैद्यकीय पद्धती संशोधन संस्था, जामनगर.

४८. भारतीय मानक संस्था, दिल्ली.

४९. सुती वस्त्रनिर्माण निधी समिती.

५०. देशबंधु महाविद्यालय, कल्काजी.

५१. दामोदर खोरे महामंडळ.

५२. केंद्रीय रेशीम मंडळ.

५३. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.

५४. खादी व ग्रामोद्योग आयोग.

५५. लॉरेन्स स्कूल (सनवार) सोसायटी.

५६. कलावती शरण बाल रुग्णालय, नवी दिल्ली.

५७. श्री. गुरु तेग बहादूर खालसा महाविद्यालय, दिल्ली.

५८. चहा मंडळ.

५९. लेडी श्रीराम महिला महाविद्यालय, नवी दिल्ली.

६०. भारतीय लोक प्रशासन संस्था, नवी दिल्ली.

---

* वरील आदेशाद्वारे " ३४ भारतीय रेड क्रॉस सोसायटीची, एन. डब्ल्यू. एफ. प्रांतिक शाखा " ही नोंद वगळण्यात आली.

६१. केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ.

६२. तेल व नैसर्गिक वायू आयोग.

६३.. नियोजन व वास्तुशिल्प शाळा, नवी दिल्ली.

६४. कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी योजना, १९५२ खाली प्रस्थापित केलेल्या भविष्यनिर्वाह निधीच्या प्रशासनासाठी विश्वस्तांचे केंद्रीय मंडळ.

६५. गुजराथ राज्य मार्ग परिवहन महामंडळ.

६६. राज्य वित्तीय महामंडळे (१९५१ चा अधिनियम क्र. ६३) अधिनियम, १९५१ अन्वये (विधी संस्थापित) स्थापन करण्यात आलेले उत्तर प्रदेश वित्तीय महामंडळ.

६७. भारतीय तंत्रशास्त्र संस्था, मुंबई.

६८. भारतीय परिचर्या (नर्सिग) परिषद.

६९. राज्य वित्तीय महामंडळे अधिनियम, १९५१ (१९५१ चा अधिनियम क्र. ६३) अन्वये (विधी संस्थापित) स्थापन करण्यात आलेले गुजराथ राज्य वित्तीय महामंडळ.

७०. भारतीय तंत्रशास्त्र संस्था, मद्रास.

७१. राज्य वित्तीय महामंडळे अधिनियम, १९५१ (१९५१ चा अधिनियम क्र. ६३) अन्वये (विधी संस्थापित) स्थापन करण्यात आलेले राजस्थान वित्तीय महामंडळ.

७२. एअर इंडिया इंटरनॅशनल कॉर्पोरेशन.

७३. साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

७४. पन्नालाल गिरधारीलाल डी. ए. व्ही. महाविद्यालय, नवी दिल्ली.

७५. दिल्ली सामाजिक कार्यशाळा, दिल्ली.

७६. अखिल भारतीय वैद्यक शास्त्र संस्था.

७७. कोळसा खाणी भविष्यनिर्वाह निधी योजना, १९४८ खाली प्रस्थापित केलेल्या भविष्यनिर्वाह निधीच्या प्रशासनासाठी विश्वस्त मंडळ.

७८. जानकी देवी महाविद्यालय, नवी दिल्ली.

७९. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद, नवी दिल्ली.

८०. राष्ट्रीय उत्पादकता परिषद.

८१. राष्ट्रीय औद्योगिक विकास महामंडळ, मर्यादित.

८२. आयुर्वेदिक स्नातकोत्तर प्रशिक्षण केंद्र, जामनगर.

८३. भारतीय गुंतवणूक केंद्र, नवी दिल्ली.

८४. इंडियन एअरलाईन्स कॉर्पोरेशन.

८५. भारतीय तंत्रशास्त्र संस्था, कानपूर.

८६. गोदी कामगार (सेवायोजनाचे विनियमन) अधिनियम, १९४८ (१९४८ चा अधिनियम क्रमांक ९) खाली प्रस्थापित केलेले विशाखापट्टम गोदी कामगार मंडळ.

८७. केंद्रीय समाजकल्याण मंडळ.

८८. राज्य वित्तीय महामंडळे अधिनियम, १९५१ (१९५१ चा अधिनियम क्रमांक ६३) खाली विधी संस्थापित ओरिसा राज्य वित्तीय महामंडळ.

८९. संगीत नाटक अकादमी, नवी दिल्ली.

९०. आर्थिक प्रगती संस्था, दिल्ली.

९१. दिल्ली औकाफ मंडळ.

९२. उपयोजित मनुष्यबळ संशोधन संस्था, नवी दिल्ली.

९३. भारतीय विधी संस्था.

९४. भारतीय तंत्रशास्त्र संस्था, दिल्ली,

९५. दयालसिंग महाविद्यालय, नवी दिल्ली.

९६. प्रमिला महाविद्यालय, दिल्ली.

९७. सनातन धर्म महाविद्यालय, नवी दिल्ली.

९८. भारतीय औषधनिर्माण शाळा (फार्मसी) परिषद.

९९. भारतीय व्यवस्थापन संस्था, कलकत्ता.

१००. सैनिकी शाळा संस्था.

१०१. सालारजंग वस्तुसंग्रहालय मंडळ, हैद्राबाद.

१०२. ललितकला अकादमी, नवी दिल्ली.

१०३. राज्य वित्तीय महामंडळे अधिनियम, १९५१ (१९५१ चा अधिनियम क्रमांक ६३) खाली विधि संस्थापित, मध्यप्रदेश वित्तीय महामंडळ.

१०४. मध्यवर्ती गोसंवर्धन परिषद.

१०५. भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ (१९५५ चा अधिनियम क्रमांक २३) द्वारे प्रस्थापित केलेली भारतीय स्टेट बँक.

१०६. अखिल भारतीय मानसिक आरोग्य संस्था, बंगलोर.

शामुना–एच-१७२-असराप्रविमुं-५-२०१०-४००० प्रती-पीसी४*